सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ३० ऑक्टोंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १९४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

चक्रीवादळ 'अर्णब'च्या संकटात केंद्र सरकार धावले; केंद्रीय गृहमंत्री अमित शहांचे मदतीचे आश्वासन

चक्रीवादळ 'अर्णब'मुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी आंध्र प्रदेश, पुद्दुचेरी, ओडिशा आणि छत्तीसगड या चार राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. या संकटाच्या वेळी नागरिकांचे हाल कमी करण्यासाठी आणि आपत्तीचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, असे ठाम आश्वासन त्यांनी सर्व मुख्यमंत्र्यांना दिले. भारतीय हवामान विभागाने (IMD) दिलेल्या माहितीनुसार, किनारपट्टीचा भाग असलेल्या आंध्र प्रदेश, यानम आणि लगतच्या बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले हे तीव्र चक्रीवादळ गेल्या काही तासांत

ताशी 8 किलोमीटरच्या धीम्या गतीने पुढे सरकले आहे. हळूहळू या चक्रीवादळाची तीव्रता कमी झाली असून आता त्याचे रूपांतर एका सामान्य चक्रीवादळात झाले आहे.

हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, हे चक्रीवादळ पुढील 48 तासांत उत्तर-पश्चिम दिशेने सरकण्याची शक्यता आहे. या काळात त्याची ताकद आणखी क्षीण होईल आणि 28 ऑक्टोबर 2026 च्या मध्यरात्रीपर्यंत या चक्रीवादळाचे रूपांतर 'डिप डिप्रेशन'मध्ये (गंभीर कमी दाबाच्या पट्ट्यात) होईल. आपत्ती व्यवस्थापनाबाबत माहिती देताना अमित शहा म्हणाले की, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) च्या तुकड्या तात्काळ घटनास्थळी तैनात करण्यात आल्या आहेत. बाधित भागात नागरिकांची सुरक्षित सुटका करणे, अडकलेल्या लोकांना सुरक्षित स्थळी हलवणे आणि मदत सामग्री पोहोचवणे ही कामे युद्धपातळीवर केली जात आहेत.

गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर माहिती शेअर करताना लिहिले: "चक्रीवादळ 'अर्णब'च्या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेश, पुद्दुचेरी, ओडिशा आणि छत्तीसगडच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. या नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांना कमीत कमी त्रास व्हावा यासाठी केंद्राकडून सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे." वादळामुळे झालेल्या नुकसानीचा अचूक अंदाज घेण्यासाठी केंद्र सरकार लवकरच 'आंतर-मंत्रालयीन केंद्रीय पथके' (IMCTs) बाधित राज्यांमध्ये पाठवणार असल्याचेही गृहमंत्र्यांनी स्पष्ट केले. ही पथके स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने शेती, मालमत्ता, पायाभूत सुविधा आणि जीवितहानीच्या प्रमाणाचा आढावा घेतील. या अहवालानंतर राज्यांना अतिरिक्त आर्थिक आणि पायाभूत मदत जाहीर केली जाईल. "भारत सरकार पूर्ण कटिबद्धतेसह या कठीण काळात बाधित भागातील जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे," असा विश्वास गृहमंत्र्यांनी व्यक्त केला. स्थानिक प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून किनारपट्टीच्या भागातील नागरिकांना सुरक्षेचे नियम पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचा मार्ग मोकळा, सुप्रीम कोर्टाचे मोठे निर्देश

मुंबई: महाराष्ट्रातील ग्रामीण राजकारणात लवकरच प्रचाराचा धुरळा उडणार आहे! ओबीसी आरक्षणाच्या कायदेशीर पेचामुळे मागील अनेक महिन्यांपासून रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. लोकशाही प्रक्रिया अनिश्चित काळासाठी रोखून धरता येणार नाही, असे स्पष्ट करत कोर्टाने निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा केला आहे. राज्यातील 20 जिल्हा परिषद आणि सुमारे 225 पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा प्रश्न या निर्णयामुळे मार्गी लागण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी पार पडली. यापूर्वी न्यायालयाने बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षण व्यवस्थेनुसार निवडणुका घेण्यास परवानगी दिली होती. मात्र, काही ठिकाणी आरक्षणाची एकूण मर्यादा 50 टक्क्यांपेक्षा जास्त होत असल्याचा मुद्दा उपस्थित झाल्याने पेच निर्माण झाला होता.

50 टक्के मर्यादेचे बंधनकारक पालन

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे की, ओबीसी आरक्षण लागू करताना अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर आरक्षणांची एकत्रित मर्यादा 50 टक्क्यांच्या आत ठेवणे बंधनकारक असेल. या घटनात्मक मर्यादेचे काटेकोर पालन करूनच निवडणुका पार पाडाव्या लागणार आहेत. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधी निवडले जाण्याचा पेच सुटला आहे.

ग्रामीण विकासाला मिळणार गती

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या या ग्रामीण विकासाच्या कणा मानल्या जातात. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण तसेच ग्रामीण भागातील विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये या संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. निवडणुका लांबल्यामुळे ग्रामीण विकासाची अनेक कामे रखडली होती. आता या निर्णयामुळे स्थानिक पातळीवर राजकीय हालचालींना वेग येणार आहे. आता राज्य निवडणूक आयोग यावर काय भूमिका घेतो, निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम कधी जाहीर होतो आणि प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेचे नियोजन कसे होते, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून आहे.

पाणीटंचाई रोखण्यासाठी आतापासूनच नियोजन करा; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आदेश

पुणे: पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री आणि पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिल्या आहेत. विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे आयोजित कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीत दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील पाणी उपलब्धता, संभाव्य पाणीटंचाई आणि आगामी काळातील पाणी नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. नागरिकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले जावे. तसेच शेती आणि पशुधनासाठी आवश्यक पाण्याचे योग्य नियोजन करून उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने

वापर करावा, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

पुणे शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत चर्चा करताना, पुणे महानगरपालिकेने उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर करून प्रभावी नियोजन करावे, असे सांगण्यात आले. तसेच पुणे महानगरपालिकेला 13 टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत नियोजन करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

यावेळी उपस्थित नेत्यांनी आणि अधिकार्यांनी लोकनेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या दुष्काळाच्या काळातील पाणी नियोजनाच्या कार्याची आवर्जून आठवण केली. अजितदादा ज्या पद्धतीने दुष्काळी परिस्थितीत काटेकोर नियोजन करायचे, त्याच धर्तीवर पाणी व्यवस्थापन करावे, अशी आग्रही मागणी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे करण्यात आली. यावर त्यांनी याविषयी सविस्तर माहिती घेऊन त्याच पद्धतीने काम करण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन दिले. नागरिक, शेतकरी आणि पशुधनाला आगामी काळात पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने आणि जबाबदारीने काम करावे, असे आवाहन बैठकीच्या शेवटी करण्यात आले.

ओला-उबरच्या मनमानीला चाप बसणार; स्वतंत्र टॅक्सी चालकांसाठी स्वतंत्र तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म आणण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

मुंबई: राज्यातील अॅप-आधारित प्रवासी वाहतूक क्षेत्रात स्वतंत्र टॅक्सी चालकांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने आता कठोर पावले उचलली आहेत. ओला, उबर आणि इतर मोठ्या फ्लीट ऑपरेटर कंपन्यांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या वाटपात पारदर्शकता आणण्यासाठी सर्वांना समान संधी देणारे स्वतंत्र तंत्रज्ञानाचे प्लॅटफॉर्म विकसित करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्र मोटार व्हेईकल अॅग्रीगेटर रुल्स, 2026 अंतर्गत समुच्चय वाहन धोरणाच्या अंमलबजावणीबाबत मुख्यमंत्र्यांकडे एक सविस्तर सादरीकरण केले. त्यानंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

प्रवास वाटप प्रणालीत पारदर्शकतेचा अभाव

सध्या राज्यात ओला, उबर व इतर कंपन्यांच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहे. मात्र, या कंपन्यांच्या अल्गोरिदमची कार्यपद्धती स्पष्ट नसल्यामुळे स्वतंत्र टॅक्सी चालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विमानतळासारख्या प्रमुख आणि जास्त उत्पन्नाच्या ठिकाणांहून मोठ्या फ्लीट ऑपरेटरच्या चालकांना प्राधान्य दिले जाते, तर स्वतंत्र चालकांना कमी उत्पन्नाच्या फेऱ्या दिल्या जात असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रवास वाटपात चालकांचा कोणताही भेदभाव होऊ नये, यासाठी पारदर्शक यंत्रणा उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.

समान नियम आणि चालकांच्या रोजगाराचे संरक्षण

मोठ्या फ्लीट ऑपरेटर कंपन्यांच्या तुलनेत स्वतंत्र चालकांच्या किरकोळ चुकांवर त्यांचे खाते तात्काळ बंद करणे किंवा निलंबनाची कठोर कारवाई केली जाते. एव्हरेस्ट फ्लीट्ह, मूव्ह फ्लीट आणि कॅरम फ्लीट यांसारख्या मोठ्या ऑपरेटरना मिळणाऱ्या कथित प्राधान्यामुळे स्वतंत्र चालकांच्या रोजगारावर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे सर्व घटकांसाठी समान नियम, समान निकष आणि निष्पक्ष कार्यपद्धती असावी, अशी आक्रमक भूमिका सादरीकरणात मांडण्यात आली.

उत्पन्न, सामाजिक सुरक्षा आणि तांत्रिक लेखापरीक्षण

चालकांच्या आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेचा मुद्दाही या बैठकीत प्रकर्षाने मांडण्यात आला. त्यानुसार खालील मुद्द्यांवर स्पष्टता आणण्याचे निर्देश आहेत:

प्रवासाचे भाडे निश्चित करणे, प्रोत्साहनपर रक्कम (Incentives) आणि चालकांच्या मूल्यांकनात पारदर्शकता असावी.

चालकांना मिळणारे निश्चित उत्पन्न, कामाचे तास, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि कर्मचारी राज्य विमा (ईएसआय) यांसारख्या सुविधांची अंमलबजावणी व्हावी.

प्रवास वाटप, जिओ-फेन्सिंग, लाइव्ह जिओ-लोकेशन आणि वाढीव भाडे निश्चिती या तांत्रिक प्रणालींचे स्वतंत्र लेखापरीक्षण केले जावे.

न्याय्य स्पर्धेचे वातावरण निर्माण होणार

समुच्चय वाहन धोरणाचा मूळ उद्देश केवळ कंपन्यांवर नियंत्रण ठेवणे नसून स्वतंत्र टॅक्सी चालकांसह सर्व घटकांना समान संधी देणे हा आहे. या नव्या धोरणामुळे आणि तंत्रज्ञानाधारित प्लॅटफॉर्ममुळे स्वतंत्र चालकांच्या रोजगाराचे रक्षण होईल, स्थानिक भूमिपुत्रांना व्यवसायाच्या समान संधी मिळतील आणि प्रवाशांना सुरक्षित व परवडणारी सेवा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

दुष्काळात शेतकऱ्यांना दिलासा: शिवसेनेकडून 24 ट्रकसद्वारे धाराशिवला दिवाळीचा शिधा रवाना

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा कर्जवसुली करणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्यांना कडक इशारा

धाराशिव : राज्यात निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारसोबतच शिवसेनाही पूर्ण ताकदीने बळीराजाच्या पाठीशी उभी राहिली आहे. 'जिथे आपत्ती, तिथे मदत' या भूमिकेतून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी शिवसेनेच्या वतीने धाराशिव जिल्ह्यासाठी २४ ट्रक भरून दिवाळीचा शिधा रवाना करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वाहनांना हिरवा झेंडा दाखवला.

शिवसेनेचे कार्यकर्ते धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या घराघरांत जाऊन या साहित्याचे प्रत्यक्ष वाटप करतील. या मदत साहित्यात बेसन, साखर, रवा, मैदा, तूप, रांगोळी, पणत्या आणि शिवसेनेची खास दिनदर्शिका समाविष्ट आहे. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर मिळणाऱ्या सर्व शासकीय सवलतींशिवाय बाधित शेतकऱ्यांना शासनाकडून ५ हजार रुपयांची तातडीची मदत दिली जाईल. अन्नधान्याव्यतिरिक्त दुष्काळग्रस्त भागात चारा, पाण्याचे टँकर, पाण्याच्या टाक्या पुरवण्यावर भर दिला जाईल. तसेच, आर्थिक अडचणींमुळे मुलींची लग्ने खोळंबलेल्या कुटुंबांनाही शिवसेनेकडून मदत केली जात आहे.

संकटाच्या काळात शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीचा तगादा लावणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्या, बँका आणि सावकारांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा उपमुख्यमंत्र्यांनी दिला. असा त्रास झाल्यास त्वरित सरकार, प्रशासन किंवा शिवसेनेच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमाच्या वेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार ओमराजे निंबाळकर, युवासेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, नगरसेवक राकेश शिंदे, मराठवाडा समन्वयक बाजीराव चव्हाण यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कन्यादान योजनेत सामूहिक विवाहासाठी अनुदान, पात्र संस्थांना प्रस्ताव सादर करण्याचे समाज कल्याण विभागाचे आवाहन

नाशिक : आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील वधू-वरांना विवाहासाठी आर्थिक सहाय्य मिळावे, यासाठी समाज कल्याण विभागामार्फत कन्यादान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करणाऱ्या पात्र स्वयंसेवी संस्थांना शासनाकडून अनुदान दिले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त देविदास नांदगावकर यांनी केले आहे.

प्रत्येक जोडप्यामागे संस्थेला ४ हजार रुपये अनुदान

कन्यादान योजनेंतर्गत सामूहिक विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक जोडप्यामागे संबंधित स्वयंसेवी संस्थेला ४ हजार रुपये अनुदान देण्यात येते. याशिवाय, योजनेच्या निकषांनुसार पात्र नवदांपत्याला २५ हजार रुपये अनुदान देण्याची तरतूद आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील कुटुंबांना विवाहाचा आर्थिक भार कमी करण्यासाठी या योजनेचा लाभ घेता येतो.

कन्यादान योजनेसाठी कोण पात्र ?

या योजनेचा लाभ घेण्यासाठी वधू आणि वर हे महाराष्ट्राचे रहिवासी असणे आवश्यक आहे. नवदांपत्यातील दोघेही किंवा त्यांपैकी एकजण अनुसूचित जाती, नवबौद्ध अथवा योजनेच्या निकषांनुसार पात्र प्रवर्गातील असावा. योजनेसाठी वधूचे वय १८ वर्षे पूर्ण आणि वराचे वय २१ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच दोघांचेही वय २८ वर्षांपेक्षा कमी असावे. वधू-वरांच्या प्रथम विवाहासाठी या योजनेचा लाभ घेता येतो.

लोकशाही बचाव रॅलीनंतर भाजपाची विभागीय बैठक

नांदेडमध्ये शनिवारी रॅली व जाहीर सभा; प्रदेश सरचिटणीस सुनील राणे यांची उपस्थिती

नांदेड (प्रतिनिधी) : भारतीय जनता पक्षाच्या वतीने 'लोकशाही बचाव, अराजकता हटाओ' अभियानांतर्गत शनिवारी, दि. ३१ ऑक्टोबर रोजी नांदेड येथे रॅली व जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमानंतर भाजपाची विभागीय बैठक प्रदेश सरचिटणीस तथा नांदेडचे पालक सुनील राणे यांच्या उपस्थितीत होणार आहे. या बैठकीला जिल्हा कार्यकारिणीतील प्रमुख पदाधिकारी, सरचिटणीस, उपाध्यक्ष तसेच प्रदेश पदाधिकाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित आहे.

शनिवारी दुपारी ४ वाजता आयटीआय परिसरातील महात्मा फुले पुतळा येथे जाहीर सभा होणार आहे. त्यापूर्वी दुपारी ३.३० वाजता व्यंकटराव तरोडेकर चौक (राज कॉर्नर) येथून रॅलीला सुरुवात होईल. राज कॉर्नर ते महात्मा फुले पुतळा, आयटीआय असा रॅलीचा मार्ग निश्चित करण्यात आला आहे. या अभियानाच्या माध्यमातून पक्षाच्या वतीने लोकशाहीच्या रक्षणाचा आणि अराजकतेविरोधातील भूमिकेचा संदेश दिला जाणार आहे.

या रॅली व जाहीर सभेला भाजपाचे आजी-माजी खासदार, आमदार, सर्व पदाधिकारी, नगरसेवक, माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, मंडळाध्यक्ष, विविध प्रकोष्ठ व मोर्चांचे अध्यक्ष आणि पदाधिकारी, शक्तिकेंद्रप्रमुख, बूथ अध्यक्ष तसेच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रॅली व जाहीर सभेनंतर होणाऱ्या विभागीय बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रदेश सरचिटणीस सुनील राणे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या बैठकीत पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा आणि आगामी वाटचालीच्या दृष्टीने चर्चा होण्याची शक्यता आहे. या संदर्भात महानगराध्यक्ष आमदार अमरनाथ राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे आणि जिल्हाध्यक्ष अॅड. किशोर देशमुख यांनी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

अहिल्यानगरमध्ये चारा टंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाचा मास्टरप्लॅन; पशुधनाच्या सर्वेक्षणासह चारा लागवडीला वेग

अहिल्यानगर : जिल्ह्यामध्ये सध्या दीड ते दोन महिने पुरेल इतका चारा शिल्लक असून, संभाव्य चारा टंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून आता वेगाने उपाययोजना सुरू करण्यात आले आहे. सिंचनाखालील शेतकऱ्यांना चारा लागवडीचे आवाहन करण्यात आले असून डिबीटी पोर्टलद्वारे बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले आहे. वेळप्रसंगी जिल्हा बाहेरून किंवा इतर ठिकाणाहून चाऱ्याची उपलब्धता सरकारमार्फत करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर संभाव्य चारा टंचाईचा आढावा घेण्यासाठी महसूल व कृषी प्रशासनाकडून सुरू असलेल्या सर्वेक्षणाला मोठा वेग आला आहे. 28 ऑक्टोबर 2026 अखेर जिल्ह्यातील सर्व 14 तालुक्यांमध्ये मिळून एकूण 2 लाख 30 हजार 123 नोंदी पूर्ण झाल्या आहेत. आदल्या दिवसापर्यंतच्या 2 लाख 22 हजार 640 नोंदींमध्ये अवघ्या 24 तासांत 7 हजार 483 नव्या नोंदींची भर पडली आहे. तालुकानिहाय आकडेवारीत श्रीगोंदा, संगमनेर आणि शेवगाव हे तालुके आघाडीवर असून, यंदा पावसाची तूट आणि खरीप पिकांच्या नुकसानीमुळे पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर येण्याची चिन्हे आहेत, असे त्यांनी सांगितले.

प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार, श्रीगोंदा तालुक्यात सर्वाधिक 19 हजार 972 नोंदी नोंदवल्या गेल्या आहेत. त्यापाठोपाठ संगमनेर तालुक्यात 19 हजार 373, शेवगावमध्ये 19 हजार 324, पाथर्डीत 18 हजार 508, अकोलेमध्ये 17 हजार 925 आणि कोपरगाव तालुक्यात 17 हजार 915 नोंदी झाल्या आहेत. या शिवाय नगर तालुक्यात 17 हजार 470, नेवाशात 16 हजार 699, राहुरीत 16 हजार 665, राहात्यात 15 हजार 63, पारनेरमध्ये 14 हजार 255 आणि कर्जत तालुक्यात 13 हजार 880 नोंदींची नोंद झाली आहे. तर श्रीरामपूर तालुक्यात 11 हजार 983 आणि जामखेड तालुक्यात 11 हजार 91 नोंदी पूर्ण झाल्या आहेत.

28 ऑक्टोबर रोजी एकाच दिवसात नोंदवण्यात आलेल्या 7 हजार 483 नोंदींमध्ये संगमनेर तालुक्याने बाजी मारत सर्वाधिक 1 हजार 118 नोंदींची भर घातली. तसेच श्रीगोंदा तालुक्यात 837, पारनेरमध्ये 801, नेवाशात 665, अकोलेत 641 आणि राहाता तालुक्यात 571 नोंदी करण्यात आल्या. राहुरी तालुक्यात 546, कर्जतमध्ये 473, नगरमध्ये 401, पाथर्डी आणि श्रीरामपूरमध्ये प्रत्येकी 343, शेवगावमध्ये 314, जामखेडमध्ये 223, तर कोपरगाव तालुक्यात 200 नोंदींची नोंद झाल्याचे ते म्हणाले.

यंदा जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने आणि खरीप पिकांवर त्याचा प्रतिकूल परिणाम झाल्याने शेती क्षेत्र संकटात सापडले आहे. अशा स्थितीत दुग्धव्यवसाय आणि पशुधन टिकवून ठेवण्यासाठी हिरवा व वाळलेला चारा पुरेसा उपलब्ध असणे आवश्यक आहे. चाऱ्याची टंचाई निर्माण झाल्यास पशुपालकांना महागड्या दराने बाहेरून चारा खरेदी करावा लागेल, ज्यामुळे त्यांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ होऊन दूध उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर, या सर्वेक्षणातील माहितीच्या आधारे टंचाईग्रस्त भागांची अचूक ओळख पटवून प्रशासनाला वेळेवर उपाययोजना आखणे सोपे जाणार आहे.

एसबीआय लाइफ इन्शुरन्सने ₹20,259 कोटींचा एनबीपी नोंदवला

मुंबई : एसबीआय लाइफ इन्शुरन्स, देशातील अग्रगण्य जीवन विमा कंपन्यांपैकी एकाने 30 सप्टेंबर 2026 रोजी संपलेल्या कालावधीसाठी ₹20,259 कोटींचा नवीन व्यवसाय प्रीमियम नोंदवला आहे. गेल्या वर्षी याच कालावधीसाठी ₹18,349 कोटी एवढा प्रीमियम नोंदवण्यात आला होता. 30 सप्टेंबर, 2025 रोजी संपलेल्या कालावधीसाठी 21% ने वाढ झाली आहे.सुरक्षेवर स्पष्ट लक्ष केंद्रित करून, एसबीआय लाइफचे नवीन व्यवसाय संरक्षण प्रीमियम 30 सप्टेंबर 2026 रोजी संपलेल्या कालावधीसाठी ₹3,235 कोटी इतके होते, ज्यात 46% वाढ झाली आहे. वैयक्तिक नवीन व्यवसाय संरक्षण प्रीमियमने 30 सप्टेंबर 2026 रोजी संपलेल्या कालावधीत 20% ची वाढ नोंदवली आणि ती ₹446 कोटी झाली. वैयक्तिक नवीन व्यवसाय प्रीमियम 30 सप्टेंबर 2025 रोजी संपलेल्या कालावधीत 13% वाढीसह ₹13,732 कोटी आहे. एसबीआय लाइफचा करानंतरचा नफा 30 सप्टेंबर, 2026 रोजी संपलेल्या कालावधीत 30 सप्टेंबर 2025 रोजी संपलेल्या कालावधीत 17% वाढीसह ₹1,274 कोटी आहे.

मोरेपेनचा दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक प्रदर्शन

मुंबई : मोरेपेन लॅबोरेटरीज लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२७च्या दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. कंपनीचा महसूल वर्षाच्या तुलनेत ८१ टक्क्यांनी वाढून ७५५ कोटी रुपयांवर पोहोचला. ईबीआयटीडीए मध्ये २७३ टक्क्यांची वाढ होऊन तो १३२ कोटी रुपये, तर करपश्चात नफा ११७ टक्क्यांनी वाढून ८९ कोटी रुपये झाला. ईबीआयटीडीएमार्जिन १७.४५ टक्के राहिला.कंपनीच्या कामगिरीत सीडीएमओव्यवसायाची वाढ, उत्पादनांच्या मिश्रणातील सुधारणा आणि कार्यक्षमतेत झालेली वाढ महत्त्वाची ठरली. तिमाहीत सीडीएमओ मधून २५३ कोटी रुपयांचा महसूल मिळाला, तर निर्यात महसूल १३१ टक्क्यांनी वाढून ३९७ कोटी रुपयांवर पोहोचला. मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायातून २०८ कोटी रुपयांचा महसूल नोंदवण्यात आला.

महाराष्ट्रातील परवडणाऱ्या गृहवित्त क्षेत्रातील स्थान मजबूत

लातूर: गोदरेज इंडस्ट्रीज समूहाची वित्तीय सेवा शाखा असलेल्या गोदरेज कॅपिटलने आपली उपकंपनी गोदरेज हाऊसिंग फायनान्सच्या माध्यमातून महाराष्ट्रातील परवडणाऱ्या गृहवित्त क्षेत्रातील आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. लातूर येथे व्यवसायाचा विस्तार करून कंपनीने राज्यातील टियर-2 शहरांवर आणि उदयोन्मुख निवासी सूक्ष्म बाजारपेठांवर लक्ष केंद्रित करण्याची आपली भूमिका अधिक बळकट केली आहे. मराठवाडा विभागात सुधारत असलेल्या दळणवळणाच्या सुविधा आणि नियोजित पायाभूत सुविधा विकासामुळे लातूर हे एक उदयोन्मुख निवासी बाजारपेठ म्हणून वेगाने पुढे येत आहे. प्रस्तावित कल्याण–लातूर द्रुतगती महामार्गासारख्या प्रकल्पांमुळे प्रादेशिक संपर्कव्यवस्था लक्षणीयरीत्या सुधारण्याची, प्रवासाचा वेळ कमी होण्याची आणि महाराष्ट्रातील व्यापक आर्थिक विकास कॉरिडॉरशी शहराची जोड अधिक मजबूत होण्याची अपेक्षा आहे.

अल्फा चावर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर 31 ऑक्टोबर रोजी

महाराष्ट्र: सोनी मॅक्स आपल्या फेस्टिव्ह लाइन-अपमध्ये ॲक्शनचा जबरदस्त तडका घेऊन येत आहे. यश राज फिल्म्स च्या अल्फाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर 31 ऑक्टोबर रोजी रात्री 8 वाजता प्रसारित होणार आहे. आलिया भट्ट आणि शर्वरी यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट दोन धाडसी आणि घातक तरुणींची ओरिजिन स्टोरी असून, प्रेक्षकांसाठी एक धमाकेदार ॲक्शन एंटरटेनर घेऊन येत आहे. शिव रवैल दिग्दर्शित या चित्रपटात बॉबी देओल आणि अनिल कपूर महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये दिसणार आहेत. आलिया भट्ट एका अगदी वेगळ्या आणि यापूर्वी कधीही न पाहिलेल्या भूमिकेत दिसणार आहे. ती एका अशा ॲसॅसिनची भूमिका साकारत आहे, जिला मारण्यासाठी प्रशिक्षित करून तयार करण्यात आले आहे. हाय-ऑक्टेन ॲक्शन, शानदार व्हिज्युअल्स आणि थराराने भरलेला A अल्फा आलिया आणि शर्वरी या दोघींच्या निर्भय आणि दमदार अल्फा वृत्तीचा उत्सव साजरा करतो. हा चित्रपट प्रेक्षकांना एक रोमांचक आणि मनोरंजक अनुभव देण्याचे वचन देतो. व्य स्तरावर साकारलेला आणि प्रभावी कथानक असलेला अल्फा सर्व पिढ्यांतील प्रेक्षकांसाठी ब्लॉकबस्टर अनुभव घेऊन येतो. या चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर हा सोनी मॅक्स च्या फेस्टिव्ह लाइन-अपमधील आणखी एक शानदार चित्रपट आहे. निर्भीड कथाकथन आणि हाय-व्होल्टेज मनोरंजनाचा उत्सव साजरा करणारा हा फेस्टिव्ह लाइन-अप, या सीझनमधील बॉलिवूडच्या मोठ्या मनोरंजनाच्या क्षणांसाठी सज्ज आहे.

शेतकऱ्याच्या दुर्दैवी मृत्यूबद्दल एमएफआयएनकडून शोक व्यक्त

नांदेड-मायक्रोफायनान्स इंडस्ट्री नेटवर्क (एमएफआयएन) महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील एका शेतकऱ्याच्या मृत्यूबद्दल तीव्र दु:ख व्यक्त करत असून शोकाकुल कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत आहे.प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तांनुसार, एका खासगी वित्तपुरवठा संस्थेशी संबंधित कर्जाच्या परतफेडीच्या प्रश्नामुळे कथितरीत्या या शेतकऱ्याचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूशी संबंधित परिस्थितीची पोलीस तपासणी सध्या सुरु आहे. मात्र, वृत्तांच्या मथळ्यांमध्ये चुकीच्या पद्धतीने 'मायक्रोफायनान्स'चा उल्लेख करण्यात आला आहे. एमएफआयएन हे स्पष्ट करू इच्छिते की त्याचे सदस्य (बँका, स्मॉल फायनान्स बँका नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपन्या-मायक्रोफायनान्स संस्था आणि नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपन्या (या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) च्या नियमनाखाली कार्यरत असलेल्या संस्था आहेत.

यूलू ची नाशिकमध्ये एंट्री; शहरात स्वच्छ इलेक्ट्रिक डिलिव्हरी सेवांचा प्रारंभ

नाशिक : भारतातील अग्रेसर इलेक्ट्रिक मोबिलिटी-ॲज-अ-सर्व्हिस (प्लॅटफॉर्म यूलू ने आपल्या यूलू व्यापारिक भागीदार विभागांतर्गत नाशिकमध्ये सेवा सुरू केली आहे. उद्योजक जय धनानी यांच्या नेतृत्वाखालील अप्रोच ऑटो मोबिलिटी या कंपनीसोबत भागीदारी करून यूलू ने आपली इलेक्ट्रिक वाहनांवर आधारित डिलिव्हरी सेवा शहरात उपलब्ध केली आहे. मुंबईनंतर नाशिक हे महाराष्ट्रातील यूलूचे दुसरे केंद्र आहे. गेल्या सात वर्षांपासून मुंबईत कार्यरत असलेल्या यूलू च्या इलेक्ट्रिक वाहन सेवेमुळे ग्राहकांना परवडणारा आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

जाहिर प्रगटन

मा.श्री. रिजवान उ.शेख उरे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क. १६८५/२०२६

अॅड. नागरगोजे एस.आर.

कलावती व ईतर वि. निरंक

ज्यापेक्षा अमोल शेषेराव शेळके, हे दिनांक २२/०९/२०२५ रोजी, मौजे मोरगाव, ता. जि. बीड, येथे मयत झालेले आहेत, तसेच

अर्जदार - १. कलावती भ्र.शेषेराव शेळके, वय. ५१ वर्षे, धंदा. घरकाम, रा. सोमनाथवाडी, पो. लिंबागणेश, ता. जि. बीड २. आरती भ्र.अमोल शेळके, (आरती पि. विष्णु पवार लग्ना पुर्वीचे नांव) वय.२२ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे ३. राजविर पि.अमोल शेळके, वय. ३ वर्षे, अ.पा.क. आई अर्जदार क.१ रा. वरीलप्रमाणे ४. शेषेराव पि.केरु शेळके, वय ७२ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे

अर्जदार क. १ ही मयताची आई असुन, अर्जदार क. २ ही मयताची पत्नी आहे, अर्जदार क. ३ हा मयताचा मुलगा आहे, तो अज्ञान असुन त्याची अ.पा.क. आई अर्जदार क. २ ही आहे. तसेच अर्जदार क. ४ हे मयताचे वडिल आहेत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कांत मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे काणोस समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हा कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोट, सदरह अर्जदारांच्या हक्कांतबददल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा/अर्जदारांच्या हक्क शाबीत दिसल्यास, नामे अमोल शेषेराव शेळके, हे यांचे वारस असल्याबाबतचे नोंद घ्यावी. त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत प्रमाणपत्र देण्यात येईल, याची

प्रकरणाची पुढील तारीख २७/११/२०२६ ही आहे.

आज दिनांक २६ आक्टोंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपिक | अधिक्षक

दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे – अशोक लोढा

खटोड परिवाराचे 25 कोटी रुपये किमतीच्या अडीच एकर जमिनीचे दान;अशोक लोढा यांच्याकडून 51 लक्ष देणगी ; बीड वासीयांसाठी ऐतिहासिक सुवर्ण क्षण.

बीड | प्रतिनिधी :बीड शहरातील फुलाईनगर, कृष्ण मंदिराजवळ येथे शुक्रवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या ऐतिहासिक व समाजोपयोगी सोहळ्यास जैन समाजबांधवांसह सर्व जाती-धर्मांतील नागरिकांनी आपल्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सकल जैन समाज, बीडचे अध्यक्ष तथा भाजपा बीड शहराध्यक्ष अशोक चांदमल लोढा यांनी केले आहे.

या सेवाभावी उपक्रमासाठी खटोड प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती निर्मला झुंबरलालजी खटोड यांनी हॉस्पिटलसाठी एक एकर व शाळेसाठी दीड एकर अशी एकूण अडीच एकर जमीन दान केली आहे. या जमिनीची बाजारभावानुसार अंदाजित किंमत सुमारे २५ कोटी रुपये असून, खटोड परिवाराने आपल्या दातृत्वातून सामाजिक बांधिलकी व मानवसेवेचा आदर्श निर्माण केला आहे. आरोग्य आणि शिक्षण या समाजविकासाच्या दोन महत्त्वपूर्ण क्षेत्रांसाठी केलेले हे योगदान अत्यंत प्रेरणादायी असून, भावी पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे, असे अशोक लोढा यांनी सांगितले.

या पवित्र सेवाकार्यात स्वतः पुढाकार घेत अशोक चांदमल लोढा यांनी आपल्या मातोश्री स्व. मदनबाई चांदमल लोढा यांच्या पवित्र स्मृतिप्रीत्यर्थ ५१ लाख रुपयांची देणगी जाहीर केली आहे. आईच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी समाजातील गरजू व सर्वसामान्य रुग्णांच्या सेवेसाठी केलेले हे योगदान म्हणजे मातृऋण व्यक्त करण्याचा एक आदर्श प्रयत्न आहे. तसेच समाजातील अनेक दानशूर नागरिकांनी आपल्या आर्थिक क्षमतेनुसार २१ हजार, ११ हजार रुपये तसेच इतर रकमेच्या देणग्या देऊन या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे. देणगी लहान असो अथवा मोठी, त्यामागील सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची भावना हीच सर्वांत महत्त्वाची असल्याचे लोढा यांनी नमूद केले.

आरोग्यसेवा ही केवळ व्यावसायिक जबाबदारी नसून ती मानवतेची सेवा आहे. याच भावनेतून अहिल्यानगर येथील आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर गरजू, गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आरोग्यसेवेचा आधार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. हॉस्पिटलमध्ये हृदयरोग, शस्त्रक्रिया, मूत्रपिंडविकार, डायलिसिस, बालरोग, न्यूरोलॉजी, युरोलॉजी व रेडिओलॉजी यांसह विविध वैद्यकीय विभागांच्या माध्यमातून उपचार सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच अतिदक्षता विभाग, आपत्कालीन सेवा, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन व आधुनिक निदान सुविधांमुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास मदत होत आहे.

बीड जिल्ह्यातील अनेक रुग्णांना गंभीर आजारांवरील उपचारांसाठी छत्रपती संभाजीनगर, पुणे व मुंबईसारख्या मोठ्या शहरांत जावे लागते. त्यामुळे रुग्णांसह त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक व मानसिक ताण निर्माण होतो. अशा परिस्थितीत बीडमध्येच आधुनिक वैद्यकीय सुविधांचा विस्तार होणे अत्यंत आवश्यक आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नवीन प्रकल्पामुळे भविष्यात बीड शहरासह ग्रामीण भागातील सर्वसामान्य, गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोठा आधार मिळेल, असा विश्वास लोढा यांनी व्यक्त केला.

भगवान महावीरांच्या अहिंसा, करुणा, दया आणि परोपकाराच्या विचारांचा वारसा जपत जैन समाजाने आरोग्य, शिक्षण व सामाजिक क्षेत्रात नेहमीच उल्लेखनीय योगदान दिले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचा हा प्रकल्प त्याच सेवाभावी परंपरेचे प्रतीक असून, सर्व जाती-धर्मांतील नागरिकांच्या कल्याणासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. "समाजासाठी केलेले दान ही केवळ आर्थिक मदत नसून मानवतेच्या सेवेसाठी दिलेले अमूल्य योगदान आहे. आपल्या आई-वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, कुटुंबातील मंगलप्रसंगानिमित्त किंवा स्वेच्छेने प्रत्येकाने आपल्या क्षमतेनुसार अशा समाजोपयोगी कार्यात योगदान द्यावे. समाजातील व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक, डॉक्टर, युवक आणि सर्व दानशूर नागरिकांनी पुढाकार घेऊन या हॉस्पिटलच्या उभारणीसाठी सढळ हाताने सहकार्य करावे," असे आवाहन अशोक लोढा यांनी केले.

आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा हा बीड जिल्ह्याच्या आरोग्यसेवेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. या प्रसंगी सकल जैन समाजातील सर्व संघटना, पदाधिकारी, व्यापारी बांधव, उद्योजक, डॉक्टर, युवक, महिला भगिनी, सामाजिक व धार्मिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच बीड शहर व परिसरातील सर्व नागरिकांनी आपल्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन सकल जैन समाज, बीडचे अध्यक्ष अशोक चांदमल लोढा यांनी केले आहे.

"हा उपक्रम केवळ एका हॉस्पिटलच्या इमारतीच्या उभारणीपुरता मर्यादित नसून, भविष्यात हजारो गरजू रुग्णांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करणारा आहे. त्यामुळे या पुण्यकार्यात प्रत्येकाने तन, मन आणि धनाने सहभागी व्हावे व शुक्रवार, ३० ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता होणाऱ्या भूमिपूजन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे," असे विशेष आवाहन अशोक लोढा यांनी केले आहे.

मानवलोक समाजकार्य महाविद्यालयात निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न

अंबाजोगाई : मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई येथे पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, ४००/२२० के.व्ही. परळी उपकेंद्र यांच्या सहकार्याने सतर्कता जागरूकता सप्ताह २०२६ निमित्त आयोजित निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला पॉवर ग्रिड कॉर्पोरेशनचे महाप्रबंधक श्री. हर्षद गायकवाड, व्यवस्थापक श्री. अक्षय मोगलवार, श्री. प्रेमनाथ माळी तसेच महाविद्यालयाच्या डॉ. अरुंधती पाटील, डॉ. नजीर शेख, प्रा. सुकेशिनी जोगदंड, डॉ. किसन शिनगारे आणि डॉ. हनुमंत साळुंके यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांमध्ये सत्यनिष्ठा, पारदर्शकता, नैतिक मूल्ये आणि भ्रष्टाचारविरोधी जनजागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी पॉवर ग्रिडचे महाप्रबंधक श्री. हर्षद गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शासनाच्या विविध विभागांमध्ये आढळणाÚया भ्रष्टाचाराच्या समस्येवर प्रकाश टाकला. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी आवश्यक उपाययोजना, पारदर्शक प्रशासकीय व्यवस्था आणि भ्रष्टाचारमुक्त समाजनिर्मितीमध्ये युवकांची भूमिका याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी युवकांनी प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि नैतिक मूल्ये जोपासणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

पॉवर ग्रिडचे व्यवस्थापक श्री. अक्षय मोगलवार यांनी निबंध स्पर्धेतील विजेत्यांची नावे जाहीर करून पारितोषिक वितरण केले. यामध्ये प्रथम क्रमांक श्री. अशोक आचार्य, द्वितीय क्रमांक श्री. आदम शेख, तृतीय क्रमांक कु. साक्षी वाव्हळे, तर उत्तेजनार्थ पारितोषिक श्रीकृष्ण चौरे यांनी प्राप्त केले. सर्व विजेत्यांना रोख पारितोषिक, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि वैचारिक अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालयात अशा स्पर्धांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, असेही यावेळी सांगण्यात आले. पॉवरग्रिड कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. च्या वतीने महाविद्यालयास क्रिडा साहित्य भेट दिले.

महाविद्यालयाचे डॉ. नजीर शेख यांनी महाविद्यालयात आयोजित करण्यात येणाÚया विविध शैक्षणिक, सामाजिक आणि जनजागृतीपर उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हनुमंत साळुंके यांनी केले, तर डॉ. किसन शिनगारे यांनी उपस्थित मान्यवर, पॉवर ग्रिडचे अधिकारी, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भ्रष्टाचारविरोधी जागरूकता, सामाजिक जबाबदारी आणि सत्यनिष्ठेची भावना वृद्धिंगत होण्यास मदत झाली. भ्रष्टाचारमुक्त समाजनिर्मितीसाठी युवकांनी सक्रिय सहभाग घेणे ही काळाची गरज असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

शिधा पत्रिका धारकांना दिवाळी किट वाटप करा - ग्राहक पंचायतची मागणी:- अनिल बोर्डे

बीड : जिल्ह्यात यंदा कमी पाऊस आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील गरीब कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडली आहेत. शेतमजूर तसेच रोजंदारीवर काम करणाऱ्या गोरगरीब कुटुंबांना दिवाळीसाठी आवश्यक जीवनावश्यक वस्तू मिळवणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे उपजिल्हाध्यक्ष *अनिल बोर्डे यांनी तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांच्याकडे लेखी निवेदन देऊन मागणी केली की, सर्व शिधा पत्रिका धारकांना दिवाळीपूर्वी विशेष दिवाळी किट (गहू, तांदूळ, साखर, खाद्यतेल, तूरडाळ, हरभरा डाळ, रवा, मैदा) शिधा दुकानामार्फत पारदर्शकपणे वाटप करावे. विशेषतः दिव्यांग, विधवा महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अंत्योदय कार्डधारकांना प्राधान्य द्यावे. अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत चे जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी केली आहे.

अंबाजोगाईत तरुणाला मारहाण करुन कार आणि मोबाईल पळवला; तिघांवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई : अंबाजोगाई येथील आडस फाट्यावर एका तरुणाला भररस्त्यात मारहाण करून त्याची ६.११ लाख रुपयांची कार, ६९ हजारांचा मोबाईल आणि रोख रक्कम पळवून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी महादेव नारायण यादव (रा. ताकडगाव, जि. बीड) यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात कृष्णा काळे, सचिन काळे (दोघे रा. चांगतपुरी, जि. संभाजीनगर) आणि एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महादेव यादव यांनी त्यांच्या मित्राच्या सांगण्यावरून ६.११ लाख रुपये खर्चून फोर्ड इकोस्पोर्ट ही कार विकत घेतली होती. ३१ मे २०२६ रोजी ते प्रवासी घेऊन अंबाजोगाईकडे जात असताना, आडस फाट्यावर कृष्णा आणि सचिन काळे यांनी दुचाकी आडवी लावून गाडी थांबवली. त्यानंतर त्यांनी महादेवला खाली खेचून मारहाण केली, त्याचा मोबाईल रस्त्यावर आपटून फोडला आणि खिशातील ४,५०० रुपये काढून घेतले. आरोपींनी गाडीतील प्रवाशांना खाली उतरवून कारही पळवून नेली. सुरुवातीला तडजोडीची चर्चा झाल्याने महादेवने तक्रार दिली नव्हती; मात्र आरोपींनी गाडी स्क्रॅप केल्याचे सांगत जीवे मारण्याची धमकी दिल्याने अखेर २८ ऑक्टोबर रोजी पोलिसात रीतसर फिर्याद नोंदवली. पुढील तपास अंबाजोगाई पोलीस करत आहेत.

सत्तेच्या सारीपाटावर सगळे सोबतीला, तरीही सतीश चव्हाण यांचा पराभव!

18 वर्षांच्या वर्चस्वाला मतदारांचा धक्का; अहंकार, पैशाची मस्ती आणि पदवीधरांच्या नाराजीची राजकीय वर्तुळात चर्चा

अंबाजोगाई : राजकारणात सत्ता, पैसा, मोठी नेतेमंडळी आणि भक्कम निवडणूक यंत्रणा असली, तरी मतदारांच्या मनात स्थान निर्माण करता आले नाही, तर विजयाची खात्री देता येत नाही. छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत आ. सतीश चव्हाण यांच्या पराभवाच्या निमित्ताने हा राजकीय धडा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. गेल्या १८ वर्षांपासून पदवीधरांच्या राजकारणात प्रभाव राखणाऱ्या सतीश चव्हाण यांना यावेळी मतदारांनी धक्का दिल्याने मराठवाड्यातील राजकीय समीकरणांची नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

सतीश चव्हाण यांनी दीर्घकाळ पदवीधर मतदारांचा विश्वास संपादन केला होता. मात्र, कालांतराने मतदारांशी असलेला संवाद, त्यांच्या प्रश्नांवरील भूमिका आणि विकासकामांचा लेखाजोखा याबाबत नाराजी वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. निवडणुकीच्या काळात मतदारांशी संपर्क वाढविणे, विविध आश्वासने देणे आणि प्रचार यंत्रणेच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचणे एवढ्यापुरतेच राजकारण मर्यादित राहिल्याची टीका त्यांच्या विरोधकांकडून करण्यात येत होती. पदवीधरांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने काम करण्याऐवजी निवडणुकीच्या वेळीच सक्रिय होणाऱ्या नेतृत्वाला मतदारांनी यावेळी नाकारल्याचे या निकालातून स्पष्ट होत असल्याची चर्चा आहे.

महायुतीतील नेत्यांनी घेतली विरोधाची उघड भूमिका अन् पराभवाची नामुष्की!

या निवडणुकीत सतीश चव्हाण यांच्या विरोधातील राजकीय वातावरण अधिक तीव्र झाल्याचे दिसून आले. शिंदेसेनेचे मंत्री संजय शिरसाट,आमदार अब्दुल सत्तार,आमदार प्रशांत बंब यांच्यासह महायुतीतील विविध नेत्यांनी उघड विरोध केला त्यामुळे प्रतापसिंह पाटील यांच्या विजयासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाल्याचे मानले जात आहे. चव्हाण यांना पराभूत करण्यासाठी विविध राजकीय प्रवाहांतील नेते एकत्र आल्याचे चित्र या निवडणुकीत दिसले.

प्रतापसिंह पाटील यांना निवडणुकीचा मोठा अनुभव नसल्याची चर्चा असतानाही त्यांना मिळालेला पाठिंबा महत्त्वाचा ठरला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे यांच्यासारख्या अनुभवी नेत्याचे नियोजन आणि संघटनात्मक काम या लढतीत महत्त्वाचे ठरल्याचे राजकीय निरीक्षकांकडून सांगितले जात आहे. उमेदवाराची वैयक्तिक प्रतिमा, पक्षीय समीकरणे,स्थानिक नेतृत्वाचे प्रयत्न आणि मतदारांचा बदललेला कल या सर्व घटकांचा निकालावर परिणाम झाल्याचे मानले जात आहे.

बॅनरवरील चेहरे आणि राजकीय नाराजीची ठिणगी!

या निवडणुकीत प्रचाराच्या बॅनरवरील छायाचित्रांनाही राजकीय महत्त्व प्राप्त झाले. राज्यातील प्रमुख नेत्यांना काही प्रचारबॅनरवर स्थान न दिल्याने

नाराजी निर्माण झाल्याची चर्चा होती. विशेषतः बीड जिल्ह्यात प्रभाव असलेल्या ओबीसी नेतृत्वातील ना. पंकजाताई मुंडे आणि आ.धनंजय मुंडे यांचे छायाचित्र जालना जिल्ह्यातील काही प्रचारबॅनरवर नसल्याचा मुद्दा चर्चेत आला. या प्रकारामुळे बीड जिल्ह्यातील काही पदवीधर मतदारांमध्ये नाराजी निर्माण झाल्याचे बोलले जात आहे.

निवडणुकीतील विजयासाठी स्थानिक परिस्थितीनुसार प्रचाराचे नियोजन करणे आवश्यक असते; मात्र त्याचवेळी मित्रपक्षांचे नेते, त्यांचे समर्थक आणि विविध सामाजिक घटकांच्या भावनांचा विचार करणेही तितकेच महत्त्वाचे असते. प्रचारातील अशा बाबींमुळे मतदारांच्या मनात निर्माण झालेली नाराजी मतदानाच्या वेळी कोणत्या स्वरूपात व्यक्त होते, हे या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले आहे.

पदवीधरांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याची टीका

पदवीधर मतदारसंघ हा केवळ राजकीय प्रतिष्ठेचा विषय नसून सुशिक्षित बेरोजगार, नोकरीतील विविध समस्या, शिक्षण क्षेत्रातील प्रश्न आणि पदवीधरांच्या हक्कांसाठी आवाज उठविण्याचे व्यासपीठ आहे. त्यामुळे या मतदारसंघातून निवडून येणाऱ्या प्रतिनिधीकडून सातत्यपूर्ण कामाची अपेक्षा असते. सतीश चव्हाण यांच्या कार्यपद्धतीवर टीका करणाऱ्या मतदारांनी आणि राजकीय विरोधकांनी पदवीधरांच्या प्रश्नांवर अधिक ठोस भूमिका घेण्याची गरज व्यक्त केली होती.

पुणे येथे पदवीधरांच्या प्रश्नांसंदर्भात झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवरही चव्हाण यांच्या भूमिकेवर टीका झाल्याचे सांगितले जात आहे. पदवीधरांच्या प्रश्नांशी प्रत्यक्ष जोडले जाणे, आंदोलनस्थळी उपस्थित राहणे आणि त्यांच्या मागण्यांसाठी प्रभावी पाठपुरावा करणे या बाबी मतदारांच्या अपेक्षांमध्ये महत्त्वाच्या होत्या. या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत, अशी भावना काही मतदारांमध्ये निर्माण झाल्याचे या पराभवाच्या विश्लेषणातून पुढे येत आहे.

सहानुभूतीपेक्षा मतदारांनी निवडला बदलाचा पर्याय!

या निवडणुकीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या वातावरणाचाही राजकीय चर्चेत उल्लेख होत आहे. मात्र, सहानुभूतीचे वातावरण असले तरी मतदान करताना मतदारांनी स्थानिक प्रश्न, नेतृत्वाची कार्यपद्धती आणि बदलाची गरज यांना प्राधान्य दिले असावे, असे मानले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकीय वर्तुळातच वेगळ्या नेतृत्वाला संधी मिळाल्याने या निकालाला आणखी एक राजकीय संदर्भ प्राप्त झाला आहे.

तगडी यंत्रणा अपयशी; जनमताचा अंदाज चुकला!

सतीश चव्हाण यांच्याकडे मजबूत निवडणूक यंत्रणा, अनुभवी कार्यकर्ते आणि राजकीय संपर्कांचे मोठे जाळे होते. मात्र, केवळ संघटनात्मक ताकद आणि प्रचारातील संसाधने यांच्या जोरावर निवडणूक जिंकता येत नाही, हे या निकालाने दाखवून दिले. मतदारांशी थेट संवाद, कार्यकर्त्यांशी समन्वय, स्थानिक प्रश्नांची जाण आणि सामान्य मतदारांच्या अपेक्षांचा आदर या गोष्टी अधिक महत्त्वाच्या ठरतात.

ठराविक व्यक्तींच्या वर्तुळात राहणे, विरोधी मतांकडे दुर्लक्ष करणे आणि राजकीय वर्चस्वाबाबत अतिआत्मविश्वास बाळगणे यामुळे नेतृत्व जनतेपासून दूर जाऊ शकते. चव्हाण यांच्या पराभवाच्या निमित्ताने अशा कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दुसरीकडे, प्रतापसिंह पाटील यांना मिळालेला पाठिंबा हा केवळ एका उमेदवाराच्या बाजूने झालेला कौल नसून, प्रस्थापित नेतृत्वाला पर्याय देण्याच्या मतदारांच्या इच्छेचे प्रतिबिंब असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

सत्तेचा अहंकार मतपेटीत उतरतोच असे नाही!

या निवडणुकीचा सर्वांत महत्त्वाचा संदेश म्हणजे राजकारणात कोणताही विजय कायमस्वरूपी नसतो. अनेक वर्षे मतदारांचे प्रतिनिधित्व केले म्हणून त्यांचा पाठिंबा कायम राहील, असे गृहीत धरणे धोकादायक ठरू शकते. मतदारांच्या अपेक्षा बदलतात, प्रश्न बदलतात आणि त्यानुसार मतदानाचा निर्णयही बदलतो. त्यामुळे सत्ता, पैसा आणि नेत्यांची फौज यापेक्षा मतदारांशी असलेले नाते अधिक महत्त्वाचे असते.

प्रतापसिंह पाटील यांच्या विजयाच्या निमित्ताने विरोधी गटातील अनेकांना राजकीय समाधान मिळाले असले, तरी या निकालाचा खरा अर्थ पदवीधर मतदारांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांमध्ये शोधावा लागेल. मतदारांनी दिलेला कौल हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा नेत्याचा विजय-पराजय एवढ्यापुरता मर्यादित नसून, लोकशाहीत जनमत सर्वोच्च असल्याची आठवण करून देणारा आहे.

"अब ऊंट पहाड़ के नीचे आयेगा!" अशी प्रतिक्रिया या राजकीय घडामोडींनंतर व्यक्त होत असून, सत्तेचा अहंकार आणि जनमत यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

"सत्ता का गुरूर अब टूटता नजर आ रहा है,

मराठवाड़ा का मिज़ाज बदलता नजर आ रहा है!

ये जनता है जनाब, जब हिसाब करती है,

बड़े-बड़ों की सियासत भी खामोश करती है!"

पदवीधर मतदारसंघाच्या या निकालाने राजकीय नेत्यांसमोर एकच प्रश्न उभा केला आहे—मतदारांना केवळ निवडणुकीच्या काळात गृहीत धरायचे, की पाचही वर्षे त्यांच्या प्रश्नांसाठी प्रामाणिकपणे काम करायचे? कारण अखेरीस सत्ता नेत्यांकडे असली, तरी तिचा कौल देण्याचा अधिकार जनतेकडेच असतो.

डॉ. प्रतापसिंह पाटील विजयी झाल्याने गंगापुरात जल्लोष

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२९: मराठवाडा पदवीधर मतदार संघातून महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(शरद पवार पक्ष) डॉक्टर प्रताप सिंह पाटील विजयी झाल्याने गंगापुर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांची आतिषबाजी करून पेढे भरून जल्लोषात आनंदोत्सव साजरा केला.

यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष विश्वजीत चव्हाण तालुकाध्यक्ष सूर्यकांत थोरात ॲड.महेंद्र राऊत जिल्हा सरचिटणीस एडवोकेट जीबी चव्हाण काशिनाथ धरफळे जयराम लोंढे , कृष्णा ताठे किरण थोरात संतोष डोंगरे, मनीष राऊत शहराध्यक्ष संतोष काटकर नईम शेख आदींसह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एमजीएमकडून निकिता तौर यांना पीएचडी प्रदान

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या आंतरविद्या अभ्यास शाखेच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात संशोधक निकिता तौर यांना 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील वाचकांच्या समाधान पातळीचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. त्यांना प्रा.डॉ.रसिका वडाळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल निकिता तौर यांचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, प्राध्यापक व सर्व संबंधितांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

आचार्य विनम्रसागरजी महाराज यांच्या सान्निध्यात भक्तामर विधान

प्रवचनातून धर्माचरण, संयम आणि आत्मशुद्धीचा संदेश

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : श्री भक्तामर महामंडल विधान व पूजन महोत्सवाच्या सहाव्या दिवशी आचार्य भगवंत श्री विनम्रसागरजी महाराज यांच्या सान्निध्यात विविध धार्मिक अनुष्ठाने भक्तिमय वातावरणात पार पडली. यावेळी देशमुखनगर येथे चातुर्मास करणाऱ्या आर्यिकारत्न विनयश्री माताजी ससंघ यांचे विधानस्थळी मंगल पदार्पण झाले. त्यांच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली.

यावेळी संजय, सौ. अनिता, सौ. रक्षा व सौरभ पहाडे परिवाराला आचार्यश्रींच्या पादप्रक्षालनाचा, तर मंदाबाई शामलाल पाडे परिवाराला आरतीचा लाभ मिळाला. प्रास्ताविक पंचायत अध्यक्ष महावीर पाटनी यांनी केले. दीपप्रज्वलन चंद्रसागर धर्मशाळा व वेरूळ क्षेत्राच्या पदाधिकाऱ्यांनी केले. आचार्यश्रींनी प्रवचनातून धर्माचरण, संयम, विनय, करुणा व आत्मचिंतनाचे महत्त्व सांगितले. जिनेंद्र भक्ती केवळ कर्मकांडापुरती मर्यादित न ठेवता ती आचरणातून व्यक्त झाली पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला. भक्तामर स्तोत्र पठण, संगीतमय पूजन व अर्घ्य समर्पणात भाविक सहभागी झाले.

जिन्सी पोलीस ठाण्यातील 52 बेवारस दुचाकी वाहनांचा 30 ऑक्टोबर रोजी लिलाव

छत्रपती संभाजीनगर, दि. 29 (जिमाका) : जिन्सी पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर शहर येथे विविध कंपन्यांची एकूण ५२ बेवारस दुचाकी वाहने जमा आहेत. या वाहनांच्या मालकांनी वाहनांची ओळख पटवून आवश्यक मूळ कागदपत्रांसह पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा व आपली वाहने तीन दिवसांच्या आत परत घेऊन जावीत, असे आवाहन जिन्सी पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे. संबंधित वाहनधारकांनी जिन्सी पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर शहर येथे दूरध्वनी क्रमांक 0240-2240555 वर संपर्क साधावा. वाहनाची मालकी सिद्ध करणारी मूळ कागदपत्रे सादर करून वाहन ताब्यात घ्यावे. विहित मुदतीत कोणीही वाहनांवर मालकी हक्क सिद्ध न केल्यास, नियमानुसार आवश्यक कार्यवाही करून दि. 30 ऑक्टोबर 2026 रोजी 52 बेवारस दुचाकी वाहनांचा लिलाव करण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित वाहनमालकांनी याची नोंद घेऊन विहित मुदतीत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

वीर परिवार सहायता योजना ; माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना लाभ घेण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. 29 (जिमाका) : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या (NALSA) अंतर्गत वीर परिवार सहायता योजना २०२५ राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना विविध कायदेशीर प्रकरणांमध्ये विनामूल्य कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या योजनेच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लीगल सर्व्हिस क्लिनिक स्थापन करण्यात आले आहे. या माध्यमातून माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना कायदेशीर अडचणींचे निराकरण करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व विनामूल्य कायदेशीर सहाय्य मिळणार आहे. योजनेअंतर्गत फौजदारी प्रकरणे, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाशी (MAT) संबंधित प्रकरणे, सशस्त्र सेना न्यायाधिकरणातील (AFT) प्रकरणे तसेच उच्च न्यायालयातील (HC) प्रकरणांसाठी विनामूल्य कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तरी, संबंधित प्रकरणांमध्ये कायदेशीर मदतीची आवश्यकता असलेल्या सर्व माजी सैनिकांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लेफ्टनंट कर्नल शरद पांढरे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

फुलंब्रीत बीपीएल धारकांच्या तोंडचा साखरेचा घास पळवला! खामगावसह तालुक्यात 6 महिन्यांपासून साखर गायब, पुरवठा विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष फुलंब्री

(प्रतिनिधी) :-फुलंब्री तालुक्यातील खामगावसह स्वस्त धान्य दुकानांमधून बीपीएल व अंत्योदय लाभार्थ्यांना मिळणारी साखर गेल्या ६ महिन्यांपासून गायब झाली आहे. शासनाच्या नियमानुसार अंत्योदय कार्डधारकाला सवलतीच्या दरात दरमहा १ किलो साखर देणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात दुकानदार "वरूनच साखर आली नाही" असे सांगून लाभार्थ्यांना रिकाम्या हाताने परत पाठवत आहेत.

लाभार्थ्यांचा संताप याबाबत खामगाव, महालकिन्होळा, वडोद बाजार, ममनाबद , बोधेगाव , विरमगांव येथील बीपीएल धारकांशी संपर्क साधला असता त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

"आम्हाला अद्याप एकही किलो साखर मिळालेली नाही. प्रत्येक महिन्याला विचारतो, दुकानदार म्हणतो वरूनच साखर येत नाही. मग आमच्या नावावरची साखर जाते कुठे? अशी प्रतिक्रिया एका बीपीएल धारक महिलेने दिली.

"सणासुदीला गोडधोड करायला साखर लागते, पण रेशनमधून मिळत नाही. बाजारातून ५० रुपयांनी विकत घ्यावी लागते. गरीबांनी जगायचं कसं? असा सवाल आणखी एका लाभार्थ्याने उपस्थित केला.

काळाबाजाराचा संशय, धान्य दुकानात CCTV व बायोमेट्रिकचा बोजवारा

एकीकडे शासन गरीब कल्याणाच्या गप्पा मारत आहे, तर दुसरीकडे गरीबांच्या हक्काची साखर काळाबाजारात विकली जात असल्याचा गंभीर आरोप नागरिक करीत आहेत.

तालुक्यातील अनेक स्वस्त धान्य दुकानांमध्ये तर धक्कादायक प्रकार सुरू आहे.

ग्रामीण भागात आजही अनेक लाभधारकांना प्रतिव्यक्ती किती धान्य मिळते हेच माहित नाही. याचाच फायदा घेऊन काही दुकानदार कमी धान्य देतात. शासनाने प्रत्येक दुकानाबाहेर फलक लावून जनजागृती करावी, म्हणजे गरीबांची लूट थांबेल.

CCTV कॅमेरे बंद किंवा दिशाच बदललेले शासनाने प्रत्येक रेशन दुकानात CCTV बंधनकारक केले असताना, फुलंब्री तालुक्यातील ७०% दुकानांमध्ये CCTV एक तर बंद आहेत किंवा त्यांचे तोंड मुद्दाम दुसरीकडे वळवलेले आहे, जेणेकरून साखर वाटप होत नसल्याचा पुरावा राहू नये.

बायोमेट्रिक थम जागेवर घेतला जात नाही .लाभार्थ्याचा अंगठा दुकानातच घेणे बंधनकारक असताना, अनेक दुकानदार घरीच मशीन नेऊन अंगठे घेतात आणि धान्य वगहु तांदुळ साखर स्वतःच हडप करतात. प्रत्यक्षात लाभार्थी दुकानात आलाच नाही, तरी त्याच्या नावावर धान्य उचलल्याचे दाखवले जाते.

३० दिवस वाटपाचा नियम धाब्यावर :-शासनाच्या नियमानुसार महिन्यातील ३० दिवस धान्य वाटप करणे बंधनकारक असताना, अनेक दुकाने महिन्यातून फक्त २ ते ३ दिवसच उघडली जातात. गरीब मजूर, शेतमजूर वेळेत पोहोचू शकत नाही आणि त्यांच्या नावाचे धान्य, साखर गहु, तांदुळ हडप केली जाते.

फुलंब्री तालुक्यात जवळपास ८ ते १० हजार बीपीएल/AAY लाभार्थी आहेत. प्रति कार्ड १ किलो प्रमाणे दरमहा ८ ते १० टन साखर कुठे गायब होते? याचा पंचनामा करणे गरजेचे आहे.

मागणी तहसीलदार फुलंब्री व जिल्हा पुरवठा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी तात्काळ सर्व रेशन दुकानांची तपासणी करावी, प्रत्येक दुकानात CCTV सुरू आहेत का, बायोमेट्रिक थम जागेवर घेतला जातो का, व ३० दिवस वाटप होते का याची तपासणी करून थकीत साखरेसह गहु तांदुळ नियमित वाटप सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा खामगावसह तालुक्यातील बीपीएल धारकांनी दिला आहे.

वडनेर आश्रमशाळेत प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धांना उत्साहात सुरुवात

15 आश्रमशाळांतील 1100 खेळाडूंचा सहभाग; विविध क्रीडा प्रकारांत रंगणार सामने

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि. २९ ऑक्टोबर : आदिवासी विकास विभागाच्या छत्रपती संभाजीनगर प्रकल्पांतर्गत येणाऱ्या आठ शासकीय आणि सात अनुदानित अशा एकूण १५ आश्रमशाळांच्या प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धांना वडनेर येथील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत उत्साहात सुरुवात झाली. प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांच्या हस्ते क्रीडाध्वजारोहण आणि क्रीडाज्योत प्रज्वलित करून स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेत सुमारे ११०० विद्यार्थी खेळाडू सहभागी झाले आहेत.

उद्घाटनप्रसंगी लेखाधिकारी केवलसिंग सुंदर्डे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी बानेश्वर भगत, उद्धव वायाळ आणि सचिन पोटभरे, वैद्यकीय अधिकारी अभिषेक राठोड, एकलव्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पवनराजे सोनवणे, पंचायत समिती सदस्य कचरू सावंत, सरपंच मुलचंद पवार, राजू मोरे, वच्छाला मोरे आणि कडुबा मोरे यांची उपस्थिती होती. याशिवाय प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सर्व आश्रमशाळांचे मुख्याध्यापक, क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू आणि मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलन करून प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. ढोल-ताशांचा गजर आणि उपस्थितांच्या टाळ्यांच्या कडकडाटात क्रीडा स्पर्धांचा प्रारंभ झाला. या स्पर्धांमध्ये कबड्डी, खो-खो, रिले, व्हॉलिबॉल, भालाफेक, गोळाफेक, उंच उडी आणि लांब उडी अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. विविध शाळांतील खेळाडूंना आपले क्रीडाकौशल्य दाखविण्याची संधी या स्पर्धांच्या माध्यमातून मिळणार आहे. उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रकल्प अधिकारी चेतना मोरे म्हणाल्या, "विद्यार्थ्यांनी मैदानावर उतरून खेळांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक बळही वाढते. हार-जीत हा खेळाचा भाग असला, तरी जिद्द, चिकाटी आणि खिलाडूवृत्ती महत्त्वाची आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या संधीचे सोने करून विभागीय आणि राज्यस्तरावर चमकावे."

त्यांनी सर्व सहभागी खेळाडूंना शुभेच्छा देत क्रीडा स्पर्धांमधून नेतृत्वगुण, शिस्त आणि सांघिक भावना विकसित होण्यास मदत होत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वडनेर आश्रमशाळेचे मुख्याध्यापक किशोर वारे यांनी केले. सूत्रसंचालन सहयोग जावळे यांनी केले, तर प्रियंका शेवाळे यांनी आभार मानले. स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी वडनेर आश्रमशाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

आ. विलास भुमरे यांच्याहस्ते प्राचीन बालाजी मंदिरात विविध विकासकामांचे भूमिपूजन

तभा वृत्तसेवा

पैठण दि २९ :-वडवळी येथे श्री बालाजी लळीत यात्रा महोत्सवानिमित्त श्री बालाजी मंदिरात आमदार विलास बापू भुमरे यांनी मनोभावे दर्शन घेऊन श्री बालाजी चरणी सर्वांच्या सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली.

या शुभप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रा स्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत मंजूर २ कोटी निधीतून करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या हस्ते संपन्न झाले.

या विकासकामांमुळे श्री बालाजी मंदिर परिसराचा विकास होण्यासोबतच भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध होतील. तसेच वडवळीच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेला अधिक वैभव प्राप्त होईल असे मनोगत आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी व्यक्त केले.

यावेळी दूध संघाचे संचालक नंदलाल काळे सरपंच किशोर काळे सखाराम नाना शिंदे रामनाथ घोंगडे अशोक बर्डे संतराम नाना जाधव पांडू आप्पा जाधव विजय धोत्रे दत्ता मस्के लक्ष्मण मंडळ चेअरमन श्याम काळे, संभाजी काटे, दत्तात्रय आम्ले,सचिन देवकर सह ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पैठण तालुक्यातील तीर्थक्षेत्र मंदिर दर्जा ब मधील प्राचीन बालाजी मंदिर श्रीक्षेत्र वडवाळी या ठिकाणी २ कोटींचा निधी प्रस्तावित किचन शेड भोजन कक्ष बांधकाम व इतर अनुषंगिक कामे, स्वच्छतागृह काम व इतर अनुषंगिक कामे, सभागृह बांधकाम व इतर अनुषंगिक कामे, डोंब बांधकाम तसेच पिवर ब्लॉक बसवणे व इतर अनुषंगिक कामांचे भूमिपूजन आमदार विलास बापू भुमरे यांच्या हस्ते पार पडले.

लालवण शिवारात गांजाची बेकायदा लागवड; 52.97 लाखांचा मुद्देमाल जप्त

पिशोर पोलिसांची कारवाई; 141 झाडे जप्त, 66 वर्षीय आरोपीला अटक

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि. २९ ऑक्टोबर : पिशोर पोलिसांनी लालवण येथील पाडळी एकफाटा शिवारात बेकायदा गांजा लागवडीचा पर्दाफाश केला. २८ ऑक्टोबर रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत गांजाची १४१ झाडे जप्त करण्यात आली. या झाडांचे वजन १०५.१५ किलो असून, जप्त मुद्देमालाची अंदाजित किंमत ५२ लाख ९७ हजार ५०० रुपये आहे. या प्रकरणी चैनसिंग रतनसिंग बिमरोटे (वय ६६, रा. लालवण, ता. फुलंब्री) याला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांना लालवण येथील पाडळी एकफाटा शिवारातील गट क्रमांक २८ मधील शेतात बेकायदा गांजाची लागवड केल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी २८ ऑक्टोबर रोजी छापा टाकला. या वेळी संबंधित शेतात गांजाची लागवड केल्याचे आढळून आले. पंचांसमक्ष झाडांची मोजणी करून ती जप्त करण्यात आली.

आरोपीने कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता आर्थिक फायद्यासाठी गांजाची लागवड केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी अमली पदार्थ व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ (एनडीपीएस) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक डॉ. प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी आणि सहायक पोलीस अधीक्षक अपराजिता अग्निहोत्री यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. कन्नड शहर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक आरती पवार यांच्या उपस्थितीत सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली पथकाने ही कारवाई केली.

या पथकात सहायक फौजदार गजानन कराळे, पोलीस हवालदार दराडे, कैलास करवंदे, दत्तू लोखंडे, पोलीस कॉन्स्टेबल गणेश कव्वाल, कौतिक सपकाळ, पवन खंबाट, कृषी सहाय्यक नवनाथ खिल्लारे, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील आय-बाईकचे अंमलदार जोनवाल, होमगार्ड नितीन शिंदे व गजानन सोनवणे तसेच कन्नड येथील फॉरेन्सिक विभागाच्या पथकाचा समावेश होता. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी करीत आहेत.

सोयगाव येथे कैलासवासी नलिनीताई वसंतराव जामदार यांच्या उत्तरकार्यानिमित्त ह.भ.प.विशाल महाराज देशमुख,आळंदीकर यांची कीर्तनसेवा संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९ ऑक्टोबर : सोयगाव येथील ज्येष्ठ नागरिक चंद्रकांत मापारी,नगरसेवक किशोर मापारी व समाजप्रबोधनकार विष्णू मापारी यांच्या ज्येष्ठ भगिनी कैलासवासी नलिनीताई वसंतराव जामदार रा. शिंदखेडराजा जि.बुलढाणा ह.मु.सोयगाव यांच्या उत्तरकार्यानिमित्त सोयगाव येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध युवाकीर्तनकार ह.भ.प.विशाल महाराज देशमुख आळंदीकर यांची कीर्तनसेवा दि. २६ ऑक्टोंबर २०२६ सोमवार रोजी सायंकाळी संपन्न झाली. आपल्या रसाळ वाणीने देशमुख महाराजांनी भारतीय संस्कृतीचे सोळा संस्कार त्यापैकी जन्म-मृत्यूच्या बाबतीत सांगितलेले संस्कार याचे विश्लेषण अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले व मनुष्याने जीवनामध्ये आपल्या माता-पित्याची सेवा जिवंतपणीच करावी याबद्दल ठाम मत मांडले. त्याचप्रमाणे शरीरामध्ये जोपर्यंत राम आहे तोपर्यंत रामनाम घ्यावे असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी मृदंगसाथीला मृदंगविशारद सुधन्वा महाराज केनेकर व गायन साथीला शरद महाराज पवार, निवृत्ती महाराज मोहने, अर्जुन महाराज भगत व महामुनी अगस्ती महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे सर्व विद्यार्थी यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली व शेवटी मापारी परिवार यांनी सर्वांचे आभार मानले.

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर गंगापुर यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क. 807/2026 पुढील तारीख 03/12/2026

अर्जदार :1) सुरेश मुरलीधर खर्डे 2) भाऊसाहेब मुरलीधर खर्डे,3) शाईनाथ मुरलीधर खर्डे,अर्जदार क. 1 ते 3 रा.जाखमाथा, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर 4) अंजनाबाई अरुण शिंदे,रा. पिंपळवाडी, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर 5) सुमींद्राबाई उर्फ सुभद्राबाई भ्र.आप्पासाहेब उर्फ पिंटु बनसोडे, रा. माहुली, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर 6) उषा उर्फ जनाबाई वाल्मिक मोहन, रा.वैजापुर, ता. वैजापुर, जि.छ. संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :निरंक

प्रकरण :बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट 1827 चे कलम 2 प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.बी.सावंत, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन गंगुबाई मुरलीधर खर्डे हे मौजे गंगापुर, ता. गंगापुर येथील रहिवासी होते व दि.11/11/2022 रोजी गंगुबाई मुरलीधर खर्डे यांचा मौजे गंगापुर, ता. गंगापुर येथे मृत्यु झाला आहे. गंगुबाई मुरलीधर खर्डे यांचे पती मुरलीधर भिवराज खर्डे यांचा पण दि.30/11/2024 रोजी मौजे गंगापुर, ता. गंगापुर येथे मृत्यु झाला आहे. मयत गंगुबाई मुरलीधर खर्डे आणि मयत मुरलीधर भिवराज खर्डे हे आपसात पती पत्नी होते. त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. 1 ते 6 यांचा जन्म झाला आहे. मयतांना वर नमुद अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन वर नमुद अर्जदार यांच्या व्यतीरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाहीत. करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन 30 दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक 29/10/2026 रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, गंगापुर

जाहिर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) औरंगाबाद यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २४०१/२०२६

अर्जदार - १. द्रोपदाबाई गोपाल कल्याणकर, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. जय भवानी नगर, छ. संभाजीनगर, ता.जि. छ. संभाजीनगर. २. पन्नालाल गोपाल कल्याणकर, वय ५२ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ३. हिरालाल गोपाल कल्याणकर, वय ४७ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ४. बन्सिलाल गोपाल कल्याणकर, वय ४४ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ५. मोतीलाल गोपाल कल्याणकर, वय ४२ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध-

महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर.

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत गोपाल उर्फ लालागोपाल रामकृष्ण कल्याणकर यांचा दिनांक २४/०६/२०१७ रोजी नवदीप हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्रं. १ ते ५ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत गोपाल उर्फ लालागोपाल रामकृष्ण कल्याणकर यांचे वारस असून त्यांना शासकीय/निमशासकीय कामासाठी वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराला वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल, त्यांनी हे जाहिर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रांसह आपला आक्षेप नोंदवावा, अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दिनांक २७/१०/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १/१२/२०२६

आदेशावरून,

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय (क.स्तर), औरंगाबाद

जाहीर प्रगटन

मे. दिवाणी न्यायाधीश साहेब (क. स्तर) गंगापूर, जि. औरंगाबाद यांचे न्यायालयात

सिव्हील एम.ए. क्र. ८२४/२०२६

अर्जदार :१-अ) मनोज पि. मच्छिंद्र दहितुले, वयः ३७ वर्षे, धंदाः- खा. नोकरी, रा. जुने कायगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद १-ब) नितीनकुमार पि. मच्छिंद्र दहितुले, वयः ३५ वर्षे, धंदाः- खा. नोकरी रा. वरील प्रमाणे १-क) सौ. शीतल भ्र. प्रवीण महाले, वयः ३३ वर्षे, धंदाः- घरकाम, रा. महाले वस्ती, नगरसोल, ता. येवला, जि. नासिक १-ड) मिना भ्र. मच्छिंद्र दहितुले, वयः ५७ वर्षे, धंदाः- घरकाम, रा. जुने कायगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २-अ) सौ. अश्विनी भ्र. ज्ञानेश्वर ठोंबरे, वयः २९ वर्षे, धंदाः- घरकाम, रा. घर नं. ११४३, राम मंदीराजवळ, फुलंब्री, जि. औरंगाबाद २-ब) शुभम पि. रामनाथ दहितुले, वयः २७ वर्षे, धंदाः खा. नोकरी, रा. जुने कायगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २-क) सविता भ्र. रामनाथ दहितुले, वयः ५० वर्षे, धंदाः- घरकाम, रा. जुने कायगाव, ता. गंगापूर, जि) औरंगाबाद ३-अ) सौ. गीता भ्र. गणेश नागले, वयः २८ वर्षे, धंदाः- घरकाम, रा. बाजार तळ, खटोड गल्ली, बेलापुर, श्रीरामपूर, जि. अहमदनगर ३-ब) सौ. अंजली भ्र. विनायक लोखंडे, वयः २६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. तेली गल्ली, वांभोरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर ३-क) रोहित पि. बाळासाहेब दहितुले, वयः २४ वर्षे, धंदाः- खा. नोकरी, रा. जुने कायगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ३-ड सागर पि. बाळासाहेब दहितुले, वयः- २२ वर्षे, धंदाः- खा. नोकरी, रा. वरील प्रमाणे३-इ) सुनीता भ्र. बाळासाहेब दहितुले, वयः ४५ वर्षे, धंदाः- घरकाम, रा. वरील प्रमाणे ४) सौ. हिराबाई भ्र. अशोक पेंढारे, वयः ५९ वर्षे, धंदाः- घरकाम, रा. वेरूळ, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद ५)सौ. सरस्वती भ्र. रघुनाथ उचित, वयः ५७ वर्षे, धंदाः- घरकाम, रा. प्लॉट नं. ३३, गट नं. १४१, एन-१३, वानखेडे नगर, औरंगाबाद ६) रा. ४६६, खळवाडी, उंदीरगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर मंगल भ्र. बापूसाहेब रोकडे, वयः- ५० वर्षे, धंदाः घरकाम

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरणः वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते कि, या मे. न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री पी.डी. देशपांडे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला असून त्यातील कथन की, एकनाथ कुंडलीक दहितुले व त्यांची पत्नी नामे परिगाबाई एकनाथ दहितुले हे अनुक्रमे दि. २५/०६/२०१७ व ११/०१/२०१९ रोजी वारले असून त्यांना तीन मयत मुले होती तसेच अर्जदार क्र. ४ ते ६ अश्या तीन मुली आहेत. मयत एकनाथ कुंडलीक दहितुले व मयत परिगाबाई एकनाथ दहितुले यांची मुले नामे १) मच्छिंद्र एकनाथ हे दि. ०७/०४/२०२१ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जदार नं. १-अ ते १-ड हे वारस आहेत. २) रामनाथ @ रामभाऊ एकनाथ हे दि. १०/१०/२००६ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जदार नं. २-अ ते २-क हे वारस आहेत. ३) बाळासाहेब एकनाथ हे दि.०३/०५/२०१७ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जदार नं. ३-अ ते ३-इ हे वारस आहेत. मयत एकनाथ कुंडलीक दहितुले व मयत परिगाबाई एकनाथ दहितुले यांना अर्जदारांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाही म्हणून त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकामी विनंती केली आहे. त्याअर्थी सर्व जनतेस सूचित करण्यात येते की सदर प्रकरणाशी कोणाचाही काही उजर किंवा आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचा उजर किंवा आक्षेप हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात वैयक्तिक किंवा त्यांचे विधीज्ञांमार्फत नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर किंवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांचे विनंती प्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र जारी करेल. करिता हे जाहीर प्रगटन आज दि. २९/१०/२०२६ आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

कनिष्ठ लिपिक. सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय (क. स्तर) गंगापूर

हरित ऊर्जेच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल; धाराशिवमध्ये संधींचे वारे

धाराशिव : आपली गावे, आपली शेती आणि आपल्या डोक्यावर पसरलेले आकाश हे केवळ आजच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नाहीत, तर ते येणाऱ्या पिढ्यांसाठीही एक अनमोल ठेवा आहेत. देशाची ऊर्जेची गरज सातत्याने वाढत असताना, सध्याच्या गरजा पूर्ण करण्यासोबतच भविष्यातील सुरक्षिततेसाठी हातभार लावणाऱ्या ऊर्जा स्रोतांकडे वळणे महत्त्वाचे झाले आहे.

भारताची ऊर्जेची मागणी वाढत असताना, नवीकरणीय ऊर्जेची भूमिका अधिक महत्त्वाची ठरत आहे. सौर आणि पवन ऊर्जा यांसारखे स्रोत निसर्गातून सातत्याने उपलब्ध होतात आणि त्यांचा वापर पुन्हा पुन्हा वीज निर्मितीसाठी करता येतो. केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या माहितीनुसार, भारतात सौर ऊर्जेची मोठी क्षमता आहे, तर महाराष्ट्र हा देशातील पवन ऊर्जा क्षमतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या राज्यांपैकी एक आहे.

महाराष्ट्रात नवीकरणीय ऊर्जेचा विस्तार वेगाने होत असून, देशाच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणात राज्य महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने दिलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत महाराष्ट्रात सुमारे ३३.३ गिगावॅट (GW) नवीकरणीय ऊर्जा निर्मिती क्षमता स्थापित झाली होती. यामध्ये सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, बगॅसवर आधारित सहवीज निर्मिती, जैवइंधन आणि जलविद्युत यांचा समावेश आहे. राज्याची नवीकरणीय ऊर्जा क्षमता लक्षणीयरीत्या वाढली असून, सौर आणि पवन ऊर्जा हे राज्याच्या ऊर्जा मिश्रणातील महत्त्वाचे घटक बनले आहेत. भारतातील हरित ऊर्जा निर्मिती करणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे.

सौर ऊर्जेनंतर पवन ऊर्जा हा नवीकरणीय ऊर्जेचा वेगाने विकसित होणारा महत्त्वाचा स्रोत आहे. पवन ऊर्जा निर्मिती क्षमतेच्या बाबतीत महाराष्ट्र देशात चौथ्या क्रमांकावर असून, राज्याची स्थापित क्षमता ६.४ गिगावॅट आहे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने (MEDA) याच वर्षाच्या सुरुवातीला केलेल्या अभ्यासानुसार, एकट्या धाराशिव जिल्ह्यात ७.४ गिगावॅट पवन ऊर्जा निर्मितीची क्षमता आहे. मात्र, डिसेंबर २०२५ पर्यंत यापैकी १० टक्क्यांहून कमी क्षमतेचा वापर करण्यात आला होता. भविष्यात महाराष्ट्रातील पवन ऊर्जा क्षेत्राच्या वाढीचे नेतृत्व करण्याची क्षमता असलेल्या महत्त्वाच्या प्रदेशांमध्येही धाराशिवचा समावेश या अहवालात करण्यात आला आहे.

सौर ऊर्जेमध्ये सूर्यप्रकाशाचे विजेमध्ये रूपांतर केले जाते, तर पवन ऊर्जेमध्ये वाऱ्याच्या वेगाचा वापर करून वीज निर्माण केली जाते. हे दोन्ही ऊर्जा स्रोत जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी करण्यास आणि स्वच्छ ऊर्जा व्यवस्थेकडे वाटचाल करण्यास मदत करू शकतात. मात्र, हरित ऊर्जेची संकल्पना केवळ वीज निर्मितीपुरती मर्यादित नाही. त्यामागे येणाऱ्या पिढ्यांसाठी चांगले पर्यावरण, स्वच्छ हवा आणि शाश्वत ऊर्जा व्यवस्था निर्माण करण्याची व्यापक संकल्पना आहे.

अग्रलेख

ईव्हीएम काय आणि बॅलेट काय!

ईव्हीएम, एसआयआरच्या नावाने बोटे मोडत आणि 'व्होट चोरी'च्या बोंबा ठोकत आपल्या अपयशावर सतत पांघरूण घालणाऱ्या आणि निरंतर नैराश्याचे प्रदर्शन करणाऱ्या काँग्रेसला महाराष्ट्रासह चार राज्यांत बॅलेट पेपर्सवर झालेल्या विधान परिषद निवडणुकांच्या निकालांनी आरसा दाखविला आहे. अद्याप सर्व निकाल आलेले नाहीत. पण, कौल स्पष्ट आहे. काँग्रेसचे अपयशही तेवढेच लख्ख आहे. एकूण विरोधकांची विश्वासार्हता किती या प्रश्नाचे उत्तर या निकालांनी दिले आहे आणि काँग्रेसने आत्मपरीक्षण करून स्वतःच्या कार्यपद्धतीत बदल करेपर्यंत निकाल मुळीच बदलणार नाहीत, हेही त्यांतून स्पष्ट झाले आहे.

निवडणुकीत पराभव होणे हा गुन्हा नाही. पण, पराभवाची कारणे शोधण्याऐवजी प्रत्येक वेळी निवडणूक प्रक्रियेवरच संशय व्यक्त करणे, त्यातही ईव्हीएम नको- बॅलेट पेपरच हवा, असा दुराग्रह करणे ही अलिकडे विरोधकांची सवय बनली आहे. काँग्रेसला तर दुसरा विषयच सापडत नाही. त्या दुराग्रहाला बॅलेट पेपर्सने दिलेले उत्तर साऱ्यांसमोर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विधान परिषद निवडणुकांतील काँग्रेसच्या कामगिरीवरून केलेली खोचक टिप्पणी याच संदर्भात लक्षात घेण्याजोगी आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि बिहार या चार राज्यांतील विधान परिषदेच्या २८ जागांसाठी मतदान झाले. ही निवडणूक प्रक्रिया बॅलेट पेपर्सद्वारे पार पडली. काँग्रेसने यापैकी १२ जागांवर उमेदवार उभे केले होते. पंतप्रधानांनी समाजमाध्यमांवरील संदेशातून काँग्रेसला किती जागा मिळाल्या, असा प्रश्न विचारत तिच्या ईव्हीएमविरोधी भूमिकेवर उपरोधिक टिप्पणी केली. या टिप्पणीमुळे काँग्रेसने भानावर आले पाहिजे.

चार राज्यांतील विधान परिषदांच्या २८ जागांवर मतदानासाठी ईव्हीएमऐवजी कागदी मतपत्रिकांचा अर्थात बॅलेट पेपर्सचा वापर करण्यात आला होता. तरीही निकाल बव्हंशी काँग्रेसच्या विरोधात गेला. एरवी ईव्हीएम नाकारत बॅलेट पेपर्सची मागणी रेटणाऱ्या काँग्रेस पक्षाने आपल्या राजकीय रणनीतीचा आणि संघटनात्मक ताकदीचा फेरआढावा घ्यावा, असे हा निकाल सांगतो. विशेषतः कर्नाटकात काँग्रेसचे सरकार असतानाही पक्षाला चारपैकी एकही जागा जिंकता आली नाही. याहून मोठा राजकीय धडा कोणता असू शकतो? गेल्या काही वर्षांत काँग्रेसने ईव्हीएमच्या विश्वासार्हतेविषयी वारंवार प्रश्न उपस्थित केले. निवडणुकीत पराभव झाल्यानंतर मतदान यंत्रांमध्ये गडबड झाल्याचा संशय व्यक्त करणे, ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपर वापरण्याचा आग्रह धरणे, मतदारयाद्यांमधील कथित अनियमिततेचा मुद्दा उपस्थित करणे, विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआर प्रक्रियेवर आक्षेप घेणे आणि 'व्होट चोरी'चा आरोप करणे, या गोष्टी काँग्रेसच्या जणू अंगवळणी पडल्या आहेत. निवडणूक प्रक्रियेबद्दल प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार विरोधी पक्षाला आहे. निवडणूक आयोगाच्या कामकाजावर योग्य ते प्रश्न उपस्थित करण्याचा हक्क देखील विरोधकांना आहे. परंतु प्रश्न विचारणे आणि प्रत्येक पराभवासाठी निवडणूक यंत्रणेला आणि यंत्रांना जबाबदार धरणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. ईव्हीएममध्ये गडबड झाल्याचा आरोप केला, तर त्याचे पुरावे द्यायला हवेत. मतदारयादीत अनियमितता असल्याचे म्हटले, तर नेमकी कोणती अनियमितता, किती मतदार प्रभावित झाले आणि त्याचा निकालावर काय परिणाम झाला, हे सप्रमाण दाखवायला हवे. केवळ संभ्रम निर्माण करून निवडणूक जिंकता येत नाही आणि विश्वासार्हताही कमावता येत नाही. संभ्रमाने मत बदलता येत नाही. काँग्रेसचे सरकार असलेल्या कर्नाटकातील निकाल विशेष लक्षवेधी ठरतो. राज्यातील सत्तेचा लाभ, संघटनात्मक यंत्रणा आणि वरिष्ठ नेतृत्वाची उपलब्धता या पृष्ठभूमीवर विधान परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेसने कर्नाटकात चांगली कामगिरी करणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात काँग्रेसला भोपळा मिळाला आणि भाजपा व जनता दल (सेक्युलर) यांच्या युतीने चारही जागा जिंकल्या. याचा अर्थ असा की, सरकार चालविणे आणि पक्षसंघटना बळकट ठेवणे व निवडणूक जिंकणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. मतदारांशी नियमित संपर्क आणि प्रभावी नेतृत्वाची जोड नसेल, तर सत्तेत असूनही पराभव स्वीकारावा लागू शकतो, असाही त्याचा अर्थ होतो. या अनुषंगाने काँग्रेसने पंतप्रधानांचे वक्तव्य गांभीर्याने घेतले पाहिजे. या निवडणुकांमध्ये आपण किती जागांवर उमेदवार उभे केले, किती ठिकाणी पक्षाला प्रभावी लढत देता आली आणि कोणत्या मतदारसंघांमध्ये संघटनात्मक कमतरता जाणवली, याचा व्यवस्थित आढावा घेतला गेला पाहिजे. पदवीधर आणि शिक्षकांमध्ये आपण कितपत विश्वासार्ह आहोत, हेही तपासले पाहिजे. केवळ सरकारविरोधी भाषणे किंवा राजकीय आरोप-प्रत्यारोप यामुळे या मतदारवर्गाचा विश्वास मिळविता येत नाही. त्यासाठी अभ्यासपूर्ण भूमिका आणि प्रत्यक्ष कामाची आवश्यकता असते. त्यासाठी आश्वासक असे नेतृत्व असावे लागते. पक्षाकडे ठोस असा कार्यक्रम असावा लागतो. त्या कार्यक्रमाची ठोस व विश्वासार्ह मांडणी करावी लागते. यातले काँग्रेसकडे काहीच नाही. आमचा भाजपा आणि मोदींना विरोध असल्यामुळे आम्हाला मत द्या, हा काही मुद्दा असू शकत नाही. ईव्हीएम किंवा बॅलेट यांची अदलाबदल कितीही केली तरी येणारे निकाल काँग्रेससाठी निराशाजनकच असतील. शेवटी मतदार तेच आहेत. त्यांनी ईव्हीएमही वापरले आहे. त्यांना विवेक आहे. तोच विवेक त्यांनी बॅलेट पेपरच्या माध्यमातून व्यक्त केला एवढाच काय तो फरक आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी मतदारयाद्यांतील कथित अनियमितता आणि 'व्होट चोरी'च्या मुद्द्यांवरून निवडणूक प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करीत असतात. एसआयआर प्रक्रियेबाबतही विरोधी पक्षांनी आक्षेप घेतले आहेत. मात्र, राजकीय आरोपांची विश्वासार्हता टिकवायची असेल, तर त्यामागे ठोस पुरावे असणे गरजेचे आहे. काँग्रेसने आता तरी स्वतःला काही प्रश्न विचारले पाहिजेत आणि त्यांची प्रांजळ उत्तरे दिली पाहिजेत. त्यातील पहिला प्रश्न असा की, मतपत्रिकेवरील निवडणुकीतही आपल्याला यश मिळत नसेल, तर मतदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी आणखी काय करावे लागेल? दुसरा आणि त्यानंतरचे प्रश्न म्हणजे- आपल्या पक्षाची संघटना विविध स्तरांवर किती सक्रिय आहे? उमेदवार निवडताना काही चुकते आहे काय? पक्षाच्या धोरणांचा आणि नेतृत्वाच्या संदेशाचा मतदारांवर अपेक्षित परिणाम का होत नाही? या प्रश्नांची खरी उत्तरे शोधणे ही राजकीय परिपक्वता ठरेल. पराभवाचे खापर दुसऱ्यावर फोडून कोणताच पक्ष मोठा होत नसतो. भाजपा आज केंद्रात व अनेक राज्यांत सत्तेत आहे. पण, त्या पक्षाने भूतकाळात असंख्य पराभव अनुभवले. त्या अनुभवातून दुरुस्त्या केल्या आणि आता तो देशातील अव्वल क्रमांकाचा पक्ष आहे. हाच अव्वल क्रमांक एकेकाळी काँग्रेसकडे होता. आता तो पक्ष शेवटून पहिला येण्याच्या दिशेने घसरत चाललेला आहे. पराभवानंतर आत्मपरीक्षण करण्याऐवजी अन्य कारणांचा आधार घेण्याची प्रवृत्ती काँग्रेसमध्ये वाढत आहे, हे त्याचे कारण. काही कारणे विशिष्ट परिस्थितीत खरीही असू शकतात. परंतु प्रत्येक पराभवाचे स्पष्टीकरण बाहेरच शोधले, तर अंतर्गत सुधारणांकडे दुर्लक्षच होणार! मतदारांनी दाखविलेल्या आरशात स्वतःचे रूप नीट न्याहाळता न येणाऱ्या काँग्रेसच्या बाबतीत तेच घडते आहे. त्यामुळेच ईव्हीएम असो वा बॅलेट पेपर; निकाल ठरलेला आहे. तो बदलायचा असेल, तर काँग्रेसला बदलावे लागेल. निवडणूक जिंकण्यासाठी आत्मविश्वास लागतो आणि मतदारांचा विश्वास जिंकावा लागतो. काँग्रेसकडे आत्मविश्वास नाही. पक्षाचे संघटन नाही. मतदारांचा विश्वास जिंकण्याची क्षमता नाही. कारण त्यासाठी सर्वप्रथम स्वतःच्या अपयशाकडे प्रामाणिकपणे पाहण्याचे धैर्य दाखवावे लागते. पक्षाला तशी दिशा देणारे नेतृत्व असावे लागते. यातले काहीच नसेल तर ईव्हीएम काय आणि बॅलेट पेपर काय...! ■

प्रासंगिक

पराग मगर

ना तुम हमें जानो...

हिंदी चित्रपटसंगीताचा समृद्ध इतिहास, अजरामर गाणी, गायक-गायिका, संगीतकार, गीतकार आणि वादक यांच्या योगदानाचे दुर्मिळ व अचूक संदर्भ जपणारे ज्येष्ठ चित्रपटसंगीत अभ्यासक बिश्वनाथ चॅटर्जी यांनी आपल्या व्यासंगातून संगीताचा अनमोल ठेवा जतन केला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी विदर्भ साहित्य संघ आणि राष्ट्रभाषा परिवार, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑक्टोबर २०२६ रोजी विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त...

माणसाच्या मूलभूत गरजा कोणत्या, असा प्रश्न विचारला तर अन्न, वस्त्र आणि निवारा हेच उत्तर आपण देतो. भारतीय माणसाच्या भावविश्वाचा विचार केला, तर मात्र या यादीत आणखी एका गोष्टीची भर घालावी लागेल. ती म्हणजे हिंदी चित्रपटगीते! सुख-दुःख, आशा-निराशा यासह आयुष्याच्या प्रत्येक वळणावर ही गाणी भारतीय माणसाची सांगाती झाली आहेत. आज एका क्लिकवर या गीतांचे गायक, गीतकार, संगीतकार आणि चित्रपट यांची माहिती मिळू शकते. मात्र, या संदर्भांची सत्यता तपासणे, हरवलेले दुवे शोधणे आणि प्रत्येक नोंद अचूक ठेवणे यासाठी काही माणसांनी आपले आयुष्य खर्ची घातले. अशाच मोजक्या, पण महत्त्वाच्या नावांपैकी एक नाव म्हणजे नागपूरचे बिश्वनाथ चॅटर्जी! वयाची ८० वर्षे ओलांडलेली. कबीरनगरातील छोट्याशा फ्लॅटमध्ये त्यांचे वास्तव्य. अवतीभवती पुस्तकांचा ढीग. पुस्तकांच्या गर्दीतूनच त्यांच्या आयुष्याचा पट उलगडतो... १९३० ते १९८५ या काळातील हिंदी चित्रपटगीतांची माहिती संकलित करणाऱ्या गीतकोशाच्या सहा खंडांच्या निर्मितीत बिश्वनाथ चॅटर्जी यांचा मोलाचा सहभाग आहे.

पंचमदा, ओ. पी. नय्यर, शंकर-जयकिशन, किशोर कुमार, सुधीर फडके, खय्याम, मदन मोहन, वसंत देसाई आणि गुलजार यांच्या कामगिरीशी संबंधित कोशांचे संपादन त्यांनी विश्वास नेरूरकर यांच्यासोबत केले. एखाद्या गीताचे नाव सांगितले की, त्याचा चित्रपट, गीतकार आणि संगीतकार यांची माहिती त्यांना स्मरते. एखादी माहिती ऐकून घेण्यापेक्षा तिचा पुरावा शोधणे आणि संदर्भ पडताळून पाहणे, हीच त्यांच्या अभ्यासाची पद्धत आहे.

एका गाण्याने दिली दिशा : या संगीतप्रवासाची सुरुवात झाली ती शालेय वयात. १९६२ च्या सुमारास चॅटर्जी हे दीनानाथ विद्यालयात होते. लोखंडी पुलाखालून सायकलने घरी जाताना वसंत टॉकीजमध्ये चित्रपटाच्या मध्यंतरात 'ना तुम हमें जानो' हे गाणे वारंवार त्यांना ऐकायला मिळायचे. त्याचे शब्द त्यांच्या मनात घर करून गेले. गाण्याचे बोल मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. अखेर ते गाणे वाजवणारे कृष्णराव बब्बीरवार यांच्याकडून त्यांना ते शब्द मिळाले. या छोट्या प्रसंगातून एका मोठ्या विश्वाची ओळख झाली. गाण्याचे शब्द लिहिणारा गीतकार, त्याला चाल देणारा संगीतकार, गाणे सादर करणारा गायक आणि चित्रपटाचा दिग्दर्शकही वेगळा, हे त्यांना उमगले. त्यानंतर रेडिओवर वाजणारी गाणी ते लक्षपूर्वक ऐकू लागले. वृत्तपत्रांतील माहिती टिपून ठेवू लागले. चित्रपटांची माहिती देणारी बुकलेट्स आणि कॅटलॉग्स जमवू लागले. हळूहळू या संग्रहाचे रूपांतर स्वतंत्र संदर्भकोशात होऊ लागले.

मॅट्रिकनंतर नोकरी सुरू झाली, तरी हा छंद थांबला नाही. जयपूरमधील नोकरीच्या काळातही गाण्यांनी त्यांना सोबत केली. पुढे भोपाळमध्ये असताना एका पानपट्टीवाल्याकडे चित्रपटांच्या बुकलेट्सचा मोठा साठा असल्याचे त्यांच्या लक्षात आले. वारंवार चकरा मारून त्यांनी शेकडो बुकलेट्स मिळवली. एचएमव्हीच्या रेकॉर्ड्स खरेदी करणे, उपलब्ध साधनांतून माहिती मिळवणे आणि ती जतन करणे, हा त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाला.

एका चुकीने जुळले दोन धागे : चॅटर्जी यांच्या संशोधनाला निर्णायक दिशा देणारा आणखी एक प्रसंग 'स्क्रीन' या चित्रपटविषयक नियतकालिकाशी संबंधित आहे. त्यामध्ये १९५४ च्या 'मान' चित्रपटातील 'दम-भर का था दौर खुशी का' या गीताच्या गीतकाराचे नाव चुकीचे छापले गेले होते. चॅटर्जी यांच्या ते लक्षात आले. त्यांनी पत्र लिहून ही चूक निदर्शनास आणून दिली आणि गीतकार सफदर आह यांचे नाव योग्य असल्याचे नमूद केले. या पत्राची दखल घेत हरमंदिर सिंग यांच्याशी त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. दोघेही हिंदी चित्रपटगीतांचे संदर्भ जतन करण्याचे काम करीत असल्याचे स्पष्ट झाले. एकदा संगीतकार सलील चौधरी नागपूरला आले असताना चॅटर्जी यांनी त्यांच्याकडून गीतांची यादी पडताळून घेतली. बिमल रॉय यांच्या 'गौतम बुद्ध' माहितीपटाला पार्श्वसंगीत दिल्याचा संदर्भ स्वतः सलील चौधरी यांनाही त्या वेळी आठवत नव्हता. तलत महमूद यांची पत्रकार परिषद सुरू असताना चॅटर्जी यांना आवर्जून बोलावून घेण्यात आले. पत्रकारांनी तलत महमूद यांना त्यांनी आतापर्यंत किती गाणी गायिली, असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी साधारण ४०० गाणी गायिल्याचे सांगितले. चॅटर्जी यांनी तत्काळ आपल्या नोंदींचा दाखला देत त्यांच्या नावावर ७४८ गाण्यांची नोंद असल्याचे सांगितले. असाच एक हृद्य प्रसंग हृदयनाथ मंगेशकर यांच्याशी संबंधित आहे. वयाच्या ११ व्या वर्षी त्यांनी नौशाद यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली गायिलेले 'ये दुनिया कैसी है भगवान' हे गाणे चॅटर्जी यांनी कॅसेटवर ध्वनिमुद्रित करून त्यांना ऐकवले. इतक्या वर्षांपूर्वी ध्वनिमुद्रित झालेले हे गाणे पुन्हा ऐकण्याचा अनुभव हृदयनाथांसाठी विलक्षण होता.

माझ्या आनंदासाठी केले! : चॅटर्जी यांना किती परिश्रम घ्यावे लागले, किती वेळ आणि पैसा खर्च करावा लागला, याची कल्पना त्यांच्या जवळच्या माणसांनाच अधिक होती. पत्नी आजारी असताना एकदा त्यांनी त्यांना विचारले, एवढे परिश्रम घेऊन संदर्भ गोळा केले, पण त्याचा अपेक्षित मोबदला मिळाला नाही, याची खंत वाटत नाही का? या प्रश्नामागील भावना चॅटर्जी यांना समजत होती. आयुष्यभर जपलेल्या ध्यासाचे व्यावसायिक मूल्य कदाचित अपेक्षेइतके मिळाले नसेल; नागपूरमध्ये राहून काम करण्याच्या मर्यादाही त्यांना जाणवल्या. मात्र, गाणी हा त्यांचा प्राण आणि त्यांतील अचूकता हा त्यांचा छंद! हे काम त्यांनी स्वतःच्या आनंदासाठी केले. आपल्या माहितीचा उपयोग इतरांना होतो, संशोधकांना संदर्भ मिळतात आणि विस्मृतीत गेलेल्या गीतांना नवे आयुष्य मिळते, यापेक्षा मोठे समाधान कोणते, अशी त्यांची भावना आहे.

आजही संदर्भांच्या शोधात : चॅटर्जी यांचे घर सांगीतिक ग्रंथालयासारखे वाटते. चित्रपट आणि संगीताविषयी नवे पुस्तक प्रसिद्ध झाले की ते विकत घेणे, त्यातील संदर्भ तपासणे आणि चूक आढळल्यास संबंधितांच्या निदर्शनास आणून देणे, हा त्यांचा दिनक्रम आहे. अनेक जण त्यांना फोन करून माहिती विचारतात. उपलब्ध नोंदींच्या आधारे ते शक्य तितकी माहिती देतात. त्यांच्या या कार्यामुळे भारतीय चित्रपट संगीताचा एक महत्त्वाचा सांस्कृतिक वारसा पुढील पिढ्यांसाठी जतन झाला. ■

८२७५५५३५६६

वेध

विजय निचकवडे

नियमांचे बंधन नव्हे, जबाबदारी!

आमची मानसिकता झाली आहे, प्रत्येक गोष्टीचा सोयीस्कररीत्या अर्थ लावून आपल्याला हवे तेच करत जाण्याची. त्यातच स्वतःला आम्ही धन्य मानतो. समाजात वावरताना अनेक नियमांचे पालन करावे, अशी अपेक्षा असते. ती शासन, प्रशासन किंवा आणखी कुणाकडून केली जात असेल, परंतु नियमांचे बंधन लावून घेणार असू तर आम्ही नागरिक कुठले? जे काही नियम आहेत, ते केवळ पोलिस, प्रशासन आणि यंत्रणांसाठी असाच आमचा समज आहे. म्हणूनच तर कारवाईच्या भीतीने नियमांना जवळ करून, क्षणात त्याचा विसर पडणारे 'शिक्षित' आम्ही पाहतो. पण खरंच नियम पोलिसांसाठी किंवा प्रशासनासाठी पाळायचे की स्वतःच्या सुरक्षेसाठी, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

नियम पाळायचे म्हटले की, अनेकांच्या कपाळावर आठ्या पडतात; नियम घालणाऱ्यांना कुठे हे सगळं करावं लागते, असं म्हणत आणि सोयीस्कररित्या ते नियम किती चुकीचे आहेत, हे भासविण्याचा प्रयत्न करतो. त्यावर तोडगा, पर्याय सुचविण्यातही आम्ही कमी नाही. हे असं नको, असं हवं, असे सांगून पळवाट दाखविण्यात आमचा हात कुणीच पकडू शकत नाही. वाहतुकीचा सिग्नल लाल झाला की थांबायचे, हेल्मेट घालायचे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखायची, रांगेत उभे राहायचे, वीज आणि पाण्याचा अपव्यय टाळायचा, कर वेळेवर भरायचा... नियमांची यादी मोठी आहे. मात्र, या नियमांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन काय आहे, हा खरा प्रश्न आहे. नियम पाळायचे ते पोलिसांच्या भीतीने, दंडाच्या धास्तीने की स्वतःच्या आणि समाजाच्या सुरक्षिततेसाठी? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. कारण नियमांचे उल्लंघन करताना आपण अनेकदा शासनाला आव्हान देत असल्याच्या आविर्भावात वावरतो. प्रत्यक्षात मात्र नियम मोडून आपण स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून घेत असतो. आता दुष्काळी परिस्थिती आहे. भविष्यातील संकट ओळखून शासन-प्रशासनाने काही निर्णय घेतले, परंतु ते घेताना टाकलेली बंधनेही आम्हाला चुकीची वाटू लागली आहेत. बोअरवेल खोदण्यास घातलेली बंदी रोजगार, आर्थिक संकट, व्यवसायावर आघात अशा अनेक गोष्टींचा आधार घेत कशी चुकीची आहे, हे सांगण्याचा प्रयत्न होत आहे. परंतु, भविष्यातील संकटाचा विचार होणार नाही. खरं तर बोअरवेलचे खोदकाम करताना आम्ही कोणते लावून दिलेले नियम पाळतो का, हा प्रश्न अशावेळी पडायला हवा. कोणतेही नियम न पाळता होणारे खोदकाम आज अनेक गोष्टींसाठी कारणीभूत आहे. भूगर्भातील पाणी आटू लागले आहे. तरीही जर बंदीचा निर्णय वेगळ्या अर्थाने चर्चेत येत असेल तर नक्कीच नियमांचे पालन न करणे घातक कुणासाठी? याचा विचार व्हायला हवा. आज ही बंधने आपण स्वतःवर टाकून घेणार असू तरच पुढचे दिवस समाधानाचे असतील, हे समजण्याची गरज आहे.

नियमांकडे कुणीतरी जबरदस्तीने लादलेले बंधन म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. वाहतुकीचे नियम हा केवळ पोलिसांच्या महसुलाचा विषय नाही; ते आपल्या जीविताचे संरक्षण करणारे कवच आहे. त्याचप्रमाणे इतर नियमही केवळ सरकारी यंत्रणेच्या सोयीसाठी तयार केलेले नसतात. त्यामागे सार्वजनिक हित, सुरक्षितता आणि सामाजिक शिस्तीचा विचार असतो, ही भावना आज प्रत्येकाच्या मनात रुजणे गरजेचे आहे. नियमांची मोडतोड करताना कदाचित आपल्याला क्षणिक सोय मिळणार असेल, नियमांचा पराभव केला, असा आविर्भावही मनात येईल, पण त्याचे दुष्परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागतात. आपण नियम पाळणार असू तर ते एक सामाजिक दायित्व म्हणून ओळखले जाईल. केवळ 'मीच का?' असा विचार न करताना 'माझ्यापासून का नाही?' असा विचार करण्याची वेळ आली आहे. आपले अनुकरण लेकरं करतात, याची जाणीव तरी आपण ठेवायला हवी. पोलिसांच्या भीतीने नव्हे, तर स्वतःच्या जबाबदारीच्या जाणिवेतून, आपला विवेक जागा आहे म्हणून नियमांचे पालन करण्याची गरज आहे. कारण शेवटी प्रश्न शासनाचा महसूल वाचवण्याचा, प्रशासनाची प्रतिष्ठा राखण्याचा नाही, तर आपल्या आयुष्याचा आणि समाजाच्या सुरक्षिततेचा आहे. शेवटी काय तर नियम मोडून आपण व्यवस्थेला चकवा देऊ शकतो, पण नियम मोडल्याच होणारे व्यक्तिगत, सामाजिक परिणाम मात्र आपल्याला चुकवता येतीलच असे नाही. ■

९७६३७१३४१७

दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

वादग्रस्त विधानांची मालिका

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वडिलांबाबत केलेल्या अवमानजनक विधानामुळे देशात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या मुद्यावर भाजपाने आक्रमक भूमिका घेणे स्वाभाविकही आहे. खडगे वयाने आणि अनुभवाने सर्वांत ज्येष्ठ नेते आहेत. संयमी, मुत्सद्दी आणि प्रगल्भ नेते अशी त्यांची प्रतिमा आहे. त्यामुळे त्यांच्यासारख्या नेत्याकडून पंतप्रधानांच्या वडिलांबाबत अशा विधानाची अपेक्षा नव्हती. विशेष म्हणजे खडगे यांनी मोदी यांचा असा अवमानजनक उल्लेख करण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०२३ मध्ये कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात खडगे यांनी मोदी यांची तुलना 'जहरीला सांप' अशी केली होती. यावरून गदारोळ झाल्यानंतर खडगे यांनी कोलांटउडी मारत मी हा शब्द मोदी यांच्यासाठी नाही तर भाजपाच्या विचारधारेसाठी वापरला, असा न पटणारा खुलासा केला होता.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे त्यांच्या बेजबाबदार विधानासाठी आणि वागणुकीसाठी ओळखले जातात. खडगे यांनी राहुल गांधी यांना सुधारावे, अशी अपेक्षा असताना राहुल गांधी यांनीच खडगे यांना बिघडवले की काय, अशी शंका आता सर्वांनाच येऊ लागली आहे. खडगे यांच्या तोंडून अनवधानाने असे विधान निघाले असेल तरी, त्यासाठी त्यांनी आतापर्यंत माफी मागितलेली दिसली नाही. राजकारणातील नेत्यांनी वादग्रस्त विधान करण्याची आपल्या देशातील ही पहिली वेळ नाही. आतापर्यंत किमान डझन दोन डझन नेत्यांनी अशी वादग्रस्त विधाने करत खळबळ उडवली आहे. प्रसिद्धी मिळवण्यासाठी वा चर्चेत राहण्यासाठी पुष्कळवेळा राजकीय नेते अशी विधाने करत असतात. एखादे विधान अंगलट येत आहे, असे दिसले तर माझ्या विधानाचा विरोधकांनी विपर्यास केला, मला तसे बोलायचे नव्हते, असे म्हणायला हे नेते मोकळे असतात. खूपच झाले तर खेद व्यक्त करून हे नेते काही झालेच नाही, अशा आविर्भावात वागू लागतात. विशेष म्हणजे अशी वादग्रस्त विधाने करण्यात कोणत्याच पक्षाचे नेते मागे नसतात. विरोधी वा सत्ताधारी असा फरक यात राहत नाही. मात्र तुलनात्मकदृष्ट्या विचार केला तर काँग्रेस नेते यात आघाडीवर दिसतात.

२००७ मध्ये गुजरात विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सोनिया गांधींनी नरेंद्र मोदी यांचा उल्लेख 'मौत का सौदागर' असा केला होता. मोदी तेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री होते. काँग्रेसचेच अन्य एक नेते मणिशंकर अय्यर यांनी २०१४ च्या आधी मोदी यांचा 'चायवाला' असा खिल्ली उडवणारा उल्लेख केला होता. २०१७ मध्ये अय्यर यांनी मोदी यांना 'नीच किस्म का आदमी' असे म्हटले होते. अय्यर यांनी मोदी यांना चायवाला असे म्हटले त्याचा भाजपाला लोकसभा निवडणुकीत फायदाच झाला. भाजपाने देशभर 'चाय पे चर्चा' कार्यक्रमाचे आयोजन करत याचा राजकीय फायदा उचलला होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत हरयाणातील अंबाला येथील सभेत बोलताना काँग्रेसच्या प्रियांका वढेरा यांनी मोदी यांची तुलना महाभारतातील दुर्योधनाशी केली होता. राहुल गांधी यांनी केलेल्या वादग्रस्त विधानांची तर मोठी मालिकाच आहे. २०१९ मध्ये कर्नाटकातील कोलार येथील एका सभेत राहुल गांधी यांनी 'सर्व चोरांचे आडनाव मोदी का असते', असे विधान करत खळबळ उडवली होती. विशेष म्हणजे या प्रकरणात न्यायालयाने त्यांना दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षाही सुनावली होती. त्यामुळे राहुल गांधींना आपले लोकसभा सदस्यत्व गमवावे लागले होते.

२०१४ मध्ये भिवंडी येथील सभेत राहुल गांधी यांनी महात्मा गांधी यांच्या हत्येसाठी रा. स्व. संघ जबाबदार असल्याचा खोडसाळ, निराधार आरोप केला होता. या प्रकरणी माफी न मागितल्यामुळे त्यांच्यावर खटलाही चालला होता. या प्रकरणात सात्यकी सावरकर यांनी फौजदारी मानहानीचा खटला दाखल केला, त्यावर 'माफी मागायला मी काही सावरकर नाही', असे आणखी एक वादग्रस्त विधान राहुल गांधी यांनी केले होते.

मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंह यांनी आपल्या वादग्रस्त विधानाने आपल्या पक्षाला आणि सरकारला अनेकवेळा अडचणीत आणले आहे. संपुआ सरकारच्या काळात दोन सत्ताकेंद्रे (सोनिया गांधी आणि डॉ. मनमोहनसिंग) योग्य प्रकारे काम करत नसल्याचा आरोप दिग्गीराजा यांनी करत आपल्याच पक्षाला आणि सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला होता. पुलवामा घटनेनंतर दिग्विजयसिंह यांनी सर्जिकल स्ट्राईकवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्याचे पुरावे मागितले होते. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम हटवण्याच्या निर्णयाला विरोध करत दिग्विजयसिंह यांनी काँग्रेस सरकार सत्तेत आल्यावर ३७० कलम पुन्हा बहाल करण्याचे आश्वासन दिले होते. हिंदू लोक गोमांस खात असल्याचा तसेच सावरकरही गोमांसभक्त असल्याचा आरोप दिग्विजयसिंह यांनी केला होता. रा. स्व. संघाची तुलना दिग्विजयसिंह यांनी पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) शी केली होती तसेच ओसामा बिन लादेन यांचा उल्लेख 'ओसामाजी' असा आदरार्थी करत आपली लायकी दाखवली होती.

काँग्रेसचे सर्वांत जास्त नुकसान भाजपा आणि भाजपा नेत्यांनी नाही तर काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेत्यांनीच केले, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. गेल्या १५ ते २० वर्षांत देशातील राजकारणाचा पोत बदलला आहे. त्याच्या आधीचे राजकारणी, मग ते कोणत्याही पक्षाचे असो, समोरच्या नेत्यावर टीका करतानाही आपल्या भाषेचा दर्जा आणि पातळी घसरणार नाही, याची काळजी घेत असत. बोलण्याच्या ओघात एखादा वावगा शब्द तोंडातून निघून गेला तर मनाचा मोठेपणा दाखवत माफी मागायलाही मागेपुढे पाहत नव्हते. कारण त्या काळातील सर्वच नेते सभ्य आणि सुसंस्कृत होते.

आजच्या काळातील नेत्यांबद्दल काही सन्माननीय अपवाद वगळता असे म्हणता येत नाही. सध्याच्या नेत्यांमध्ये वादग्रस्त विधाने करण्याची अहमहमिका लागल्याचे दिसते आहे. फक्त वादग्रस्त विधाने करूनच हे नेते थांबत नाही तर पातळी सोडत अश्लील आणि दुहेरी अर्थ निघणारी विधाने करायलाही कचरत नाहीत. समोर बसणाऱ्या लोकांनी टाळ्या वाजवल्या आणि खीखी केले की या नेत्यांना आणखी जोश येतो. त्यामुळे नेत्यांकडून, मग ते कोणत्याही पक्षाचे असले तरी, सभ्यतेची तसेची सुसंस्कृतपणाची अपेक्षा आपल्याला करता येईल का? ■

९८८१७१७८१७

राष्ट्रीय सुरक्षेपेक्षा बांधकामे महत्त्वाची आहेत का?

'हिंदू जनजागृती समिती'च्या 'सुराज्य अभियाना'ने समोर आणलेल्या एका गंभीर माहितीनुसार, वरळी येथील नौदलाच्या 'आयएनएस त्राटा' या अतिसंवेदनशील तळाजवळ एका इमारतीची मंजूर उंची अचानक ७० मीटरवरून तब्बल १८३ मीटरपर्यंत वाढवण्यात आली आहे. एका संवेदनशील लष्करी तळाच्या जवळ इतकी उंच इमारत उभी राहणे, हा राष्ट्रीय सुरक्षेशी थेट जोडलेला गंभीर प्रश्न आहे. आजच्या आधुनिक काळात ड्रोन, लांब पल्ल्याचे कॅमेरे आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कोणत्याही उंच इमारतीवरून संवेदनशील हालचालींवर लक्ष ठेवणे सहज शक्य झाले आहे. असे असताना, अशा बांधकामांना मंजुरी मिळतेच कशी?

या संपूर्ण प्रकरणात 'हिंदू जनजागृती समिती'ने सुराज्य अभियानांतर्गत हा गंभीर प्रकार सातत्याने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला. या पाठपुराव्याचाच परिणाम म्हणून केंद्र सरकारने या प्रकरणी तातडीने पावले उचलत न्यायालयात धाव घेतली. एक सजग नागरिक म्हणून आपण सर्वांनी अशीच सतर्कता बाळगणे अत्यंत गरजेचे आहे, या राष्ट्रहिताच्या कार्याबद्दल हिंदू जनजागृती समितीचे अभिनंदन!

या निमित्ताने काही महत्त्वाचे प्रश्न पुन्हा ऐरणीवर येतात : राष्ट्रीय सुरक्षेपेक्षा बांधकामे महत्त्वाची आहेत का?, संरक्षण दलांचे 'ना-हरकत' बंधनकारक नाही का?, नियमांची अवहेलना वारंवार का होते? न्यायालयाने प्रशासनाला यावर उत्तर मागितले आहे. न्यायालयीन प्रक्रिया तिचे काम करेलच; परंतु एक नागरिक म्हणून आपण या विषयाकडे केवळ बातमी म्हणून पाहू शकत नाही.

आपल्या शहरांचा विकास आणि पुनर्विकास नक्कीच झाला पाहिजे, पण तो देशाच्या सुरक्षेची किंमत मोजून तर नक्कीच नाही आणि यासाठी सामान्य नागरिकांनी सुद्धा सतर्क राहणे आवश्यक आहे. आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची जाण ठेवून वागलो तरच सुराज्य निर्माण होईल.

वर्षा आवदे/नागपूर

■■■

वाचक पत्रे

जिल्ह्यात भूजलाने गाठला तळ!

'तरुण भारत' शनिवार २४ ऑक्टोबर २०२६ च्या बातमीनुसार महाराष्ट्रात ३५३ पैकी २२३ तालुक्यांमध्ये भूजल दुष्काळ असताना नागपूर जिल्ह्याची स्थिती अधिक गंभीर आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या ऑक्टोबर २०२६ च्या अहवालानुसार आणि राज्य सरकारच्या दुष्काळग्रस्त नागपूर जिल्ह्यातील सर्व १३ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर झालेले आहेत.

धरणांमध्ये पाण्याची कमतरता आहे. जिल्ह्यातील पाच प्रमुख धरणाची एकूण क्षमता १४४९.९९ एमसीएम असताना सध्या फक्त ८८४.९७ म्हणजेच ६१ टक्के पाणी शिल्लक आहे. गेल्या वर्षी या दिवशी १०० टक्के साठा होता. यामुळे खरीपसाठी लागणाऱ्या ५५० एमसीएमपैकी फक्त ४३६ एमसीएम पाणी उपलब्ध आहे, म्हणजे ११४ एमसीएमची तूट आणि ६५००० हेक्टर शेती धोक्यात आहे. नागपूर विभागातील ६४ पैकी ३१ तहसीलमध्ये १ ते २ मीटर आणि २७ तहसीलमध्ये १ मीटरपर्यंत घट नोंदवली आहे.

पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी नागपूर, अमरावती व कोकण विभागासाठी २५ ऑक्टोबरपर्यंत गावनिहाय टंचाई आराखडा तयार करण्याचे आदेश दिले. ७५ टक्क्यांपेक्षा जास्त काम पूर्ण झालेल्या जलजीवन मिशनच्या योजना तातडीचे पूर्ण करणे, टँकर हा शेवटचा पर्याय ठेवणे आणि विहीर पुनर्भरण, शेततळे व सिमेंट बंधारे यावर भर देण्याचे निर्देश दिले आहेत.

उपरोक्त आकडेवारी बघता यंदा उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवणार आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे व पाण्याची काटकसर करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी जनतेला अगोदरच दिलेले आहेत. या आदेशाचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. तथापि, उन्हामुळे होणारे तलावातील शिल्लक पाणीसाठ्याचे बाष्पीभवन कमी करण्यासाठी उपाय शोधणे आवश्यक आहे., असे वाटते.

शशिकांत दलाल/९८२२३६५१९०

■■■

दहनघाटांची स्वच्छता स्तुत्य उपक्रम

नुकताच मनपाने दहनघाट स्वच्छता कार्यक्रम राबवला. हा एक अत्यंत महत्त्वाचा विषय असून स्तुत्य उपक्रम आहे. गंभीर वातावरणात होणारा मनुष्य जीवनातील शेवटचा संस्कार इथे केला जातो. त्यापुढे १० ते १४ दिवसांपैकी काही विधी सुद्धा इथेच होतात. जीवनातील सर्व १५ संस्कार यथाशक्ती आनंदी व मंगलमय वातावरणात साजरे करण्यात येतात. हा अंतिम संस्कार सुद्धा तशाच वातावरणात व्हावा अशी स्वाभाविकच अपेक्षा असते. परंतु तेथील वातावरण बघितले तर कमालीची अस्वच्छता व दुर्गंधी मन खिन्न करून जाते. मनपाने याबाबत वेगळा विचार करावा. दहनघाटांची स्वच्छता हा विषय आजकाल प्रचलित असलेल्या 'सीएआर'मध्ये कंपन्यांना आवंटित करावा. ही व्यवस्था काटेकोरपणे पाळली जाईल व दहनघाटावरील उदासीन वातावरण हे अंतिम संस्काराकरितासुद्धा मंगलमय होईल, असे वाटते.

प्रमोद देशपांडे/९४२२१०५७२७

■■■

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

संक्षिप्त...

उदयगिरी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंगला सुरुवात

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २९ ऑक्टोबर : नवीन शैक्षणिक धोरण 'एनईपी' अंतर्गत विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा, या हेतूने महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातून तृतीय वर्षातील एकशे पंच्याहत्तर विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग देण्यास सुरुवात झाली आहे. कला, वाणिज्य, विज्ञान आणि संगणक शास्त्र या सर्व शाखांतील विद्यार्थ्यांना एकूण एकशे वीस तासांचे कौशल्य आधारित प्रशिक्षण देण्यात येत आहे. यामध्ये रोज आठ तास याप्रमाणे एकूण पंधरा दिवस प्रशिक्षण होणार आहे. प्रशिक्षणासाठी पेट्रोलियम कंपन्या, विविध प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, महाविद्यालय, सहलीचे नियोजन करणाऱ्या कंपन्या, पुरातत्व विभाग, ग्रामपंचायत कार्यालय, रक्त तपासणी प्रयोगशाळा, विविध औद्योगिक आस्थापना, नर्सरी, दूध उत्पादक संस्था, रक्त संकलन केंद्र, हवामान संशोधन प्रयोगशाळा, संगणक आधारित सेवा पुरवणाऱ्या कंपन्या, हॉटेल्स अशा विविध आस्थापनांमध्ये विद्यार्थ्यांना पाठवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबरच नवीन कौशल्य, प्रत्यक्ष कामाची पद्धत आणि रोजगारासाठी आवश्यक माहितीचे ज्ञान प्राप्त होणार आहे. सदरील प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के आणि उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ऑन जॉब ट्रेनिंग समन्वयक डॉ. एम. पी. मानकरी, विज्ञान विद्याशाखा समन्वयक प्रा. डॉ. बी. एस. होते, वाणिज्य विद्याशाखा समन्वयक प्रा. डॉ. बी. एस. होकरणे, कला विद्याशाखा समन्वयक प्रा. डॉ. बी. आर. दहिफळे, संगणकशास्त्र विद्याशाखा समन्वयक डॉ. एस. व्ही.आवाळे व सर्व शाखांच्या विभाग प्रमुखांच्या देखरेखीखाली सुरू आहे.

पदवीधर निवडणूकीतील विजय उत्सव साजरा

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २९ ऑक्टोबर : शहरात नुकत्याच संपन्न झालेल्या महाराष्ट्र विधानपरिषद निवडणुकीत महाविकास आघाडीच्या बाजूने कौल दिला असून मराठवाडा पदवीधर मतदारसंघ निवडणूकीत डॉ.प्रतापसिंह पाटील, पुणे पदवीधर मतदारसंघ निवडणूकीत सौ. हर्षदा जाधव देशमुख व नागपूर विभागात अभिजित वंजारी हे विजयी झाल्याबद्दल शिरूर अनंतपाळ शहरातील महात्मा बसवेश्र्वर चौक येथे फटाके वाजवून पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला

यावेळी शहरातील महात्मा बसवेश्र्वर चौक ते ग्रामदैवत अनंतपाळ मंदिर ते विठ्ठल रुक्मिणी मंदिर पर्यंत रैली काढून मान्यवरांच्या हस्ते नारळ फोडण्यात आले या वेळी उपस्थित महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या घोषणामुळे शहरातील वातावरण महाविकस आघाडीमय झाले होते या वेळी अडवोकेट संभाजीराव पाटील, महादेव आवाळे, बस्वराज मठपती, अशोक कोरे, व्यंकट हंद्राळे, तालुकाध्यक्ष रामेश्र्वर बिरादार, गुरूनाथ अचवले, अकबर तांबोळी, शिवदास उंबरगे, बाळासाहेब पाटील,युवक अध्यक्ष प्रतीक पारशेट्टे, सिध्देश्र्वर चाकुरे, गणपती चाकुरे,शैलेश वलांडे, विश्र्वजीत सांगवे,मनोज वाघमारे,इमाम शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

शोभा पवार यांच्या बिनविरोध निवडीचे जल्लोषात स्वागत

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक

तभा वृत्तसेवा

औसा दि. २९ ऑक्टोंबर - यावर्षी होत असलेल्या लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत भाजप,शिवसेना, राष्ट्रवादी ची महायुती तर काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेनेच्या महाविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहभाग घेतल्याने निवडणूक प्रतिष्ठेची झाली होती.या निवडणुकीत ओसा विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी गटातून आ. अभिमन्यू पवार यांच्या पत्नी सौ. शोभाताई अभिमन्यू पवार यांनी उमेदवारी दाखल केली होती. या गटातून तीन जणांनी माघार घेतल्याने औसा व तालुक्यात जल्लोषात स्वागत करण्यात आले आहे.

लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत यावेळी सर्वच राजकीय पक्षांच्या कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी सहभाग घेतल्याने होवू घातलेली निवडणूक चुरशीची झाली आहे. यामध्ये विद्यमान चेअरमन धीरज देशमुख यांची बिनविरोध निवड झाली आहे.यामुळे आणखी कितीजण बिनविरोध येणार.की या निवडणुकीत तडजोडी तून निवडणूक बिनविरोध होणार अशी अटकळ सुरू होती.मात्र मोजक्याच जागा बिनविरोध झाल्या आहेत.

लातूर जिल्ह्यात सहकारातील सर्वात मोठ्या आणि प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या या निवडणुकीत प्रत्येक गटातून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. १८ जागांसाठी होर्णाय़ा निवडणुकीत ७४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.बुधवार दि.४ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असून निवडणूक कोण लढवणार.आणि कोण कोण माघार घेणार.याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.विविध विकास सहकारी सेवा सोसायटी औसा गटातून विश्र्वनाथ बिराजदार,गोरख सावंत, युवराज बिराजदार यांनी माघार घेतली आहे.यामुळे या गटातून शोभा अभिमन्यू पवार यांचा एकमेव अर्ज राहिल्याने बिनविरोध निवड निश्र्चित मानली जात आहे.

संतोष मुक्ता,किरण उटगे, रमेश वळके, सुनील उटगे,संजय कुलकर्णी, उध्दव तेलंग, प्रवीण कोपरकर, बसवराज धाराशिवे, काकासाहेब मोरे,अँड. मुक्तेश्र्वर वागदरे, अँड अरविंद कुलकर्णी, जेष्ठ नेते सुशीलदादा भाजपाशी, बसवराज मिटकरी,ओसा तालुका भारतीय जनता पार्टी, ओबीसी मोर्चा, युवा मोर्चा चे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जल्लोषात स्वागत केले आहे.

नणंद येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर संपन्न

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २९ ऑक्टोबर : तालुक्यातील नणंद येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. जवळपास १४० लोकांची तपासणी झाली व ४८ रुग्णांना मोतीबिंदू आढळल्यामुळे त्यांना उदयगिरी रुग्णालय उदगीर येथे शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले.

उदयगिरी रुग्णालय उदगीर व शिवसेना शेतकरी सेना नणंद यांच्या संयुक्त विद्यमानाने मौजे. ननंद येथे डॉ. अनिलकुमार गायकवाड यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिवर ठेवण्यात आले. त्याप्रसंगी ननंद गावातील जवळपास १४० रुग्णांची तपासणी करण्यात आली व ४८ रुग्ण हे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी पात्र झाले. सर्व ४८ रुग्णांना उदयगिरी रुग्णालय उदगीर येथे आजच्या तारखेत शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले व राहिलेल्या रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे नियोजन शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी केले असून याबद्दल गावकऱ्यांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

श्यामार्य कन्या विद्यालयात पाचवी ते दहावीचा पालक मेळावा उत्साहात संपन्न

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २९ ऑक्टोबर : विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती अधिक प्रभावी करणे, त्यांच्या अंगभूत गुणांना वाव देणे आणि पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील परस्परसंबंध अधिक दृढ करणे, या उद्देशाने श्यामार्य कन्या विद्यालय, उदगीर येथे दिनांक २१ ते २४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. संस्थेचे अध्यक्ष ड. सुपोषपाणी आर्य यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद लाभला. उत्तरपत्रिका प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

या पालक मेळाव्याचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे घटक चाचणीतील सर्व विषयांच्या उत्तरपत्रिका पालकांना प्रत्यक्ष दाखविण्यात आल्या. त्यामुळे पालकांना आपल्या पाल्याची विषयवार तयारी, गुणप्राप्ती, लेखनकौशल्य, आकलनक्षमता आणि अभ्यासातील प्रगती यांचे वस्तुनिष्ठ चित्र समजून घेता आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जमेच्या बाजू ओळखण्याबरोबरच ज्या विषयांत अधिक सराव आणि मार्गदर्शनाची आवश्यकता आहे, त्याकडेही पालकांचे लक्ष वेधण्यात आले.

केवळ परीक्षेतील गुण जाणून घेणे एवढाच या उपक्रमाचा उद्देश नसून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सातत्याने सुधारणा घडवून आणण्यासाठी शाळा आणि पालक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, हा या आयोजनामागील मुख्य हेतू होता. उत्तरपत्रिकांच्या माध्यमातून शैक्षणिक प्रक्रियेत पारदर्शकता राखत पालकांना आपल्या पाल्याच्या प्रगतीत सक्रिय सहभाग घेण्याची संधी उपलब्ध झाली.

विशेष कर्तृत्ववान विद्यार्थ्यांचा गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.पालक मेळाव्याच्या निमित्ताने शैक्षणिक क्षेत्रात विशेष कर्तृत्व संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यात आले. या गौरवामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्र्वास, अभ्यासाची प्रेरणा आणि भविष्यात अधिक चांगली कामगिरी करण्याची उमेद निर्माण होण्यास मदत झाली.

या मेळाव्यात पालकांनी आपली मनोगते व्यक्त करून विद्यालयाच्या उपक्रमांविषयी सकारात्मक प्रतिक्रिया नोंदविल्या. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची प्रत्यक्ष माहिती मिळणे, सर्व विषयांच्या उत्तरपत्रिका पाहता येणे आणि शिक्षकांशी थेट संवाद साधता येणे, याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले. शाळेकडून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले.पालकांच्या सकारात्मक मनोगतांमुळे शाळा आणि पालक यांच्यातील विश्र्वासाचे नाते अधिक दृढ झाले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षकांना सहकार्य करण्याची आणि घरच्या घरी नियमित अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याची तयारीही पालकांच्या प्रतिसादातून दिसून आली.

पालक मेळाव्यासाठी उपस्थित राहिलेल्या पालकांच्या सोयीचा विचार करून विद्यालयाच्या वतीने चहा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या आदरातिथ्यामुळे पालकांना आपुलकीची भावना अनुभवता आली. शैक्षणिक चर्चेबरोबरच परस्पर संवाद आणि सुसंवादासाठीही पोषक वातावरण निर्माण झाले. पालकांच्या सहभागाचा सन्मान करणाऱ्या या व्यवस्थेमुळे मेळाव्याला अधिक आत्मीयतेची जोड मिळाली.

यावेळी श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड सुपोषपाणी आर्य ,संस्थेच्या सहसचिव अंजुमनीताई आर्य ,शालेय समिती सदस्य चटनाळे ताई, पालक प्रतिनिधी दुष्यंत तिरुके, राहुल लिमये यांनी नियोजनबद्ध पद्धतीने आयोजन केले व अन्य मान्यवर उपस्थित होते. सर्व वर्गांतील पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

महाविकास आघाडीच्या विजयाचा चाकुरात फटाके फोडून,पेढे भरवून जल्लोष

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २९ ऑक्टोबर : पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने ०५ पैकी ०३ जागांवर विजय मिळवत वर्चस्व सिद्ध केले आहे. या विजयाचा आनंदोत्सव चाकूर येथे दि. २९ ऑक्टोबर रोजी चाकूर शहरात मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील, पुणे पदवीधर मतदारसंघातून हर्षदा देशमुख आणि नागपूर पदवीधर मतदारसंघातून काँग्रेसचे ड. अभिजीत वंजारी यांनी दणदणीत विजय मिळवला. या पार्श्र्वभूमीवर चाकूर शहरात कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष विलासराव पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वाखाली शहरातील मज्जीद चौक, सोसायटी चौक, नगरपंचायत कमानी समोर, नवीन बस स्थानक चौक आणि मुख्य चौकात फटाक्यांची आतषबाजी करून आणि पेढे वाटून विजय साजरा करण्यात आला. यावेळी हलगीच्या निनादात कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरवले.

यावेळी कार्यकर्त्यांनी शरद पवार, राहुल गांधी, उद्धव ठाकरे, डॉ. प्रतापसिंह पाटील, अभिजीत वंजारी, हर्षदाताई देशमुख यांच्या नावाने तसेच बॅलेट पेपर जिंदाबाद, लोकशाहीचा विजय असो अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

या विजयोत्सवात पप्पू शेख, सलीम तांबोळी, साजीद लखनगावे, गंगाधर केराळे, संजय पाटील, कदीर शेख, रियाज पठाण, तबरेज मुजावर, गफूर मासूलदार, शिवकुमार गादगे, विजय धनेश्र्वर, अझहर सौदागर, अमन शेख, साहील पटेल, अकबर पटेल, सचिन चाकूरकर, इस्माईल सोनाले, मोठेराव ओम, गोविंद धोंडगे, भगवान जाधव, घडू पटेल, व्यंकट माने, अकबर शेख, इस्माईल शेख, तसकीन शेख यांच्यासह महाविकास आघाडीचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतमजुराची आत्महत्या; रविकांत तुपकरांकडून दहा लाखांच्या मदतीची व शासकीय नोकरीची मागणी

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २९ ऑक्टोबर : राणी अंकुलगा येथील मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या जुलमी आणि जाचक वसुलीच्या तगाद्यामुळे दत्तात्रय कुंभार या शेतमजुराने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केल्याची अत्यंत दुर्दे वी घटना समोर आली आहे. मृत शेतमजूर दत्तात्रेय कुंभार यांनी मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये मायक्रो फायनान्सच्या त्रासाचा स्पष्ट उल्लेख केल्यामुळे हा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेची गांभीर्याने दखल घेत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी थेट राणी अंकुलगा येथे जाऊन मृत शेतमजुराच्या घरी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली व त्यांचे सांत्वन केले.

यावेळी पिडीत महिलेने आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, पतीच्या अचानक जाण्याने कुटुंबावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला असून उरलेले आयुष्य कसे काढावे, असा प्रश्र्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनाने आपल्याला होईल तेवढी मदत करावी, अशी आर्त हाक तिने दिली. त्यावर उपस्थित प्रतिनिधींनी कुटुंबाच्या भावनांशी सहमती दर्शवत हे दुःख प्रचंड मोठे असल्याचे मान्य केले.

या प्रसंगी बोलताना रविकांत तुपकर यांनी राज्यातील आत्महत्येच्या गंभीर वास्तवावर प्रकाश टाकला. मृत दत्तात्रेय कुंभार यांनी चिठ्ठी लिहिल्यामुळे मायक्रो फायनान्सचा तगादा समोर आला, परंतु महाराष्ट्रात रोज अशा विविध कारणांमुळे वीस ते पंचवीस शेतकरी व शेतमजूर आत्महत्या करत आहेत. अनेक जण आत्महत्या करत असले तरी चिठ्ठी लिहीत नसल्याने बऱ्याच गोष्टी दडपल्या जातात. सर्वसामान्य नागरिकांचे व शेतमजुरांचे शोषण करणाऱ्या अशा मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या मनमानी कारभारावर आळा घालण्यासाठी प्रशासनाने तात्काळ कठोर पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच पीडित कुटुंबाला उभे करण्यासाठी शासनाने मृत शेतमजुराच्या पत्नीला शासकीय नोकरी द्यावी आणि कुटुंबाला तातडीने दहा लाखांची भरीव आर्थिक मदत जाहीर करावी, अशी आक्रमक मागणी लातूरमधील राणी अंकुलगा येथे करत जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष राजू कसबे , कोर कमिटी सदस्य राजेंद्र मोरे व क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

मंगलबाई चिल्लरगे यांचे निधन

तभा वृत्तसेवा

वलांडी दि, २९ ऑक्टोबर : देवणी तालुक्यातील वलांडी येथील रहिवासी मंगलबाई राजकुमार चिल्लरगे (वय ५७) यांचे गुरूवार दुपारी (ता.२९) अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी १० वा.वलांडी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्र्चात पती, एक मुलगा,तीन मुली,नातवंडे असा परिवार आहे.त्या सामाजिक कार्यकर्ते सुनिल चिल्लरगे यांच्या त्या मोठ्या वहिनी होत.

स्व.सुर्यभानराव पाटील यांच्या स्मरणार्थ धनंजय पाटील यांचा समाजसेवेचा वसा; गरजवंतासाठी आधारवड

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २९ ऑक्टोबर : समाजसेवक धनंजय सुर्यभानराव पाटील यांचे समाजकारण म्हणजे केवळ नावापुरते काम न करता, खऱ्या अर्थाने गरजवंताच्या अडी-अडचणीत धावून जाणे, हा वारसा स्व. सूर्यभानराव पाटील यांनी घालून दिला आणि त्यांचाच आदर्श त्यांचे सुपुत्र धनंजय पाटील हे गेली अनेक वर्षे अविरतपणे पुढे चालवत आहेत.

कोणताही गाजावाजा न करता, प्रसिद्धीपासून दूर राहून धनंजय पाटील यांच्याकडून वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. त्यांच्या या कार्यामुळे अनेक गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गावातील एखाद्या गरीब मुलीचे लग्न असेल तर भांडी-कुंडी पासून ते मंडपापर्यंत आणि अडचणीच्या वेळी आर्थिक मदत करण्यास धनंजय पाटील नेहमीच पुढे असतात. लेकीचे लग्न हे गावाचे लग्न या भावनेतून ते मदत करतात.

हिवाळ्याच्या कडाक्यात रस्त्यावर, झोपडीत राहणाऱ्या वृद्ध, निराधार लोकांसाठी दरवर्षी ब्लँकेट वाटपाचा उपक्रम ते राबवतात. त्यामुळे अनेक वृद्धांना थंडीपासून दिलासा मिळतो.

सगळ्यात कौतुकास्पद उपक्रम म्हणजे या वर्षी पंधरा क्विंटल साखर निराधार, विधवा महिला, वयोवृद्ध तसेच ज्याची अर्थीक परीस्थिती बिकट आहे अशा लोकांना देण्याचा निर्धार केला आहे दरवर्षी दिवाळी सणाला प्रत्येक गोरगरीब कुटुंबांना सण गोड करण्यासाठी (१० किलो साखर वाटप) केले जाते. दिवाळीचा फराळ प्रत्येकाच्या घरात व्हावा, हा त्यामागचा उद्देश. स्व. सूर्यभानराव पाटील यांच्या स्मरणार्थ हा उपक्रम गेली अनेक वर्षे अखंड सुरू आहे. दिवाळी सणाच्या निमित्ताने साखर स्वीकारताना सोमनाथ विठूबोने, सुरेखा सोनवणे, नामदेव पेठे, सखुबाई पांचाळ, पार्वती जाधव, सुखदेव शिंदे, विलास जाधव, प्रभू सोनवणे, सतीश चामले, सचिन सूर्यवंशी तसेच गावातील गरजू लोकांना प्रत्येक दहा किलो साखर देण्यात आली

धनंजय सुर्यभानराव पाटील यांच्या या निरपेक्ष समाजसेवेबद्दल गावकरी आणि परिसरातून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. वडिलांच्या नावाने समाजाचे देणे लागतो, या भावनेतून केलेले हे कार्य आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

दुष्काळामुळे मुद्रांक विक्रेत्यांच्या व्यवसायावर परिणाम

नागरीकांची आर्थिक परिस्थिती खालावल्याने व्यवहार मंदावले, अनेकांवर आर्थिक संकट

परभणी (प्रतिनिधी): जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थितीचे सावट निर्माण झाले असून, त्याचा फटका आता विविध व्यावसायिक क्षेत्रांनाही बसू लागला आहे. शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणींचा सामना करत असताना मुद्रांक विक्रेत्यांनाही व्यवसायातील मंदीचा सामना करावा लागत आहे. नागरिकांच्या हातातील पैसा कमी झाल्याने विविध व्यवहारांवर परिणाम होत असून, त्याचा थेट परिणाम मुद्रांक विक्रेत्यांच्या उत्पन्नावर होत असल्याचे चित्र आहे.

मुद्रांक विक्रेत्यांचा व्यवसाय हा नागरिकांच्या शासकीय आणि खासगी कामांशी संबंधित आहे. प्रतिज्ञापत्र, शपथपत्र, करारनामा, भाडेकरार तसेच विविध कार्यालयीन कामांसाठी मुद्रांकांची आवश्यकता असते. मात्र, आर्थिक परिस्थिती खालावल्याने नागरिकांकडून खर्चाबाबत हात आखडता घेतला जात आहे. परिणामी, विविध व्यवहारांची गती मंदावल्यास मुद्रांक विक्रेत्यांच्या व्यवसायावरही त्याचे परिणाम जाणवत आहेत.

जिल्ह्यातील शेतकरी वर्गाला दुष्काळसदृश परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने अनेक कुटुंबांचे आर्थिक नियोजन बिघडले आहे. शेतकऱ्यांच्या हातात पैसा कमी असल्याचा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेसह बाजारपेठेतील उलाढालीवरही होत आहे. या परिस्थितीत मुद्रांक विक्रेत्यांसमोर दुकानाचे भाडे, वीजबिल आणि कुटुंबाचा दैनंदिन खर्च भागविण्याचे आव्हान निर्माण होत आहे.

दुष्काळाच्या झळा केवळ शेतीपुरत्या मर्यादित राहत नसून, त्याचे परिणाम शेतीवर अवलंबून असलेल्या विविध व्यावसायिक घटकांनाही सहन करावे लागत आहेत. त्यामुळे मुद्रांक विक्रेत्यांसह अन्य छोट्या व्यावसायिकांच्या अडचणींचाही प्रशासनाने विचार करण्याची गरज व्यक्त होत आहे. व्यवसायातील मंदी, उत्पन्नातील घट आणि वाढता दैनंदिन खर्च यांचा आढावा घेऊन संबंधितांच्या समस्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. एकीकडे शेतकरी आर्थिक संकटाशी झुंज देत असताना दुसरीकडे त्यांच्या आर्थिक व्यवहारांवर अवलंबून असलेल्या छोट्या व्यावसायिकांनाही मंदीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे दुष्काळसदृश परिस्थितीत मुद्रांक विक्रेत्यांच्या व्यवसायाला दिलासा कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नरेंद्र पाटील उद्या जिल्हा दौऱ्यावर

परभणी: अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष (मंत्री दर्जा) नरेंद्र अण्णासाहेब पाटील हे शनिवारी दि.३१ रोजी परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.नरेंद्र पाटील शनिवारी सकाळी ११.३० वाजता परभणी येथील शासकीय विश्राम गृह येथे महामंडळाचे लाभार्थी व मराठा समाजातील विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत बैठक होईल.त्यानंतर दुपारी १२.३० वाजता शासकीय विश्राम गृह येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. दुपारी २.०० वाजता ते छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करणार आहेत. दरम्यान नरेंद्र पाटील यांच्या दौऱ्यामुळे लाभार्थ्यांच्या विविध अडचणींची सोडवणुक होणार आहे

जांभूळबेटच्या विकासासाठी १८५ कोटींचा निधी द्या:आ गुट्टे

परभणी (प्रतिनिधी): पालम तालुक्यातील निसर्गसंपन्न जांभूळबेट पर्यटनस्थळाच्या शाश्वत व नियोजनबद्ध विकासासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्याला मंजुरी देऊन १८५.१६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा,अशी आग्रही मागणी गंगाखेडचे आ.रत्नाकर गुट्टे यांनी केंद्रीय पर्यटनमंत्री गजेंद्र सिंह शेखावत याच्याकडे केली आहे.तसेच केंद्र सरकारच्या स्वदेश योजनेअंतर्गत जांभूळबेटचा समावेश करून या पर्यटनस्थळाचा सर्वांगीण विकास करावा, अशी मागणीही त्यांनी केली.

जांभूळबेट हे निसर्गसौंदर्याने नटलेले पर्यटनस्थळ असून, योग्य नियोजन आणि आधुनिक सुविधांच्या माध्यमातून या परिसराच्या विकासाला मोठी चालना मिळू शकते. पर्यटनस्थळाचा विकास झाल्यास स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, लघुव्यावसायिकांना व्यवसायाची संधी मिळेल आणि परिसरातील नागरिकांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल, असे आ.गुट्टे यांनी निवेदनात नमूद केले.गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील पर्यटनस्थळांच्या विकासातून स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती आणि आर्थिक समृद्धी साधण्याच्या दृष्टीने जांभूळबेटचा विकास महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे विकास आराखड्याला मंजुरी देऊन प्रस्तावित निधी उपलब्ध करून द्यावा, असा आग्रह आ.गुट्टे यांनी केंद्रीय मंत्र्यांकडे धरला आहे.

घरकुल योजनेसाठी कोणालाही पैसे देवू नका: सभापती

जिंतुर (प्रतिनिधी): केंद्र व राज्य शासनाच्या विविध घरकुल योजनांचा लाभ घेणाऱ्या नागरिकांनी घरकुल मंजुरीसाठी किंवा बांधकाम तपासणीच्या नावाखाली कोणत्याही व्यक्तीला पैसे देऊ नयेत, असे आवाहन पं.स.च्या सभापती सौ.अयोध्याताई खिस्ते व उपसभापती सौ.सोनाली दराडे यांनी केले आहे.

शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पात्र व गरजू कुटुंबांना स्वतःचे हक्काचे घर मिळावे, या उद्देशाने घरकुल योजनांची अंमलबजावणी केली जाते. या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पारदर्शक पद्धतीने पोहोचणे आवश्यक आहे. मात्र, घरकुल मंजूर करून देण्यासाठी, बांधकामाची तपासणी करण्यासाठी किंवा घरकुलाचा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी कोणी अनधिकृत पैशांची मागणी करत असेल,तर नागरिकांनी अशा मागणीला बळी पडू नये,असे आवाहन पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. घरकुल योजनेच्या प्रक्रियेमध्ये लाभार्थ्यांना विविध टप्प्यांवर

आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. तसेच बांधकामाच्या प्रगतीनुसार संबंधित अधिकाऱ्यांकडून तपासणी केली जाते. ही प्रक्रिया शासनाच्या नियमानुसार पार पडणे अपेक्षित आहे. त्यामुळे घरकुल मंजुरी, बांधकाम तपासणी किंवा हप्ते मिळवून देण्याच्या नावाखाली कोणी पैशांची मागणी केल्यास नागरिकांनी घाबरून न जाता संबंधित यंत्रणेकडे तक्रार करावी, असेही आवाहन करण्यात आले आहे. घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कोणत्याही व्यक्तीने अनधिकृत पैशांची मागणी केल्यास संबंधित व्यक्तीचे नाव, पद, पैशांची मागणी केल्याची तारीख, मागणीचा तपशील तसेच उपलब्ध असलेले इतर पुरावे यांसह वरिष्ठ अधिकारी किंवा सक्षम तक्रार निवारण यंत्रणेकडे लेखी तक्रार दाखल करावी. यामुळे संबंधित प्रकरणाची चौकशी करण्यास मदत होऊ शकते.

परभणीचे नुतन जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांची नियुक्ती

परभणी (प्रतिनिधी): जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण हे शनिवार दि.३१ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असुन त्यांच्या जागी आता अण्णासाहेब चव्हाण यांची नियुक्ती केली आहे.

नूतन जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण हे महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहत होते. या पदाचा पदभार भारतीय प्रशासकीय सेवेतील अनिल भंडारी यांच्याकडे सोपवून परभणीचे जिल्हाधिकारी म्हणून येत्या शनिवारी पदभार स्वीकारावा, असे या नियुक्तीपत्रात आदेशित करण्यात आले आहे. संजयसिंह चव्हाण यांच्या जिल्हाधिकारी पदाच्या कारकिर्दीत विविध निवडणूका यशस्वीरीत्या पार पडली. परभणी जिल्ह्यात कायदा आणि व्यवस्था राखण्याबाबत जिल्हाधिकारी म्हणून चव्हाण यांनी जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. परभणीसाठी नुतन जिल्हाधिकाऱ्यांकडून खुप अपेक्षा आहेत.

दिपावली सण अवघ्या काही दिवसावर येवून ठेपला आहे. दिपावलीनिमित्त लागणाऱ्या फटाक्यांची दुकाने शहरातील बसस्थानकाजवळील समद जिनिंगमध्ये उभी करण्याचे काम सध्या सुरू आहे. (छाया: श्रीकांत कुलकर्णी)

पाथरी-पोखर्णी रस्त्यावर बस दुचाकीचा अपघात, दोघांचा मृत्यू

पाथरी (प्रतिनिधी): राज्य महामार्ग ६१ वरील पोहे टाकळी शिवारात राज्य परिवहन महामंडळ व एका दुचाकीच्या धडकेत दोघा सालगड्याचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्देवी घटना बुधवार दि.२८ रोजी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास घडली.

कुलदीप शिसोदीया व अनारसिंग चव्हाण हे दोघे पोहेटाकळी शिवारातील एका शेतात सालगडी म्हणून काम करीत होते. मूळ मध्यप्रदेशातील हे दोघे बुधवार दि.२८ रोजी सायंकाळी एम.पी.६८=एम.जी.३३३५या दुचाकीवरुन एका ऊसाच्या

वाहनाला ओव्हरटेक करीत पुढे जात होते. त्याचवेळी पाथरीच्या दिशेने जाणाऱ्या एम.एच.२० बी.एल. ३५०१ या क्रमांकाच्या बसची व दुचाकीची समोरासमोर धडक झाली. त्यात ते दोघे जागीच मृत्यू पावले. दरम्यान या घटनेचे वृत्त कळाल्याबरोबर प्रत्यक्षदर्शनींनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान पोलिसही तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होते.

ग्रामपंचायतीच्या दप्तराच्या चौकशीसाठी उपोषणास सुरूवात

परभणी (प्रतिनिधी): तालुक्यातील पेडगाव येथील पाणीपुरवठ्याच्या गंभीर समस्येसह ग्रामपंचायतीच्या कामकाजातील कथित अनियमिततेच्या चौकशीसाठी अभय अनिलराव देशमुख यांनी गुरुवार, दि.२९ पासून पेडगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर असंख्य नागरिकांसह आमरण उपोषण सुरू केले आहे.

ग्रामपंचायत सदस्य स्नेहा अभय देशमुख यांनी केलेल्या तक्रारींवर अद्याप ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप करीत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. गावातील अनेक मान्यवरांनी या उपोषणास पाठिंबा दर्शवला आहे.

ग्रामपंचायतीचे मागील आठ महिन्यांचे प्रोसीडिंग बुक (इतिवृत्त नोंदवही), ग्रामपंचायतीचे ठराव आणि संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत, अशी प्रमुख मागणी अभय देशमुख यांनी केली आहे.ग्रामपंचायतीच्या कामकाजात पारदर्शकता राहावी आणि संबंधित नोंदींची पडताळणी व्हावी, यासाठी त्यांनी प्रशासनाकडे दाद मागितली आहे. ग्रामपंचायतीला १५ व्या वित्त आयोगातून प्राप्त झालेल्या निधीचा विनियोग कशा प्रकारे करण्यात आला, याचा सविस्तर हिशोब सादर करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. निधी खर्चाची तपासणी करून संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करावी आणि चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी भूमिका देशमुख यांनी मांडली आहे. पेडगावमधील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या प्रश्नावरही देशमुख यांनी लक्ष केंद्रित केले आहे. जुन्या नळपाणीपुरवठा योजनेची सखोल चौकशी करून गावात नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी त्यांची ठाम मागणी आहे. पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधेबाबत प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत उपस्थित करण्यात आलेले प्रश्न, निधी खर्चाचा हिशोब आणि नियमित पाणीपुरवठ्याची मागणी यावर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, या मागणीसाठी अभय देशमुख यांनी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे.

मासोळी प्रकल्पात १९ टक्के पाणीसाठी शिल्लक

गंगाखेड (प्रतिनिधी): शहरासह अनेक गावांची तहान भागविणाऱ्या मासोळी प्रकल्पात केवळ १९ टक्केच जिवंत पाणीसाठा शिल्लक राहिला असून तालुका प्रशासनाने भविष्यातील पाणी टंचाईचे संकट ओळखून तात्काळ या प्रकल्पातील पाणी उपशावर निर्बंध लादावेत, असा सूर उमटत आहे.

गंगाखेड तालुक्यात यावर्षी पुरेसा पाऊस झाला नाही. ठिकठिकाणी पावसाअभावी लघू व मध्यम जलसिंचन प्रकल्पांसह हातपंप व विहिरींच्याही पाणी पातळीत किंचीतही वाढ झाली नाही. त्याचा परिणाम आगामी काळात या तालुक्यात पाणी टंचाईचे संकट हे गडद होणार, विशेषतः अनेक गावांना भिषण पाणी टंचाईस सामोरे जावे लागणार, असे चित्र समोर आले आहे. या तालुक्यातील मासोळी प्रकल्पात केवळ १९ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे. धरणात एकूण १२.०८० दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध असून ५.१४० दशलक्ष घनमीटर जिवंत पाणीसाठा आहे. धरणातील पाणी पातळी ४१०.७५ मीटर एवढी आहे. जिवंत पाणीसाठा धरणाच्या क्षमतेच्या तूलनेत अवघ्या १९ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे आगामी काळात पाणी टंचाई भेडसावणार आहे.

ई-कचरा सरकारी संकलन केंद्रावर जमा करा: बिरगे

परभणी (प्रतिनिधी): खराब किंवा टाकाऊ इलेक्ट्रॉनिक वस्तू यांचा ई-कचरा हा अत्यंत घातक आहे त्यातील शिषे धातू मुळे जमिनीची अमलता वाढते,वायू प्रदूषण होते त्यामुळे हा घातक कचरा सरकारी ई कचरा संकलन यांच्याकडे जमा करावा असे आवाहन शिक्षणाधिकारी (मा) डॉ.सविता बिरगे यांनी केले.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्या विशेष मोहिम अंतर्गत ई कचरा व्यवस्थापनावर एक दिवसीय विशेष कार्यक्रम या संकल्पनेतून विद्यानिकेतन शिक्षण संस्थेच्या सावित्रीबाई फुले मुलींचे हायस्कूल येथे ई कचरा विद्यार्थी संवाद सोहळ्यात त्या

बोलत होत्या. यावेळी शाळेच्या विद्यार्थिनी कु. गौरी कदम कु. सोनम धुतडे, कु.भक्ती कदम यांनी ई कचरा म्हणजे काय आणि त्याचे दुष्परिणाम स्पष्ट केले. यावेळी मंचावर मुख्याध्यापिका सौ.जया जाधव,मुख्याध्यापक गणेश शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन यशवंत मकरद यानी केले. इ कचरा कमी करणे, पुनर्वापर करणे आणि पुनर्पक्रिया करणे हा संकल्प विध्यार्थीनिनी केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सावित्रीबाई फुले मुलींचे हायस्कूल आणि पारदेश्वर विद्यालय येथील शिक्षक यांनी परिश्रम घेतले

सेलूत कर्मचाऱ्यास मारहाण केल्याच्या निषेधार्थ आंदोलन

सेलू (प्रतिनिधी): नगरपालिकेच्या अभियंत्यांना कर्मचाऱ्यांसमक्ष शिवीगाळ करीत मारहाण केल्याच्या निषेधार्थ पालिकेतील संतप्त अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी मंगळवारी दिवसभर कामबंद आंदोलन केले.

पालिका कार्यालयात भाऊ सोनवणे, हरि काळे, बाळू काजळे, कपील पडूळ यांनी सर्व कर्मचाऱ्यांसमक्ष अभियंता अक्षय इंदापुरकर यांना शिवीगाळ करीत मारहाण केली. या प्रकाराने पालिकेतील कर्मचारी संतप्त झाले. यापूर्वी कर्मचारी पतपेढीचे अध्यक्ष शेख मोईन यांनाही याच पध्दतीने काही नगरसेवकांसह त्यांच्या नातेवाईकांनी शिवीगाळ करीत मारहाण केली होती. या पार्श्वभूमीवर या प्रकाराने संतप्त कर्मचाऱ्यांनी दुपारपासून काम बंद आंदोलन केले व जिल्हा प्रशासनास निवेदन पाठवून या प्रकारात संबधितांविरुध्द कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

सेलू (प्रतिनिधी): शहरात सध्या धुळीचे प्रमाण वाढल्याने वाहनधारकांसह पादचाऱ्यांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. याकडे संबंधीतांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे.

मानवत येथे मंदिर स्वच्छता उपक्रमास सुरूवात

मानवत (प्रतिनिधी): सनातन हिंदू जनजागृती समितीच्या वतीने शहरातील एकतानगर येथील मारुती मंदिरात मंदिर स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात समितीच्या कार्यकर्त्यांसह जिज्ञासूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मंदिर परिसर स्वच्छ केल्यानंतर तेथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना प्रसन्न वातावरणाचा अनुभव आला. या उपक्रमाचे भाविकांनी कौतुक केले.तसेच, आपल्या भागातील मंदिरांमध्येही अशा प्रकारचे स्वच्छता उपक्रम राबविण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. या उपक्रमात आपणही सहभागी होणार

असल्याचे भाविकांनी सांगितले. मंदिर हे श्रद्धेचे आणि भक्तीचे केंद्र असल्याने त्याची स्वच्छता राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मंदिर परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेऊन अशा उपक्रमांत सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या स्वच्छता उपक्रमासाठी समितीच्या सौ. अश्विनी रुद्रकंठवार, सौ.शितलताई लासे, सौ. मनिषाताई पिंपळे, साक्षीताई रुद्रकंठवार आणि कोमलताई नायबळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या वसुलीविरोधात आंदोलन

जिंतुर (प्रतिनिधी): तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी आणि महिला बचत गटांना मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या कथित सक्तीच्या वसुलीपासून दिलासा मिळावा, या मागणीसाठी आज जिंतूर येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन तहसील कार्यालयात देण्यात आले.

तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतीतील घटलेले उत्पादन आणि रोजगाराच्या मर्यादित संधी यांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी व महिला बचत गट आर्थिक अडचणीत सापडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.अशा परिस्थितीत काही मायक्रो फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी कर्जाच्या हप्त्यांच्या वसुलीसाठी घरी जाऊन दबाव आणणे,अपमानास्पद वागणूक देणे, धमकावणे तसेच बचत गटातील इतर महिलांना वेठीस धरणे, असे प्रकार करीत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.ग्रामीण कुटा फायनान्स, भारत फायनान्स, समस्ता फायनान्स,बीएसएस, एल अँड टी, क्रेडिट ॲक्सेस, स्वतंत्र फायनान्स यासह इतर वित्तीय संस्था,खासगी बँका आणि खासगी सावकारीच्या माध्यमातून होणाऱ्या वसुलीच्या पद्धतींची चौकशी करण्याची

मागणी करण्यात आली.

महिला बचत गटांची सक्तीची वसुली तातडीने थांबवावी, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर कर्जदारांना दिलासा देण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात आणि कर्जफेडीतील अडचणींमुळे लाभार्थ्यांच्या सीबीएल गुणांकनावर प्रतिकूल परिणाम होऊ नये,यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. तसेच, कर्जवसुलीदरम्यान धमकावणे, अपमानास्पद वागणूक देणे किंवा कायद्याच्या विरुद्ध दबाव आणणे

करावी. बेकायदेशीर खासगी सावकारीविरोधातही संबंधित विभागाने कार्यवाही करावी, असे निवेदनात म्हटले आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, कर्जमाफीसंदर्भातील पात्र लाभार्थ्यांच्या याद्या प्रसिद्ध कराव्यात आणि नवीन पीककर्ज उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली. शासकीय गायरान व वनीकरण जमिनींशी संबंधित नोंदींमुळे अडचणीत येणाऱ्या पात्र गरीब शेतकऱ्यांचा फार्मर आयडीचा प्रश्न मार्गी लावावा,जेणेकरून त्यांना पीककर्ज व इतर शासकीय योजनांचा लाभ मिळू शकेल.तसेच, गायरान जमिनींच्या सातबारा उताऱ्यावरील पोटखराब नोंदींची तपासणी करून नियमानुसार आवश्यक दुरुस्ती करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश द्यावेत,अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते शरद चव्हाण, प्रविन वाकळे नामदेव तुपसुंदर, राजु गंडले, दर्शन सुरवसे, काशिनाथ भदर्गे, शंकर वाघ,सुशिला सिंनगारे,हौसाबाई चव्हाण,मिरा सुंदर वाकळे, रत्नमाला घोगरे ,सिता घोगरे, रेणुका घोगरे राधा घोगरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

'जंक फूडला नकार, पौष्टिक आहाराचा स्वीकार' विषयावर व्याख्यान

परभणी : आयुर्वेद व्यासपीठ शाखेच्या वतीने श्री.धन्वंतरी जयंती सोहळ्या निमित्त रविवार, दि.१ नोव्हेंबर रोजी 'जंक फूडला द्या नकार, पौष्टिक आहाराचा करा स्वीकार!'या विषयावर मुंबई येथील प्रसिद्ध आहारतज्ज्ञ वैद्या डॉ. सौ. उर्मिला पिटकर यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले आहे. हे व्याख्यान स.११ वा.श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृह येथे होणार आहे. आधुनिक जीवनशैलीत जंक फूडचे वाढते सेवन आणि त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेता, संतुलित व पौष्टिक आहाराचे महत्त्व नागरिकांना समजावून सांगणे हा या व्याख्यानाचा उद्देश आहे. डॉ.उर्मिला पिटकर या बी.ए.एम.एस., एम.डी. असून,त्यांनी सुवर्णपदक प्राप्त केले आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणाधिकारी संजय रसाळे राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरू डॉ. इंद्रमणी आणि विशेष अतिथी म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. किशोर सुरवसे उपस्थित राहणार आहेत.या व्याख्यानाचा परभणीतील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष डॉ. विनोद पत्की यांनी केले आहे.

जाहिर प्रगटन

आमचे पक्षकार **श्री अमोल बालकिशन बाहेती** वय ३७ वर्ष रा.शिक्षक कॉलनी, पाथरी यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे पक्षाकार यांनी गट नं १३९/२ मौ. पाथरी ता.पाथरी येथील मुळ मालक १.**बहिनाबाई रावसाहेब नाईक, २. योगेश रावसाहेब नाईक, ३. शैलेश रावसाहेब नाईक** यांची सामायिक मालकीच्या एकुण क्षेत्र हे.१७ आर (१७ आर) पैकी १० आर क्षेत्र खरेदी करण्याचा करार केला आहे.गट क्र नं १३९/२ मौ. पाथरी ता.पाथरी, एकुण क्षेत्र.१७ आर (१७ आर) पैकी खरेदी व्यवहाराचे क्षेत्र १० आर (१०,००० चौ.पुट apporox.)उर्वरीत ०७ आर (मुळ मालकांकडे शिल्लक) असुन खरेदीचा करार पुर्ण होवून इसारा पावती (Advance Token) झाली असुन लवकरच नोंदणीकृत खरेदी खत करण्यात येणार आहे. **चतुःसिमाः पुर्वेस-राष्ट्रीय महामार्ग, पश्चिमेस-अंतर्गत रस्ता, दक्षिणेस- अच्युत दिगांबर नाईक यांचे क्षेत्र, उत्तरेस- विक्री करणाऱ्याचा उर्वरीत भाग.**

तरी या जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील वर्णन केलेल्या १० आर मिळकतीशी व तिच्या हक्काशी कोणाचाही काहीही संबंध, अधिकार, अन्नवस्त्र, गहान, दान, भाडेपट्टा, खरेदीचा करार, न्यायालयीन वाद, बँक कर्ज किंवा इतर कोणताही बोजा किंवा हक्क असल्यास, त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ८ (आठ) दिवसाच्या आत आमच्या खालील स्वाक्षरीकारांच्या कार्यालयात आवश्यक ते सर्व मुळ कागदपत्रांच्या आणि पुराव्यांच्या प्रतींसह लेखी आक्षेप नोंदवावा.

मुदतीत कोणताही आक्षेप न आल्यास सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बोजांपासुन मुक्त व निर्धोक आहे असे समजुन आमचे पक्षकार पुढील खरेदी खताची नोंदणी प्रक्रिया पुर्ण करतील. त्यानंतर आलेला कोणताही आक्षेप किंवा दावा आमचे पक्षकार अथवा सदर जमिनीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.१९/०८/ २०२६, ठिकाण- पाथरी

आमचे वकील
ॲड.टी.बी.कुलकर्णी
(वकील, पाथरी)

जाहीर प्रगटन देणार
श्री अमोल बालकिशन बाहेती
(रा. शिक्षक कॉलनी, पाथरी)

नंदीनगर खून प्रकरणातील १२ आरोपींना काही तासांत अटक

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२९ ऑक्टोबर -

जिल्ह्यातील मुदखेड शहरातील नंदीनगर परिसरात जुन्या भांडणाच्या कारणावरून दोन गटांत झालेल्या वादात मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या २० वर्षीय तरुणाची दगड-विटांनी मारहाण करून हत्या करण्यात आली. या गंभीर घटनेनंतर मुदखेड पोलिसांनी वेगाने तपासचक्रे फिरवत अवघ्या काही तासांत १२ आरोपींना अटक केली. पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

जुन्या वादातून हाणामारी; मध्यस्थी करणाऱ्या तरुणाचा मृत्यू

दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारच्या सुमारास नंदीनगर परिसरात भिमराव नकलवाड आणि शेषराव नकलवाड यांच्या गटांमध्ये जुन्या भांडणाच्या कारणावरून वाद उफाळून आला. यावेळी गल्लीतील इतर नागरिकांसह अर्जुन ऊर्फ अजय शिवाजी नकलवाड (वय २०, व्यवसाय मजुरी, रा. नंदीनगर, मुदखेड) हा तरुण भांडण सोडविण्यासाठी मध्यस्थी करण्यास गेला होता.

मात्र, वाद मिटविण्याचा प्रयत्न करणाऱ्या अर्जुनवर आरोपींनी हल्ला केला. त्याच्या छातीवर दगड आणि विटांनी जबर मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेला अर्जुन जमिनीवर कोसळला. त्याला तातडीने उपचारासाठी मुदखेड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

१२ आरोपींना पोलिसांनी घेतले ताब्यात

या प्रकरणी मृत तरुणाची आई लक्ष्मीबाई शिवाजी नकलवाड यांच्या तक्रारीवरून मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २२७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), १८९(२), १९० आणि १९१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नांदेडचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी आरोपींना तातडीने अटक करून कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले. अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील आणि नांदेड ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक माणिक बेद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेड पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी विविध पथके तयार केली.

गुन्हा दाखल होताच पोलिसांनी शोधमोहीम राबवून अवघ्या काही तासांत १२ आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींच्या सहभागाची खात्री करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्यांना मुदखेड न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कराड, सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना राठोड, पोलीस उपनिरीक्षक सुरेश जाधव, राजेश नंद, आकाश सरोदे तसेच पोलीस अंमलदार ठाकूर, पाटील, म्हैसनवाड, चक्रधर, झुंझारे, वानोळे, कारमुंगे आणि पुणेबोईनवाड यांच्या पथकाने केली.

जुन्या वादातून झालेल्या या हत्येने नंदीनगर परिसरात खळबळ उडाली असून, या प्रकरणाचा पुढील तपास मुदखेड पोलीस करीत आहेत.

रब्बी हंगाम संकटात; शेतकरी चिंतेत

तभा वृतसेवा
आदमपूर, दि.२९ ऑक्टोबर -

बिलोली तालुक्यातील आदमपूर व परिसरात गेल्या

अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे यंदाचा रब्बी हंगाम संकटात सापडला आहे.खरीप हंगामातील सोयाबीन पीक सरासरीचे उत्पन्न शेतकऱ्यांच्या पदरात सकारात्मक समाधानी पडले.मात्र,सद्यस्थितीत शेतकरी दुसर्याच संकटात म्हणजे रब्बी हंगामात पुरता अडकून पडला आहे.रब्बी हंगामातील पेरणीवरही दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यामुळे टाळकी ज्वारी व हरभऱ्याचे क्षेत्र जवळपास ८० टक्के पेरणी पूर्ण होणार नसल्याची आश्वासक समस्या आ वासून उभी आहे. कारण,जमिनीमध्ये ओलावा नाही.यामुळे या पिकांचे क्षेत्र घटले आहे. शेतकरी चिंतेत आहे. यावर्षी खाण्यासाठी ज्वारी मिळणार नाही, पिकले तरंच मिळेल,नाही पिकले तर कुठे मिळणार व जनावरांना चारा,कडबा मिळणार नाही. या भागात परिसरात टाळकी ज्वारी व हरभरा, मोठ्या प्रमाणात पीक घेतले जाते.

पाण्याच्या कमतरतेमुळे काही शेतकरी धना पीकाची पेरणी करीत आहेत. रब्बी उत्पादनात घट झाल्यास शेतकऱ्यांच्या अन्नसुरक्षा व पशुपालनावर यांचा परिणाम होतो हे मात्र नक्की.जनावरांना पिण्यासाठी पाणी सुद्धा कमी पडत चालले आहे. गावातही पिण्याचा प्रश्न गंभीर आहे.

शासन संबंधित प्रशासन काही यावर ठोस उपाय करीत भरीव मदत करण्यासाठी पुढाकार घ्यावा.शासनाने तुटपुंजी ५००० रपये अग्रीम मदत जाहीर केल्याने सर्वसामान्य नागरिकांकडून तीव्र नाराजी उमटत आहे.काही भागांत शासनाचा जाहीर निषेध शेतकरी नोंदवीत आहेत.खरीप पीक घेतल्यानंतर काही शेतकऱ्यांकडून अजून नांगरटी,वखरटी सुद्धा झाली नाही. जनावरांना चारा उपलब्ध होत नसल्याने चारा डेपोचा प्रस्तावही तडीस न्यावा अशी शेतकरीवर्गांत चर्चा होती.

काही बोअरवेल शेतकरी मात्र थ्री फेस च्या चक्रात अडकल्याने शेती आठ तासांत पूर्णपणे भिजत नाही.रब्बी हंगामावर सुद्धा 'अल निनो' चा झटका कायम आहे.

दोन दिवसांपापूर्वी आंध्रप्रदेशात 'अर्णव' चक्रीवादळाचा तडाखा बसल्याने परिसरात थंडगार वार्याची लहर व आभाळ दाटलेले दिसून आले.पाऊस नसल्याने सध्यातरी रब्बी हंगाम धोक्यात आल्याचे चित्र आहे.

बळीरामपूर येथे अमली पदार्थ व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम

नवीन नांदेड -अमली पदार्थांच्या वाढत्या सेवनामुळे व्यक्ती, कुटुंब आणि समाजावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन अमली पदार्थांच्या गैरवापरास प्रतिबंध करण्यासाठी बळीरामपूर येथे रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी एकदिवसीय जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल डिफेन्स, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने तसेच फकीरा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बळीरामपूर, ता. जि. नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन नांदेड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष आनंदा गुंडले यांच्या हस्ते करण्यात आले होते.या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून बळीरामपूरच्या सरपंच रेणुकाबाई इंद्रजित पांचाळ, तसेच प्रा.इरवंत सूर्यकार आणि बालाजी पाटोळे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाची सुरुवात व्यसनमुक्तीची सामुहीक शपथ घेऊन झाली.अमली पदार्थांचे सेवन ही केवळ वैयक्तिक समस्या नसून त्याचे गंभीर सामाजिक परिणामही होतात. व्यसनामुळे आरोग्याचे नुकसान, कौटुंबिक कलह, आर्थिक अडचणी आणि तरुणांच्या भविष्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे व्यसनाचे दुष्परिणाम समजून घेणे, व्यसनापासून दूर राहणे, व्यसनाधीन व्यक्तींना योग्य मार्गदर्शन मिळवून देणे आणि समाजामध्ये व्यसनमुक्तीविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रमासाठी बळीरामपुर येथील माजी सरपंच इंद्रजित पांचाळ,दिपक रेडे, प्रविण मल्लेवार,ग्रामसंघाचे अध्यक्ष शिला जाधव,राधाताई जाधव, मायाताई जोगदंड, मीना गोरै,आदी मान्यवर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला असुन या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साईप्रसाद जळपतराव यांनी तर आभारप्रदर्शन आनंदराव कांबळे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी फकिरा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

हायवाने दुचाकीला चिरडले ; एक ठार

तभा वृतसेवा
अर्धापूर, दि.२९ ऑक्टोबर -

तालुक्यातील चोरंबा पाटी ते निमगाव रस्त्यावर भरधाव हायवाखाली चिरडल्यामुळे दुचाकी वरील एका १८ वर्षीय तरुण मृत्यू झाल्याची घटना बुधवार रोजी सकाळी सात वाजता घडली. सतिष चंद्रमुनी बहादुरे असे मृत तरुणाचे नाव आहे. यावेळी घटनास्थळी बराच वेळ तणावग्रस्त वातावरण होते.

मिळालेल्या माहितीनुसार, अर्धापूर तालुक्यातील चोरंबा फाटा ते निमगाव रस्त्यावर रेल्वे पुलाचे काम सुरू आहे. या कामासाठी मुरूमाची वाहतूक करणाऱ्या हायवांची दिवसभर या मार्गावर मोठी वर्दळ असते. दरम्यान सतिष बहादुरे हा तरुण या मार्गावरून जात असतांना भरधाव हायवा निष्काळजीपणे चालवत त्याला हायवा खाली चिरडले हायवा चाकाखाली गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक अमोल भगत, सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर कांबळे, पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले, एस.के. ढवळे, आदी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मृत सतिषच्या पश्चात आई, वडील आणि एक बहीण असा परिवार आहे. घटनास्थळी बराच वेळ तणावग्रस्त वातावरण होते. रात्री उशिरापर्यंत याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

नागझरी जलाशयातून पाण्याचा अपव्यय; गाळमुक्तीची मागणी जोरात

तभा वृतसेवा
किनवट, दि.२९ ऑक्टोबर -

पाटबंधारे उपविभाग, किनवटच्या कार्यक्षेत्रातील नागझरी मध्यम प्रकल्पाच्या सांडव्यातून रात्रंदिवस पाण्याचा विसर्ग होत असल्याने पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. जलाशयाच्या भिंतीवर आणि सांडव्यात वाढलेल्या झाडाझुडपांच्या मुळांमुळे भगदाडे पडल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे.

सन १९७२ च्या भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर उभारण्यात आलेल्या या जलाशयाचे १९८३ च्या सुमारास लोकार्पण झाले. मात्र, गेल्या सुमारे ४३ वर्षांपासून गाळ उपसा झाला नसल्याने जलसाठा आणि सिंचन क्षेत्रावर परिणाम झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

कच्च्या कालव्यांतून पाणी जमिनीत मुरत असल्याने कालव्यांचे सीसीकरण, सांडव्याची तातडीने दुरुस्ती आणि जलाशयातील गाळ उपसा करण्याची मागणी होत आहे. रोजगार हमी योजनेतून ही कामे हाती घेऊन जलाशयाची उंची वाढविण्याबाबतही शासनाने विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

किनवट शहराच्या पाणीपुरवठ्यासाठीही हा जलाशय महत्त्वाचा असल्याने पाणीसाठा वाढविणे गरजेचे आहे. जलाशयाच्या सुरक्षिततेसह शेती आणि शहराच्या भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन जलसंपदा विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

दत्तात्रय पाईकराव यांचे निधन

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२९ ऑक्टोबर -

असर्जन येथील ज्येष्ठ नागरीक तथा जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी दत्तात्रय रामजी पाईकराव यांचे आज दि. २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.

यांच्या पश्च्यात एक मुलगा तीन मुली सून आणि एक नात असा परिवार आहे. दत्तात्रय पाईकराव यांच्या पार्थिव देहावर उद्या दि. ३० ऑक्टोबर रोजी शुक्रवार सकाळी ०९:३० वाजता असर्जन येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

जागतिक जंतनाशक दिनानिमित्त मुलांना जंतनाशक गोळ्यांचे मोफत वाटप

तभा वृतसेवा
नवीन नांदेड, दि.२९ ऑक्टो -

राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत आरोग्य विभाग जिल्हा परिषद नांदेड या यांच्या सूचनेनुसार १ ते १९ वयोगटातील सर्व बालक व किशोरवयीन मुला मुलींना मोफत जंतनाशक गोळ्या सिडको मातृसेवा आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे यांच्या उपस्थितीत चघळून खावयास लावण्यात आल्या.

जागतिक जंतनाशक दिनानिमित्त सिडकोतील शिवाजी विद्यालय येथे १ ते१९ वयोगटातील सर्व मुला मुलींना व किशोरवयीन मुला-मुलींना अल्बेंडाझेलची जंतनाशक गोळी प्रत्यक्षात समोरासमोर वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे यांच्या उपस्थिती सर्व मुलांना जंतनाशक गोळ्या चघळुन खावयास लावण्यात आल्या. यावेळी नरसिंह विद्यामंदिर सिडको येथील मुख्याध्यापिका वंदना एकुंडवार,परिचारिका प्रियंका रच्चेवार, मीनाक्षी शिंदे, गलपवाड यांच्यासह सुरेखा सातव, शिला सोनकांबळे, राजेश्वरी करडखेले यांची उपस्थिती होती.

पदवीधर निवडणूक विजयानंतर सिडकोत काँग्रेस कडून जल्लोष

नांदेड -राज्यातील पदवीधर विधानपरिषद निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष महाविकास आघाडीने तीन पैकी तीनही जागेवर विजय मिळविल्याबदल सिडको काँग्रेसच्या वतीने महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत ढोल ताशा वाजवीत परिसरातील सर्वच महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करत गुरुवार (ता.२९) रोजीजल्लोष साजरा केला. राज्यातील पदवीधर व शिक्षक विधानपरिषद निवडणूकीत पाच पैकी तीन जागा महाविकास आघाडीने जिंकल्या आहेत. यात पदवीधर विधानपरिषदेच्या तीन पैकी तीन जागेवर महाविकास आघाडी विजयी झाली आहे. नागपूर विभागातून काँग्रेसचे अभिजित वंजारी, छत्रपती संभाजीनगर विभागातून डॉ. प्रतापसिंह पाटील व पुणे विभागातून हर्षदा जाधव देशमुख या विजयी झाल्या आहेत. दरम्यान या विजयानंतर सिडको काँग्रेसच्या वतीने फटाक्यांची आतिषबाजी करत ढोल ताशा वाजवीत परिसरातील सर्वच महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करत जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी सिडको ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष बापूसाहेब पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे गजानन चव्हाण, सिडको महिला अध्यक्ष ज्योतीताई कदम, ओबीसी महानगर अध्यक्ष विनोद कांचनगिरे, वजीराबाद ब्लॉक कमिटी अध्यक्ष दीपकसिंग हुजूरिया, डॉ. अशोक कलंत्री, प्रल्हाद गव्हाणे, गणेश लिंगमपल्ले, एस पी कुंभारे, गोपीनाथ कहाळेकर, माणिक श्रोते, नुरुद्दीन शेख, सोपान भुरे, सोपान पांडे, रामकिशन इंदूरकर, उत्तमराव कदम, गजानन शिंदे, शेख याखूब, अजय गालेवाड, अजहर शेख, नईम शेख, सचिन कानडे, अँड. सचिन वरपडे, जाफर शेख, सिराज खान, प्रभू उरुदवाड, आदीसह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकरी प्रश्नांवर हिमायतनगरमध्ये काँग्रेसचा एल्गार

तभा वृतसेवा
हिमायतनगर, दि.२९ ऑक्टोबर -

देशात सुरू असलेली वोट चोरी (मतचोरी) रोखून लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि संकटात सापडलेल्या बळीराजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी हिमायतनगर येथे काँग्रेस पदाधिकारी तसेच कमिटीच्या वतीने भव्य मोटरसायकल रॅली व तीव्र आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. २९ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:०० वाजता सोनारी फाटा येथून हजारो नागरिक, शेतकरी व काँग्रेस कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत या भव्य मोटरसायकल रॅलीला अतिशय उत्साहात सुरुवात झाली. केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांविरोधात आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी जोरदार घोषणाबाजी करत ही रॅली सोनारी फाट्यावरून हिमायतनगरच्या तहसील कार्यालयावर धडकली.

या भव्य रॅलीचे व आंदोलनाचे नेतृत्व लोकनेते तथा माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे आणि हिमायतनगरचे नगराध्यक्ष श्री. रफीक शेख यांच्या प्रमुख

उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली पार पडले. देशामध्ये पारदर्शक निवडणूक प्रक्रियेसाठी आणि सुरू असलेली वोट चोरी रोखण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी आक्रमक मागणी या वेळी करण्यात आली. तसेच अतिवृष्टी व दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणारी मदत अपुरी असून, प्रतिएकरी ५० हजार रुपयांची तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी, पीक नुकसानीमुळे बाधित झालेल्या सर्व शेतकऱ्यांना नियमानुसार पीक विम्याची १०० टक्के भरपाई तात्काळ द्यावी, दुष्काळग्रस्त भागातील जनावरांसाठी तात्काळ चारा छावण्या सुरू करून चारा व पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करावी आणि पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये टँकरद्वारे अथवा पर्यायी उपाययोजनांतून नियमित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात यावा, अशा विविध मागण्या या आंदोलनादरम्यान लावून धरण्यात आल्या.

या जनआंदोलनात हिमायतनगर तालुक्यातील सर्व काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्ते हजारोच्या संख्येने सहभागी झाले होते. या प्रसंगी काँग्रेस तालुकाध्यक्ष गजानन सूर्यवंशी सर, माजी जिल्हा परिषद सदस्य श्री. सुभाष राठोड, काँग्रेस कमिटी शहर अध्यक्ष संजय माने, प्रथम नगराध्यक्ष अखिल भाई, उपनगराध्यक्ष श्री. विनोद गुंडेवार यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका प्रतिनिधी ग्रामीण भागातील सर्व आजी-माजी पदाधिकारी व काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रॅली तहसील कार्यालयावर पोहोचल्यानंतर तहसीलदारांमार्फत शासनाला आपल्या विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

लोहा शहरातील वाहनचालकांनी मूळ कागदपत्रे सोबत ठेवूनच वाहतूक करावी

तभा वृतसेवा
लोहा, दि.२९ ऑक्टोबर -

शहर व परिसरातील सर्व वाहनचालकांनी प्रवाशी वाहतूक करताना आपल्या वाहनाची आवश्यक मूळ कागदपत्रे सोबत ठेवावीत, तसेच वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावेत जिल्हा पोलिस अधीक्षक निलब रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरविंद घोडके यांनी शहरात वाहातुक संदर्भात वाहान चालकाला आह्वान केले आहे. वाहन चालवताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आणि वाहतूक नियमांचे पालन करणे ही प्रत्येक वाहनचालकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सध्या सणासुदीचे दिवस आहेत प्रवाशी वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते,शहरात आॅटो चालक,दुचाकी व चारचाकी वाहनांची वर्दळ वाढत असताना वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करू नये. वाहन चालविताना वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आरसी), वैध वाहन विमा, लागू असल्यास प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) तसेच वाहनचालक परवाना ही आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत. संबंधित कागदपत्रे वैध स्थितीत असणे आवश्यक आहे. कागदपत्रे डिजिटल स्वरूपात सादर करण्याची सुविधा उपलब्ध असली, तरी ती अधिकृत माध्यमातून दाखवता येतील याची वाहनचालकांनी खात्री करावी. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे अपघातांचा धोका वाढतो. त्यामुळे दुचाकी स्वारांनी हेल्मेटचा वापर करावा, चारचाकी वाहनचालकांनी सीटबेल्ट लावावे, वेगमर्यादेचे पालन करावे आणि वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळावा. मद्यपान करून वाहन चालवू नये, तसेच क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहूनात बसवून वाहातुक करु नये असे आवाहन केले आहे या वेळी खाजगी वाहान चालक मालक यांना सुचना दिल्या आहेत

ऊसाला प्रतिटन ३५०० रु.भाव जाहीर करा ;अन्यथा रस्त्यावर उतरून लढणार

मुक्रमाबाद-काही दिवसापूर्वी साखरेचे भाव गगनाला भिडले होते.या वर्षीची दुष्काळी परिस्थिती पाहता भविष्यात देखील सारखेचे भाव वाढतील.मात्र ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाच्या भाववाढी साठी लढावे लागत आहे.शिवाजी सर्व्हिस स्टेशन शुगर युनिटकडून (बाऱ्हाळी ता.मुखेड) ऊसाला भाव कमी दिला जात आहे.जिल्ह्यातील साखर कारखान्याप्रमाणे किंवा इतर साखर कारखान्याप्रमाणे भाव दिला जात नाही. या चालू वर्षीच्या २०२६-२७ गाळप हंगामात ऊसाला इतर साखर कारखान्याप्रमाणे भाव जाहीर केला पाहिजे.ऊसाला प्रतिटन ३५०० रु.भाव जाहीर केल्याशिवाय शेतकरी माघार घेणार नाही.भाववाढी साठी शेतकरी रस्त्यावर उतरून लढणार आहे,अशी ठाम भूमिका शिवाजी सर्व्हिस स्टेशन शुगर युनिटचे चेअरमन घुले यांच्याकडे मा.जि.प.अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर व शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी शेकडो ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उपस्थितीत दिनांक २५ आक्टोबर रोजी मांडली आहे.शिवाजी सर्व्हिस शुगर युनिटचे चेअरमन घुले यांनी यावेळी जाहीर केलेला भाव ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मान्य केला नाही.ऊसाची भाववाढ ही इतर कारखान्याप्रमाणेच झाली पाहिजे,अन्यथा आम्ही भाववाढी साठी रस्त्यावर उतरू अशी ठाम भूमिका मांडली.

महागाईने होरपळलेल्या पालकांसमोर इंग्रजी माध्यमांच्या शाळेचे फी चे नवे संकट!

तभा वृतसेवा
नायगाव, दि.२९ ऑक्टोबर -

राज्यातील दुष्काळजन्य परिस्थिती आणि महागाईच्या वाढत्या झळांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले असताना, शैक्षणिक शुल्काच्या वसुली मुळे पालकांसमोर नवी चिंता उभी राहिल्याचे चित्र नायगांव तालुक्यात दिसून येत आहे. विशेषतः प्रथम सत्र परीक्षेच्या पार्श्वभूमीवर इंग्रजी माध्यमांच्या शाळेच्या सक्त शुल्कवसुलीच्या पद्धतीबाबत नायगांव तालुक्यातील काही पालकांनी नाराजी व्यक्त केली असून, या प्रकरणाची शिक्षण विभागाने गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.

सध्या राज्यातील अनेकभागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, महागाईने सर्वसामान्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे.मराठवाड्यातील शेतकरी,शेतमजूर, कामगार आणि रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांना दैनंदिन खर्च भागवितानाही मोठी कसरत करावी लागत आहे. शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसताना घरखर्च, आरोग्याच्या गरजा व त्यात मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागविण्याचे आव्हान पालकांसमोर उभे आहे. अशा परिस्थितीत शैक्षणिक शुल्काचा तगादा लागल्याने पालकांची चिंता अधिकच वाढत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

नायगांव तालुक्यातील बिल्यू बेल्स इंग्लिश स्कूलमध्ये प्रथम सत्र परीक्षेच्या पूर्वसंध्येला विद्यार्थ्यांमार्फत पालका कडे थकीत शुल्क भरण्यासाठी तगादा लावला जात असल्याची तक्रार काही पालकांकडून करण्यात येत आहे. शुल्क थकीत असल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेचे हॉल तिकीट न देणे किंवा परीक्षेला बसण्यापासून रोखण्याबाबत सूचना दिल्या जात असल्याचाही आरोप आहे. तसेच घटक चाचणीच्या वेळी शुल्क थकीत असलेल्या विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांपासून वेगळे बसविण्यात आल्याची तक्रारही पुढे आली आहे. या आरोपांची सत्यता संबंधित शाळेची बाजू जाणून घेऊन आणि शिक्षण विभागामार्फत निष्पक्ष चौकशी करून पडताळणे आवश्यक आहे.

शिक्षणाच्या प्रवासात विद्यार्थ्यांवर आर्थिक ताण नको!

शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचे साधन आहे. आर्थिक अडचणींमुळे पालकांना शुल्क भरण्यास विलंब झाला, तर त्याचा मानसिक परिणाम विद्यार्थ्यांवर होऊ नये, ही शाळा आणि शिक्षण व्यवस्थेची महत्त्वाची जबाबदारी आहे. शुल्कवसुलीचे नियम पाळतानाच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शैक्षणिक सातत्य आणि मानसिक स्वास्थ्य जपणेही तितकेच आवश्यक आहे. पालकांच्या आर्थिक अडचणी समजून घेऊन त्यांच्याशी संवाद साधणे आणि नियमांच्या चौकटीत योग्य तोडगा काढणे, हा अधिक संवेदनशील मार्ग ठरू शकतो.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १७ मध्ये शारीरिक शिक्षा आणि मानसिक छळास प्रतिबंध करण्यात आला आहे. संबंधित प्रकरणात या कायद्यातील तरतुदी आणि शाळेला लागू असलेले नियम नेमके कसे लागू होतात, याची तपासणी शिक्षण विभागाने करणे गरजेचे आहे.

दरम्यान, नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसेच संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन पालकांच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करावी. शुल्कवसुलीच्या नावाखाली कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची खात्री करावी आणि पालकांच्या अडचणींचा विचार करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी नायगाव तालुक्यातील पालकवर्गातून होत आहे.

दुष्काळ आणि महागाईने आधीच हतबल झालेल्या पालकांना दिलासा मिळावा आणि विद्यार्थ्यांचे शिक्षण कोणत्याही परिस्थितीत खंडित होऊ नये, हीच या प्रकरणातील पालकांची अपेक्षा आहे.

मायक्रो फायनान्स हप्ते फेडण्यासाठी शेतमजुरांनी घरे काढली विक्रीला

शासन आणि प्रशासनाच्या आदेशानंतरही फायनान्स कंपनीची दहशत

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २९ ऑक्टोबर
दुष्काळ परिस्थितीमुळे शासन आणि प्रशासनाने शेतकरी आणि शेतमजूर यांच्याकडील कर्ज वसुलीसाठी सक्ती करू नये तसेच कर्ज वसुलीसाठी तगादा लावू नये असे आदेश काढल्यानंतरही मायक्रो फायनान्सच्या दहशतीमुळे सेनगाव तालुक्यातील वाघजाळी येथील भूमीहीन शेतमजूर आणि बचत गटाच्या महिलांनी कंपनीच्या कर्जाचे हप्ते फेडण्यासाठी घर विक्रीला काढले आहे. गावकऱ्यांनी घरावर पोस्टर चिटकवले आहे. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली आहे.

सेनगाव तालुक्यातील वाघजाळी येथील शेतमजूर आणि महिला बचत गटांनी यापूर्वी बँकेकडून कर्ज घेतले होते. या कर्जावर बचत गटाने लहान मोठे व्यवसाय सुरू करून कर्जाची परतफेड देखील केली आहे. त्यानंतर त्यांनी विदर्भातील मायक्रो फायनान्सकडून कर्ज घेतले. सुमारे दीड वर्षापूर्वी कर्ज घेतले असून तीन वर्षात परतफेड आहे. या कर्जाचा हप्ता सुमारे ३५०० ते ४ हजार रूपये आहे.

दरम्यान, यावर्षी दुष्काळी परिस्थितीमुळे हाताला काम नाही तसेच शेतीचे उत्पादन नसल्याने ग्रामीण अर्थकारण कोलमडले आहे. गावातील लहान मोठे व्यवसाय देखील ठप्प पडले आहेत. त्यामुळे बचतगटाचे व्यवसाय अडचणीत सापडले असून त्याचा परिणाम कर्जाच्या हप्त्यावर झाला आहे. कर्जाचे हप्ते थकल्यामुळे मायक्रो फायनानस कंपनीकडून हप्त्यासाठी तगादा लावला जात आहे. या प्रकारामुळे कंटाळलेल्या शेतमजूर व बचतगटाच्या महिलांनी राहते घरच विक्रीला काढले आहे. या संदर्भातील फलक देखील घरावर चिटकवले आहेत. या संदर्भात शेतमजूर धम्मरत्न मोरे यांनी सांगितले की, विदर्भातील दोन मायक्रो फायनान्स कंपनीकडून १७ हजार ते ४० हजाराचे कर्ज घेतले. या दोन्ही कर्जाचा हप्ता सुमारे ३५०० ते ४ हजार रूपये आहे. मागील महिन्याचा हप्ता थकल्यामुळे वसुली अधिकारी बुधवारी दि २८ ऑक्टोबर रोजी घरी येऊन बसले होते. वारंवार विनवणी केल्यानंतर ते परत गेले. मात्र त्यांची भाषा योग्य नव्हती. या प्रकाराला कंटाळून घर विक्रीला काढले.

शासन आणि प्रशासना बँका तसेच फायनान्स कंपन्यांना सक्तीची कर्ज वसुली थांबवण्याचे आदेश देत असतांना गोरगरीब शेतमजूर आणि महिला बचत गटांवर फायनान्स कंपनी दबाव आणीत असल्याचे दिसत आहे. याकडे गांभीर्याने लक्ष घालून दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे.

हिंगोलीत भाजीपला आणि फळांचे भाव कडाडले

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २९ ऑक्टोबर

शहरामध्ये सध्या पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे आणि हवामानात झालेल्या बदलांचा थेट परिणाम शेती उत्पादनावर झाला आहे. याचा परिणाम म्हणून हिंगोलीच्या मुख्य भाजी मंडीमध्ये सर्वच प्रकारच्या भाजीपाल्यांचे भाव चांगलेच वाढल्याचे दिसून येत आहे. महागाईच्या या फटक्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला चांगलीच कात्री लागत असून गृहिणींचे बजेट कोलमडले आहे.

हिंगोली शहरातील आजच्या भाजी मंडीची पाहणी केली असता, मार्केटमध्ये सर्व प्रकारचा भाजीपाला मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आल्याचे दिसून आले. यामध्ये कोबी, टोमॅटो, मेथीची भाजी, हिरवी मिरची, शेवगाड्या शेंगा, पत्ता कोबी, भेंडी, वांगे, कारले, लिंबू आणि काकडी यांसारख्या विविध ताज्या भाज्या मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आल्या आहेत. एकीकडे बाजारात भाज्यांची आवक चांगली दिसत असली, तरी आवक आणि मागणीमधील असमतोलामुळे व हवामानातील बदलांमुळे या सर्वच हिरव्या भाजीपाल्यांचे भाव कमालीचे वाढले आहेत. विशेषतः मेथी, कोथिंबीर, टोमॅटो आणि हिरवी मिरची यांचे दर तेजीत असल्याने ग्राहकांना भाजी खरेदी करताना विचार करावा लागत आहे.

केवळ भाजीपालाच नव्हे, तर हिंगोलीच्या फळ बाजारातही महागाईचे ढग दाटले आहेत. आजच्या बाजारात फळांमध्ये सफरचंद, केळी, पपई, सीताफळ, जाम (पेरू) आणि आवळे मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळाले. परंतु, आवक घटल्यामुळे आणि वाढलेल्या वाहतूक खर्चामुळे या सर्वच पौष्टिक फळांचे भाव देखील वाढून मिळत आहेत. प्रकृतीची काळजी घेण्यासाठी किंवा रुग्णांसाठी लागणारी फळे खरेदी करणे आता सामान्यांच्या आवाक्याबाहेर जाऊ लागले आहे.

अनेक दिवसांनंतर बाजारात रानमेव्यापासून ते ताज्या फळांपर्यंत आणि हिरव्यागार पालेभाज्यांपर्यंत सर्वकाही उपलब्ध असले, तरी वाढलेल्या भावामुळे ग्राहकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. ऐन सणासुदीच्या किंवा रोजच्या वापरात लागणाऱ्या पालेभाज्या आणि फळांचे भाव वाढल्यामुळे हिंगोलीकर नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. हवामान पूर्ववत होऊन लवकरच भाजीपाला व फळांचे भाव आटोक्यात यावेत, अशी हिंगोलीकरांची अपेक्षा आहे.

पळशीमध्ये लातूर गुन्हे शाखेच्या पथकावर जमावाचा हल्ला

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २९ ऑक्टोबर
वसमत तालुक्यातील पळशी येथे धरफोडीच्या गुन्ह्यात आरोपीच्या अटकेसाठी आलेल्या लातूर येथील पोलिस दलातील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकावर जमावाने हल्ला केला. यामध्ये सहाय्यक पोलिस निरीक्षकासह ६ कर्मचारी जखमी झाले आहेत. याप्रकरणी हट्टा पोलिस ठाण्यात ९ जणांविरूध्द सरकारी कामात अडथळा आणल्याच्या आरोपावरून गुरूवार दि २९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची दोन पथके रवाना झाली आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार लातूर जिल्ह्यातील एका घरफोडीच्या गुन्ह्यात वसमत तालुक्यातील पळशी येथील एका आरोपीचा सहभाग असल्याची माहिती लातूरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक पांडुरंग माने यांच्यासह सहा कर्मचारी आरोपीच्या अटकेसाठी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास पळशी येथे आले होते.

दरम्यान, लातूरचे पोलिस आल्याचे लक्षात येताच त्याठिकाणी असलेल्या ९ जणांनी पोलिसांवर हल्ला चढविला. पोलिसांना काही कळण्याच्या आतच त्यांनी लाकडाचा दांडा व लोखंडी रॉडने मारहाण सुरू केली. या मारहाणीत सहाय्यक पोलिस निरीक्षक पांडुरंग माने यांच्यासह कर्मचारी जखमी झाले. या मारहाणीनंतर ९ जण घटनास्थळावरून फरार झाले.

या घटनेची माहिती हट्टा पोलिसांना मिळताच सहाय्यक पोलिस निरीखक ज्ञानेश्वर बसवंते, जमादार कृष्णा चव्हाण, अविनाश राठोड, शिवा पतंगे, संदीप चव्हाण, गणेश सुर्यवंशी, भारशंकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जखमी लातूर पोलिसांना तातडीने उपचारासाठी हट्टा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. त्याठिकाणी उपचारानंतर लातूरचे पथक रवाना झाले.

याप्रकरणी हट्टा पोलिसांनी सुदर्शन शिंदे, राजू शिंदे, विकी शिंदे, सचिन शिंदे यांच्यासह अन्य पाच जणांवर सरकारी कामात अडथळा आणल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल केला आहे. या आरोपींच्या शोधासाठी हिंगोली पोलिसांची दोन पथके रवाना झाली आहेत.

हिंगोली- येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात फिटनेस मशीनमध्ये वारंवार तांत्रिक बिघाड येत असल्यामुळे वाहनचालक व मालक यांना प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत आहे. तत्काळ मशीनमधील तांत्रिक अडचण दूर करावी अशी मागणी जय एकता वाहन चालक-मालक संघटनेकडून करण्यात आली.

संक्षिप्त वृत्त

नारायणा स्कूलची न्यायालयाला भेट

हिंगोली- नारायणा ई-टेक्नो स्कूल, हिंगोली येथील इयत्ता आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांसाठी हिंगोली येथील जिल्हा व सत्र न्यायालयाला शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. भारतीय न्यायव्यवस्था, कायदे आणि न्यायप्रक्रिया यांविषयी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष माहिती मिळावी, हा या भेटीमागील मुख्य उद्देश होता. या शैक्षणिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी न्यायाधीश, वकील आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली. तसेच न्यायालयातील शिस्त, न्यायदानाची प्रक्रिया आणि कायद्यासमोर सर्व समान असल्याचे महत्त्व यांविषयी जाणून घेतले. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच भारतीय न्यायव्यवस्थेचे प्रत्यक्ष आकलन होण्यास मदत झाली.

भारतीय व्हीलचेअर क्रिकेट संघात सय्यद शकील यांची निवड

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २९ ऑक्टोबर
व्हीलचेअर क्रिकेट इंडिया असोसिएशनने भारत विरुद्ध श्रीलंका व्हीलचेअर क्रिकेट मालिका २०२६ साठी भारतीय संघाची अधिकृत घोषणा केली असून या संघामध्ये हिंगोली येथील सय्यद शकील या खेळाडूची निवड झाली आहे.

चेन्नई येथे होत असलेल्या ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२६ दरम्यान होणाऱ्या या मालिकेसाठी १५ सदस्यीय मुख्य संघ, ३ राखीव खेळाडू आणि संघ व्यवस्थापनाची निवड करण्यात आली आहे. डब्लुसीआयएने जारी केलेल्या पत्रानुसार खेळाडूंची कामगिरी, पात्रता आणि वर्गीकरणाच्या आधारे ही निवड करण्यात आली. निवड समितीमध्ये आंध्र प्रदेशचे रमण सुब्बाराव सुरवरापू, दिल्लीचे सोनू गुप्ता आणि मुंबईचे विश्वनाथ गुरव यांचा समावेश होता. मुख्य संघाचे नेतृत्व उत्तर प्रदेशच्या सोमजीत सिंगकडे सोपवण्यात आले असून, कर्नाटकचा शिवा प्रसाद उप-कर्णधार असेल.

या निवडीनंतर पत्रकार संघाच्यावतीने सय्यद शकील यांचा सत्कार करण्यात आला तसेच त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड ऑफ महाराष्ट्राचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष गजानन मगर पत्रकार क्रिकेट संघाचे अध्यक्ष विजय गुंडेकर, सुनील पाठक, सुधीर गोगटे, रवी शिखरे,गजानन पवार, बाळू जाधव, सुधाकर वाढवे, यांची उपस्थिती होती.

एक राष्ट्र, एक निवडणूक विषयावर हिंगोलीत विकसित भारत युथ पार्लमेंट

लोकशाही प्रक्रियावर विचार मांडण्याची संधी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २९ ऑक्टोबर
युवकांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव, नेतृत्वगुण, वक्तृत्वकौशल्य आणि तर्कशुद्ध विचार विकसित करण्याच्या उद्देशाने माय भारत, हिंगोली यांच्या वतीने विकसित भारत युथ पार्लमेंट २०२६-२७ या जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी 'एक राष्ट्र, एक निवडणूक' हा विषय निश्चित करण्यात आला आहे.

या स्पर्धेच्या माध्यमातून युवकांना राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयावर अभ्यासपूर्ण मते मांडण्याची आणि लोकशाही व्यवस्थेतील विविध पैलू समजून घेण्याची संधी मिळणार आहे. सहभागी युवकांकडून 'एक राष्ट्र, एक निवडणूक' या संकल्पनेच्या अनुषंगाने निवडणुकांचे नियोजन, प्रशासकीय यंत्रणेवरील परिणाम, विकासकामांमध्ये सातत्य, निवडणूक खर्च तसेच लोकशाही प्रक्रियेसमोरील संधी व आव्हाने या विविध बाबींवर विचार मांडण्यात येणार आहेत.

भारत हा जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशांपैकी एक असून, लोकशाही व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी युवकांचा जागरूक आणि सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय संकल्पनेच्या अनुषंगाने युवकांमध्ये नेतृत्वक्षमता, संसदीय कार्यपद्धतीची समज, चिकित्सक विचार आणि प्रभावी संवादकौशल्य विकसित करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे.

माय भारतच्या माध्यमातून आयोजित या युथ पार्लमेंटमुळे युवकांना राष्ट्रीय विषयांचा अभ्यास करून त्यावर आपली मते प्रभावीपणे मांडण्याचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. तसेच युवकांमध्ये लोकशाही प्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण करून त्यांना राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे.

एबीएम इंग्लीश हायस्कूलमध्ये सुरक्षित बचपन अभियानाद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २९ ऑक्टोबर

शहरातील एबीएम इंग्लिश हायस्कूलमध्ये तालुका विधी सेवा समितीच्या वतीने आयोजित 'सुरक्षित बचपन अभियान' अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, हिंगोली येथील ए. जी. नाईक होते.

कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून हिंगोली वकील संघाचे विधिज्ञ एम. एम. गांजरे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. एस. आर. घुगे, कैलासवासी नारायणराव ते शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव उमेश डाफने, ॲड डी. बी. हनवते, एन. एस. दिंडे तसेच शाळेचे उपमुख्याध्यापक आदेश बोराळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

'सुरक्षित बचपन अभियान' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना बालहक्क, बालसुरक्षा आणि बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या विविध कायद्यांविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. मुलांना भीतीमुक्त वातावरण मिळणे, गुड टच आणि बॅड टच यातील फरक समजून घेणे, लैंगिक शोषणापासून स्वतःचे संरक्षण करणे, शाळेत किंवा इतर ठिकाणी अन्याय-अत्याचार झाल्यास त्याविरोधात आवाज उठवणे तसेच संबंधित ठिकाणी तक्रार कशी नोंदवावी, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. संकटाच्या प्रसंगी मदत मिळविण्यासाठी उपलब्ध असलेल्या हेल्पलाइन क्रमांकांचीही माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

प्रमुख मार्गदर्शक एम. एम. गांजरे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देत सुरक्षिततेसंदर्भातील कायदेशीर तरतुदी सोप्या भाषेत समजावून सांगितल्या. कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन न करता योग्य व्यक्ती, पालक, शिक्षक किंवा संबंधित यंत्रणेकडे मदत मागणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष ए. जी. नाईक यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. संवादात्मक पद्धतीने विविध कायद्यांची माहिती देत त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनातील भीती आणि संकोच दूर करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आपल्या शंका मांडल्या. न्यायाधीशांनी दिलेल्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना कायदे, हक्क आणि स्वतःच्या सुरक्षिततेविषयी अधिक जागरूक होण्यास मदत झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन शिंदे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश व्यवहारे यांनी केले.

डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या विजयानंतर जल्लोष

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २९ ऑक्टोबर
महाविकास आघाडीचे मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार प्रतापसिंह पाटील यांचा मताधिक्याने दणदणीत विजय झाला. या विजयाचा जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे सुधीरआप्पा सराफ, ॲड.रवि शिंदे, मनीष आखरे, बंडू मुटकुळे, मुजीब पठाण, मिलिंद उबाळे, माधव कोरडे, डॉ.रमेश शिंदे, डॉ. वेदांत मरळे, भास्कर पोले, मोईन बागवान, जुबेर मामू, बंटी नागरे, धीरज काकडे, गजानन गव्हाणे, बाजीराव इंगोले, बापूराव वाडकर, सुनील पाईकराव, चंदू प्यारेवाले, चेतन उबाळे, अनुप नाईक, दत्तराव जाधव, विकी सराफ, शेख अमन, नागेश मुदिराज यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.